चिपको आंदोलन हे झाडांना वाचविण्यासाठी झालेले आंदोलन होते. यामध्ये वृक्षतोडीचा विरोध करण्यासाठी स्त्रियांनी सहभाग नोंदविला व तोड होणाऱ्या वृक्षाला कवटाळून ठेवले. या आंदोलनामुळे शेकडो झाडांची जंगले, हजारो पक्षी, प्राण्यांची निवासस्थाने वाचली.

ठेकेदार झाडं कापायला असंख्य माणसं घेऊन आला की 'त्या' झाडाला घट्ट मिठ्या मारून उभ्या राहायच्या आणि 'पेड कटने नही देंगे'च्या घोषणा द्यायच्या. एप्रिल १९७३ मध्ये अलकनंदा खोऱ्यातील मंडल गावात 'चिपको' आंदोलनाची सुरुवात झाली. अलकनंदा खोऱ्यातील जंगलाचा एक भूभाग क्रीडा साहित्य तयार करणाऱ्या एका कंपनीला देण्याच्या सरकारच्या निर्णयाला विरोध करण्यातून आंदोलन उभे राहिले. 'दाशैली ग्राम स्वराज्य संघ' या स्थानिक संस्थेने शेतीची अवजारे तयार करण्यासाठी राज्य सरकारकडे याच जंगलात वृक्षतोड करण्याची परवानगी मागितली होती, ती नाकारली गेली होती. त्यामुळे साहजिकच व्यापारी कंपनीला दिलेल्या परवानगीला लोकांनी विरोध केला. त्यातून 'चिपको' आंदोलन उभे राहिले. त्यात गौरादेवी, सुदेशादेवी, बचनीदेवी यांसारख्या स्त्रिया हिरिरीने उतरल्या. गौरादेवीने गावागावांत फिरून स्त्रियांना एकत्र आणले आणि जंगलात 'चिपको' आंदोलन सुरू केले. जंगलात तब्बल अडीच हजार झाडांचा लिलाव त्यावेळी करण्यात आला. गावातील आंदोलकांनी विरोध केला, तरीही लिलाव झालाच. ठेकेदारांना लोकांच्या विरोधाची कल्पना होती. त्यांनी कार्यकर्त्यांना लोकांची जुनी देणी देण्याच्या निमित्ताने चामोलीत बोलावून घेतले. त्यांच्या गाफीलपणाचा गैरफायदा घेऊन त्यांनी गुपचूप रेनीच्या जंगलात मजूर पाठविले. एका छोट्या झाडांची कत्तल करण्यासाठी आलेल्या मजुरांना पाहिलं आणि धावत गावात ही खबर दिली. पण, गावात फक्त १५-२० स्त्रिया आणि काही छोटी मुले होती. पुरुष मंडळींना निरोप कळवून ते परत येईपर्यंत दोन-तीन दिवस लागणार होते तोपर्यंत जंगलतोड अटळ होती. हे लक्षात येताच गावातील महिला आपल्या मुलांसह जंगलात आल्या. बायकांसह सगळी लहान मुलं झाडाला चिकटून उभी राहिली. ठेकेदारांनी स्त्रियांना विवस्त्र करण्याच्या धमक्या दिल्या. पण, एकीनीही ठेकेदारांच्या धमक्यांना भीक घातली नाही. शेवटी मजूरांनी माघार घेतली. पर्यावरणाच्या रक्षणासाठी भारतात झालेलं हे पहिलंच अनोखं आंदोलन होतं. पुढे हे आंदोलन 'चिपको' आंदोलन म्हणून ओळखलं जाऊ लागलं. दि.२१ मे २०२१ रोजी सुंदरलाल बहुगुणा यांचे कोरोना ने निधन झाले.

***नर्मदा बचाव आंदोलन**

ऑक्टोबर २००० रोजी प्रत्यक्ष धरणाच्या कामाला सुरुवात झाली आणि त्याचा विरोध म्हणून नर्मदा बचाओ आंदोलनातर्फे हक्कासाठी लढाई सुरू झाली. त्या पार्श्वभूमीवर पुनर्वसन व लाभहानीची चिकित्सा करण्यासाठी समित्या

नियुक्त करण्यात आल्या; मात्र दरवर्षी धरण थोडे थोडे ११० मी. उंचीपर्यंत बांधण्यात आले. त्यामुळे पुनर्वसन व अन्य बाबींसाठी आंदोलन तीव्र करण्यात आले. फेब्रु २००४ मध्ये विस्थापितांचे पुनर्वसन होईपर्यंत धरणाची उंची वाढविण्यास मंजूरी देऊ नये, या मागणीसाठी आंदोलनाने ५ दिवसांचे मुंबईत उपोषण केले. परिणामी १५ मार्च २००५ मध्ये पुनर्वसनाशिवाय धरण पुढे नेण्यास रोखणारा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. त्या निर्णयाने संपूर्ण नर्मदा खोऱ्याला दिलासा मिळाला; मात्र एप्रील २००६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा आदेश डावलून धरणाची उंची १२२ मी.पर्यंत नेण्याचा शासनाने निर्णय घेतला. त्याविरोधात आंदोलनाने १७ मार्चपासून दिल्ली येथे धरणे व २० दिवसांचे उपोषण केले. या वेळी देशविदेशांतून आंदोलनास अभूतपूर्व समर्थन मिळाले. सैफुद्दीन सोझ, मीरा कुमार व पृथ्वीराज चौहान या केंद्र सरकारच्या त्रिमंत्री समितीने खोऱ्याला भेट दिली आणि वस्तुस्थितीचा अभ्यास करून धरणाचे बांधकाम थांबविण्याचा निर्णय घेऊन धरणासंबंधीचा मुद्दा पुन्हा न्यायालयाकडे नेला. एक आठवड्यात संबंधित सरकारांनी पुनर्वसनाचा आराखडा मांडावा. तीन महिन्यांत पुनर्वसन पूर्ण झाले नाही, तर धरण थांबविण्याचा निर्णय घेतला जाईल, असा निर्णय २००६ मध्ये न्यायालयाने दिला. त्यासाठी शुंगलु कमिटी स्थापन करण्यात आली.

नर्मदा बचाओ आंदोलन समितीने २००६ नंतर सरदार सरोवर प्रकल्पातील भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर आणली. जाने २००७ मध्ये गुजरात सरकारकडून सरदार सरोवर धरणाचे लोकार्पण करण्यात आले. या वेळी धरणाचे १७ मीटर्सचे बांधकाम प्रत्यक्षात बाकी होते, तर दोनशेहून अधिक गावांचे पुनर्वसन बाकी होते. याबाबतीतही मध्य प्रदेशात झालेल्या भ्रष्टाचाराची पोलखोल नर्मदा बचाव आंदोलन समितीने केली. त्यानंतर नर्मदा बचाव आंदोलन समितीने अनेक आंदोलने केलीत व भ्रष्टाचारी अधिकारी, कर्मचाऱ्यांची पोलखेल केली. हे करीत असताना आंदोलन समितीतील अनेक कार्यकर्त्यांना कारावास भोगावाला लागला, तर त्यांना रास्त न्याय मिळवून देण्यासाठी अनेक समित्याही गठण करण्यात आल्या. त्यामुळे अनेक अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कार्यवाही होऊन त्यांना निलंबित करण्यात आले. ऑगस्ट २००८ मध्ये टाटा समाजविज्ञान संस्थेच्या अभ्यासातून सरदार सरोवर प्रकल्पाच्या सिंचन, पेयजल, वीजनिर्मिती, आर्थिक किंमत, मानवीय किंमत, पर्यावरणीय खोट्या दाव्यांवर प्रकाश टाकण्यात आला. मे २०१० मध्ये प्रकल्प पुढे नेण्याचा सरकारचा अट्टाहास होता. याविरोधात आदिवासी शेतकऱ्यांनी नर्मदा नियंत्रण प्राधिकरणावर धडक दिली आणि १५ दिवसांचे धरणे आंदोलन केले. त्यामुळे केंद्रीय जल आयोगाने सरदार सरोवर पुढे बांधण्यासाठीची मान्यता नाकारली. हे आंदोलनाचे यश होते; मात्र आजही अनेक आदिवासी कुटुंबे सरदार प्रकल्पामुळे विस्थापीत आहेत. त्यांचे पूर्णपणे पुनर्वसन झालेले नसून आंदोलनाचा लढा सुरूच आहे. २०१३ मध्ये झा आयोगाची विस्थापन पूनर्वसणाची चौकशी करण्यासाठी नेमणूक करण्यात आली होती. सध्या धरणाची उंची १३९ मीटरवर पोहचली आहे (२०२१).

***ग्रेटा थनबर्ग**

स्वीडनच्या (Sweden) संसदेबाहेर आंदोलने करणारी पंधरा वर्षांची एक चिमुरडी 2018 मध्ये जगाच्या नजरेत आली. पर्यावरणाच्या प्रश्नावर स्थानिक सरकार आणि प्रशासनाच्या विरोधात शड्डू ठोकलेल्या या लहान मुलीचे जगभर कौतुक झाले. कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सरकारवर दबाव आणण्यासाठी तिने "स्कूल स्ट्राइक फॉर क्लायमेट" (School strike for climate) असे लिहिलेला एक फलक हातामध्ये धरून आंदोन सुरु केले आणि स्वीडनची ग्रेटा थनबर्ग (Greta Thunberg) पर्यावरणासाठी लढणारी जगातली सगळ्यात तरुण कार्यकर्ती म्हणून प्रसिद्ध झाली.

ग्रेटाने सुरु केलेली ही छोटीशी चळवळ बघता बघता जगभर पसरली आणि जगभरातील पर्यावरणाच्या प्रश्नावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपापल्या परीने वेगवेगळ्या देशांमध्ये आंदोलने सुरु केली आणि त्या वर्षाचा शेवट येता येता इंग्लंड (England) ते जपान (Japan) मधल्या तब्बल 20000 शाळकरी विद्यार्थ्यांनी शाळा बुडवून पर्यावरणासाठी

आंदोलन हातात घेतले.त्याच्या बरोब्बर एक वर्षानंतर ग्रेटा पर्यावरण क्षेत्रात काम केल्यामुळे चक्क जगातला सर्वोच्च पुरस्कार असणाऱ्या नोबेलसाठी नामांकित करण्यात आली. आज बाईमाणूसच्या ऐतवार स्पेशल मध्ये ग्रेटाची आठवण आम्हाला झाली कारण भारतातही विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचे शोषण केले जात आहे अशावेळी दरवेळेस कुणीतरी प्रौढ आणि ज्येष्ठ कार्यकर्ता किंवा कार्यकर्तीने आवाज उठविण्यापेक्षा ग्रेटाच्या लढ्यातून प्रेरणा घेऊन तरुणांचा देश समजल्या जाणाऱ्या भारतातून काही सळसळत्या रक्ताच्या तरुणांनी आता आपल्या आणि येणाऱ्या कित्येक पिढ्यांच्या उत्तम आरोग्यासाठी पर्यावरणाच्या रक्षणाचे व्रत घ्यायला हवे त्यासाठी रस्त्यावर फलक घेऊन एकटीने सुरु केलेले ग्रेटाचे आंदोलन होते.

ग्रेटाला लहानपणापासूनच एस्पर्जर सिंड्रोम (Asperger syndrome) या आजाराने ग्रासले आहे. एस्पर्जर सिंड्रोम हा एक स्वमग्नतेशी संबंधित एक आजार आहे. हा आजार जडल्याने रुग्णाला सामाजिक संवाद साधत असतांना अडचणी येतात, बोलत असतांना अतिशय छोट्या छोट्या गोष्टींनी व्यत्यय येतो मन अस्थिर होते पण असा एक आजार जडलेला असूनही ग्रेटा या आजाराला तिला मिळालेली एक नैसर्गिक 'भेट' समजते. उलट तिच्या या वेगळ्या आजारपणामुळे तिला काही 'सुपरपॉवर' तिच्याकडे असल्याचा भास होतो.

थनबर्गची आई, मालेना एर्नमन, एक ऑपेरा गायक आहेत आणि युरोपातील प्रसिद्ध युरोव्हिजन गाण्याच्या स्पर्धेतील एक स्पर्धक म्हणून सुद्धा त्यांनी सहभाग नोंदविला आहे. तिचे वडील स्वंते थनबर्ग, एक अभिनेते आणि ग्रीनहाऊस इफेक्टचे मॉडेल तयार करणाऱ्या शास्त्रज्ञाचे वंशज आहेत.जगभरात फिरणारी ग्रेटा

2019 मध्ये एका बोटीतून ग्रेटा थनबर्गने अटलांटिक समुद्र ओलांडून अमेरिकेतील न्यूयॉर्क (New York) येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या हवामान परिषदेमध्ये सहभाग नोंदविला. त्यावेळी ती केवळ सोळा वर्षांची होती. न्यूयॉर्कमधल्या परिषदेत तिने दिलेलं भाषण हे तिच्या आजवरच्या सर्वोत्कृष्ट भाषणांमध्ये गणलं जातं कारण तिथे तिने अतिशय क्रोधाने जगभरातल्या नेत्यांना एक प्रश्न विचारला होता आणि तो प्रश्न होता, "तुम्ही सगळे आशावादी होण्यासाठी आम्हा तरुणांकडे येत पण तुमच्या पोकळ शब्दांनी आमचे भविष्य आणि स्वप्न हिरावून घेण्याची तुमची हिंमतच कशी होते?" हा प्रश्न विचारून जगभरातील नेते पर्यावरण वाचविण्यासाठी पुरेसे प्रयत्न करत नसल्याचे तिने आपल्या भाषणामधून सांगितले.2018ला सुरु झालेला ग्रेटा थनबर्गचा लढा ही मुलगी आजही लढते आहे. नुकतेच इंग्लंडच्या ग्लॅस्टनबरी (Glastonbury Festival) येथे झालेल्या एका कार्यक्रमात हजारो श्रोत्यांना पर्यावरणाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी ग्रेटा थनबर्गने आपल्या भाषणातून संबोधित केले. आता 19 वर्षांची असणारी ग्रेटा मागील चार वर्षांपासून जगभर हिंडून या प्रश्नावर आपल्या भाषणांच्या आणि आंदोलनांच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न करते आहे.

*** निष्कर्ष:**

स्त्रियांवर झालेल्या जुलुमाचे मूळ कारण कोणते? आणि हा जुलूम संपविण्यासाठी कोणता मार्ग स्वीकारावा? या दोन प्रश्नांच्या संदर्भामध्ये घेतल्या जाणाऱ्या भूमिकांनुसार स्त्रीवादामध्ये तीन प्रमुख प्रवाहनिर्माण झालेले आहेत :उदारमतवादी वा समानतावादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद आणि मार्क्सवादी स्त्रीवाद. सर्व मानवांच्या समतेचा, राजकीय स्वातंत्र्याचा, न्यायाचा व आत्मविकासासाठी समान संधीचा पुरस्कार करणारी भूमिका समानतावादी स्त्रीवादाची होय. जे जे म्हणून इतर सर्व मानवांना मिळालेले आहे किंवा मिळण्यासारखे आहे ते सर्व मिळविण्याचा अधिकार स्त्रियांनाही आहे, त्यासाठी सांस्कृतिक

लिंगनिर्मिती-प्रक्रियेमध्ये मूलगामी सुधारणा केल्या पाहिजेत आणि भिन्नतेवरील भर कमी करूनसमानतेवर भर दिला पाहिजे; स्त्रियांना त्यांच्या कायदेशीर हक्काविषयी जागरूक केले पाहिजे, त्यांना शिक्षणाची व विकासाची समान संधी मिळाली पाहिजे, विवाहासंबंधात त्यांना समान स्थान आणि निर्णयाचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, तसेच अत्याचारापासून संरक्षणाचाहक्क, सांपत्तिक अधिकार आणि वारसाहक्क यांसारख्या सामाजिक विषमता दूर करणाऱ्या

हक्कांविषयी जागरूक राहिले पाहिजे, असे या भूमिकेचे स्वरूप आहे.स्त्री ही अनादी कालापासून उपभोग्य वस्तू आणि पुरुषांपेक्षा दुय्यमच राहिलेली आहे. त्याची कारणमीमांसा करताना पितृसत्ता आणि पुरुषांची अधिराज्य गाजविण्याची मनोवृत्ती जबाबदार दिसते. स्त्रीवादाच्या तिसऱ्या लाटेमध्ये त्यावरनीय श्रीवाद ही संकल्पना उदयास आली पर्यावरणीय स्त्रीवाद त्यामध्ये निसर्गाचे होणारे शोषण आणि स्त्रियांवरील अन्याय अत्याचार यांची जातकुळी एकच आहे आणि या दोघांना जबाबदार घटकही एकच आहे असा सूर त्याद्वारे निर्माण झाला.

संदर्भसूची:

१) संज्ञासंकल्पनाकोशातील नोंद,'स्त्रीवाद' - शिरीन कुडचेडकर
२) मराठी विश्वकोश पर्यावरणीय' स्त्रीवाद' नोंद - कविता मते
३) 'धोरोदत्त वंदना शिवा' महाराष्ट्र टाइम्स भावेश ब्राह्मणकर
४) बाईमाणूस- ब्लॉग 'ग्रेट ग्रेटा' आशय बविता दिलीप येडगे
५)मराठी विश्वकोश नोंद नर्मदा बचाव आंदोलन - राहुल पैठणकर

Impact Factor – (SJIF) –8.632 **ISSN – 2278-9308**

B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

November – 2023

ISSUE No - (CDXXXVI) 436

One Day International Multidisciplinary Conference On

ECO FEMINISM

Conference Proceedings

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr.Charushila Rumale
Executive-Editor
Principal,
Smt. Radhadevi Goenka College for Women, Akola (M.S.)

Editors

Dr.Umesh Patil
Dept. of English
Radhadevi Goenka
College for Women, Akola (M.S.)

Dr. Swapnil Ingole
Dept. of Marathi
Smt. Radhadevi Goenka
College for Women, Akola (M.S.)

Aadhar International Publication
For Details Visit To : **www.aadharsocial.com**
© **All rights reserved with the authors & publisher**

59	मराठी कवितेतील मातृत्वाचा आदिबंध आणि पर्यावरणीय स्त्रीवाद **डॉ.स्वप्नील राजेश इंगोले**	**220**
60	पर्यावरण संरक्षणात महिलांची भूमिका **प्रा. डॉ. सीमा बी. अढाऊ**	**226**
61	अभिज्ञानशाकुंतल आणि नृत्यनाट्यशकुंतला या नाट्यातील स्त्री-पात्रांचे तुलनात्मक अध्ययन **सौ. सुवर्णा केवटे ,प्रो. डॉ. कविता होले**	**229**
62	लोकसाहित्य आणि पर्यावरणीय स्त्रीवाद **तेजश्री चंद्रशेखर डगवार**	**238**
63	लोकसंगीत मे भारतीय स्त्रियों का योगदान **डॉ.भागवत लहुबुवा ढोले**	**242**
64	महादेवी वर्मा के काव्य में प्रकृति-चित्रण **डॉ. ज्योति एन. मंत्री ,सौ. संगीता अजयकुमार शर्मा**	**245**
65	पर्यावरण संरक्षण में महिलाओं का योगदान **प्रा.डॉ.फरहाना आझामी**	**249**
66	अब्दुल बिस्मिल्लाह के उपन्यास में मुस्लिम नारी "झीनी- झीनी बीनी चदरिया" के संदर्भ में **डॉ. फिरोज एस खान**	**255**
67	पंचायतराज व्यवस्था महिला सबली र ा : ाल आज आ ा उद्या **डॉ.आशिष जयराम मुठ्ठे**	**260**
68	**शिवसेनेचे पर्यावरण व महिलांविषयक कार्य एक आकलन** **सरला रामराव पाटील, प्रा. डॉ. संदीप भिमराव डोंगरे**	**263**

मराठी कवितेतील मातृत्वाचा आदिबंध आणि पर्यावरणीय स्त्रीवाद

डॉ.स्वप्नील राजेश इंगोले
सहायक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.
मो.७७९८०१४८९४ ,ईमेल: ingole_swapnil@rdgakola.ac.in

प्रस्तावना:

मानवी इतिहासामध्ये पुरुषांना उच्च आणि वर्चस्वाचे स्थान देऊन त्यांच्या ज्ञानाला ज्ञान, अनुभवाला अनुभव आणि त्याच्याच कार्याला महत्त्वाचं काम मानले गेले आहे. त्यामुळे स्त्रियांकडे असलेले अनुभव, स्त्रियांची कामं,स्त्रियांची प्रतिभा, स्त्रियांची सर्जनशक्ती निश्चितच कमकुवत किंवा दुय्यम दर्जाची मानली गेली आहे. अगदी हेच पर्यावरणासोबत आणि निसर्ग सोबत मानवाने केले आहे. केवळ घेणे आणि घेणे एवढेच मानवाने निसर्गाकडून अपेक्षिले आहे.त्यामुळे निसर्ग आणि स्त्रिया यांचे शोषण करणे, वापर करणे, स्वार्थ बुद्धीने हव्या त्या पद्धतीने दाबून ठेवणे किंवा बंधने घालने हे पितृसत्तेच्या योगाने झाले आहे. पितृसत्ता कायमच जन्माला आलेल्या नवजात बालीकेपासून तर म्हाताऱ्या स्त्रीपर्यंत तिला दुय्यम दर्जाची,हिनकर्माची आणि उपभोग्य वस्तू मानत आली आहे. त्यामुळे स्त्री ही स्वतः स्वयंपाक करू शकते मात्र ती प्रथमता त्याचा आस्वाद घेऊ शकत नाही. स्त्री ही शेतामध्ये राबू शकते मात्र तीचे सातबारावर नाव चढवताना मागेच राहिलेली दिसते. स्त्री ही स्वतः अर्थार्जण करू शकते मात्र अर्थाचा व्यय करताना तिला कुण्या तरी पुरुषाची परवानगी लागते. मग तो पुरुष भाऊ, पती, वडील यापैकी कोणीही असू शकतो. पितृसत्तेने निसर्ग आणि स्त्रिया यांच्या बाबतीत ओरबाडणे आणि स्वतः बलदंड होणे हीच धारणा कायम ठेवली आहे आणि त्यांच्याकडून अप्राप्य व अमर्याद अपेक्षांचा हव्यास केला आहे.महात्मा गांधींच्या मते निसर्ग सर्वांची गरज पूर्ण करू शकतो. मात्र हव्यास एकाचाही पुरवू शकत नाही. म्हणून निसर्गामध्ये अमर्याद आणि अनंत सामर्थ्य असलं तरी मानवाने गरजेचे तेवढं घ्यावं आणि भविष्यासाठी काही राखून ठेवावं म्हणजे मानवी जीवन ह्या पृथ्वीवर कायम राहील. हा त्यामागील गर्भितार्थ आहे. पर्यावरणीय स्त्रीवादाने स्त्रियांकडे उपजत असलेली सर्जनशीलता आणि पर्यावरणीय कणव यांची समन्वयात्मक सांगड घातली आहे.

पर्यावरणीय स्त्रीवाद संकल्पना

1970 च्या दशकात फ्रेंच स्त्रीवादी लेखिका फ्रान्सवा यांच्या 'डेथ ऑफ फेमिनिझम' या ग्रंथामध्ये सर्वप्रथम पर्यावरणीय स्त्रीवाद ही संकल्पना आलेली आहे. निसर्ग आणि पर्यावरण या बाबीशी स्त्री ही पुरुषांहून अधिक संलग्नित आणि जवळीकता राखत असल्याने स्त्रीला इतर कोणाहीपेक्षा पर्यावरणाशी अधिक सलोखा आणि पर्यावरणीय जाणीव असते. त्यामुळे सिमोन दि बोव्हार यांनी पर्यावरणीय झीज आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या ओरबाडण्याला विकासाचा पितृसत्ताक दृष्टिकोन जबाबदार आहे. अशी मांडणी केली होती. पर्यावरणीय स्त्रीवाद या संकल्पनेचा विकास करण्यामध्ये मारीया मेस, वंदना शिवा, बिना अग्रवाल, देवकी जैन यांसारख्या स्त्रीवादी विचारवंतांचा मोलाचा वाटा आहे.

नैसर्गिक साधन संपत्ती, निसर्गाची अमाप आणि भरून न निघणारी झीज, पर्यावरणाची अपरिमित हानी ही पितृसत्तात्मक विकासाच्या दृष्टिकोनाने झालेली आहे.स्त्री आणि पर्यावरण, महिला आणि निसर्ग यांच्या शोषणाचे विचारव्यूह पुरुषी मानसिकतेने आणि पितृसत्तेने घडवले आहेत. म्हणून विकासाच्या बाबतीत स्त्रिया मागासलेल्या राहिल्या. यासाठी या विकासाची पुनर्रचना आणि पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. अशी मांडणी पर्यावरणीय स्त्रीवाद करते.

आदिबंधात्मक समीक्षा

आदिबंधात्मक समीक्षा ही कार्ल युंग या मानसशास्त्रज्ञाच्या सिद्धांतांवर आधारित आहे. त्याच्या मते काही साहित्यकृतीचे किंवा कवितेचे आवाहन वाचकाच्या, रसिकाच्या मनावर अधिक खोलवर पोहोचते, त्याचे कारण त्याच्या अगोदर किंवा अबोध किंवा नेणीवेमध्ये काही स्मृतींचे अवशेष असतात आणि कवितेतील भावना त्या स्मृतींना आवाहन करतात. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीचे त्याचप्रमाणे एखाद्या समाजाचे अथवा समूहाचे असते. त्याचे सामूहिक नेणीवेमध्ये पारंपारिक आणि भूतकालीन चालत आलेल्या स्मृतींचे व अवशेष शिल्लक असतात.त्याद्वारे एखाद्या साहित्यकृतीची आवाहनक्षमता वाढत जाते. ह्या आधी प्रतिमांना आदीबंध किंवा मूलबंध अशी संकल्पना युंग या मानसशास्त्रज्ञाने योजली आहे. त्यामध्ये नॉर्थप फ्राय यांनी साहित्यकृतीच्या बाबतीत चार ऋतूंचे वर्णन केले आहे. उषःकाल, मध्यान्ह ,सूर्यास्त आणि रात्र त्यालाच जन्म, मिलन ,मृत्यू आणि विलयाची अवस्था यासाठीच वसंत, उन्हाळा, पानगळ आणि हिवाळा असे ऋतू त्यांनी योजले आहेत.

आदीबंधनिष्ठ समीक्षेचा मूलभूत सिद्धांत असा आहे की काव्य ही एक प्रतिकरूप भाषा असून ती मिथ्य, स्वप्न व लोककथा यांच्याप्रमाणेच मानवी मनातील आदिम व सर्वस्पर्शी भाव विश्वाचा अविष्कार करीत असते. त्यामुळेच ती जणू साऱ्या मानव जातीची एक सर्वकालीन, सर्वस्पर्शी व स्वाभाविक भाषा बनली आहे. म्हणून काव्याचे आकलन हे मानवी प्रतीकसृष्टी, काव्यसृष्टीमधील संकेत व परंपरा यांचा यांच्या संदर्भात करून घेणे आवश्यक असते. अशी आदीबंधनिष्ठ समीक्षेची व्यापक भूमिका आहे. अशी मांडणी गंगाधर पाटील यांनी केली आहे. आदीबंधात्मक समीक्षेचा विचार करता त्यामध्ये देव, सैतान, नायक, खलनायक,स्त्री, मातृदेवता, पुनर्जन्म, स्वर्ग, नर्क, प्रवास इत्यादी मूलबंधाचा विचार केला गेला आहे.

मातृत्वाचा आदिबंध

जगामध्ये कोणत्याही मानवी समूहात आई,माता, जननी यांच्या विषयी एक प्रकारचा वात्सल्यभाव, कारुण्यवृत्ती आणि आपल्या पाल्यांवर जीव ओवाळून टाकणारी समर्पणभावना प्रकट होते. अनंत काळापासून याच पद्धतीने मातृत्वाचा आदीबंध उपयोजिला गेला आहे. मानवी जातीच्या सामूहिक नेणीवेमध्ये अबोध मनामध्ये साठलेला ह्या आदीप्रतीमा अनेक वेळा पृथ्वी, नदी,माती,निसर्ग, डोंगर,दरी, अरण्य अशा गोष्टींना निर्देशित करण्यासाठी घेण्यात आलेल्या आहे. स्त्रियांची पुरुषसत्ताक समाजामध्ये होणारी घुसमट सहन करूनदेखील माता समाजासाठी सदैव वात्सल्य,कारुण्य आणि प्रेमाचाच वर्षाव करीत असते. हे मातृत्वाच्या आदीप्रतिमामधून ध्वनीत करायचे आहे. मराठीतील प्रख्यात कवी प्रशांत असणारे लिहितात "वडील म्हणाले दिव्याची वाट थोडी लहान कर मला मला झोप येत नाही/ मुलगा म्हणाला दिव्याची वात थोडी मोठी कर मला वाचता येत नाही./ कधी दिव्याची वात लहान करत कधी दिव्याची वात मोठी करत आई रात्रभर जागत राहिले. आणि दोघांमध्ये वातीसारखी जळत राहिली." येथे दोन पुरुषांमध्ये स्त्रीची होणारी होरपळ निर्देशित झाली आहे. अर्थात या नात्यांच्या बंधनातून मुक्त होऊन केवळ उरणारी स्त्री ही पितृसत्तेने आपल्या अधिपत्याखाली दाबून आणि डांबून ठेवली होते.

नव्याने विचार करू पाहणाऱ्या साहित्यिकांनी, विचारवंतांनी आणि समाजधुरीनांनी स्त्रियांना त्यांनी दिलेल्या अपार कर्तृत्वाविषयी कृतज्ञता दर्शवत आपण उपकृत असल्याची भावना व्यक्त केली आहे. त्यांना स्वातंत्र्य देऊन केले आहे.विंदा करंदीकर यांच्या एका कवितेमध्ये स्त्रियांचे कर्तृत्व आणि त्याच्याविषयीचा अपार आदर व्यक्त झालेला आहे. आयुष्यामध्ये येणारी स्त्री ही संपूर्णता आणि स्वयंपूर्णता घेऊन येत असते. तिच्याकडून सदैव घर सारवण्यापासून तर जीवन सावरण्यापर्यंत सर्वच कर्तृत्व सिद्धीस जाताना दिसतात. करंदीकरांनी ते जपतात या कवितेमध्ये मांडलं आहे."तू घरभर भिरभिरत असतेस; लहानमोठ्या वस्तूंमध्ये/तुझी प्रतिबिंबे रेंगाळत असतात... स्वागतासाठी 'सुहासिनी' असतेस;/वाढताना 'यक्षिणी' असतेस; भरविताना 'पक्षिणी' असतेस;/साठविताना 'संहिता' असतेस; भविष्याकरता

'स्वप्नसती' असतेस;/... संसाराच्या दहाफुटी खोलीत दिवसाच्या चोवीस मात्रा/चपखल बसवणारी तुझी किमया मला अजूनही समजलेली नाही."प्रस्तुत कवितेने केवळ स्त्री जन्माचे कार्य बाहुल्य विशद केले नाही तर तिच्या ठायी असलेल्या अपार क्षमतांचा आणि त्यातही पारंगत असल्याचा विचार आला आहे.अर्थातच इथे एकंदरीत स्त्रीजन्माविषयी उपकृतता व्यक्त करत असताना तिचे कौतुक आणि गौरव केला आहे. हे केवळ स्त्रीच्या मातृत्व रूपातच घडते असे नाही. तर प्रत्येकच रूपामध्ये स्त्री अशी सुहासिनी, यक्षणी, पक्षिणी, संहिता, स्वप्नासती असते. यामधून स्त्रियांच्या अंगी असलेले वात्सल्य,कारुण्य, समर्पणवृत्ती हा स्त्रीच्या कर्तृत्वाचा मूळ गुण आहे हे सिद्ध झालं आहे.ह्यालाच मातृत्व म्हटल्या गेलं आहे.म्हणूनच ह्या गुणविशेषांनी युक्त असलेल्या पुरुषांनादेखील माऊली, माता असे मातृत्वाच्या आशयसूचक प्रतिमांनी गौरविले जाते.

मराठी कवितेत मातृत्व आणि पर्यावरणीय स्त्रीवाद

मराठी वाङ्मयामध्ये कविता विशेष प्रभावी साहित्यप्रकार आहे. त्यामध्ये प्रतिमा, उपमा आणि प्रतिकांचा प्रतिकांचे उपयोजन आणि त्याद्वारे अभिप्रेत आशय मांडणी घडते.मराठी कवितेत मातेवर मातेच्या वात्सल्यावर आणि कारण्य,प्रेमावर अगणित रचना झालेल्या आहेत.मात्र निसर्ग पर्यावरण आणि त्यातील घटकांना जाणीवपूर्वक तर कधी नकळतपणे मातृत्वाच्या आदीबंधातून काव्यामध्ये योजल्या गेलेले आहे. असे दिसते कधी निसर्गप्रतिमांच्याद्वारे स्त्रीचे दुःख अभिव्यक्त झाले आहे. तर कधी निसर्ग आणि स्त्री यांच्यातील शोषण हा समान दुवा पकडून मांडणी करण्यात आली आहे. संजय चौधरी यांच्या कवितेमध्ये अखंड प्रवाहित वाहणाऱ्या नदीच्या मुळाशी कुणीतरी स्त्री प्रचंड दुःख घेऊन रडत बसली असावी असा आशय व्यक्त होतो.तर कल्पना दुधाळ यांच्या कविता संग्रहाचे शीर्षकच 'सिझर कर म्हणतेय माती' असे आहे. गर्भारपणात अवघडलेल्या स्त्रीच्या वेदना आणि मातीमध्ये बी जाऊन कोंब फोडू न शकणाऱ्या मातीची दैन्यवस्था समान पातळीवरील व्यथा असल्याची भावना व्यक्त आली आहे. कल्पना दुधाळ यांच्या कवितेविषयी प्रा.रणधीर शिंदे यांनी केलेले विधान येथे लक्षात घेण्यासारखे आहे."कल्पना दुधाळ यांचे 'सिझर कर म्हणतेय माती' व 'धग असतेच आसपास हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. बहिणाबाई चौधरी यांच्या गाण्याशी नाते सांगणारी नव्या काळाची शेती व ग्रामजीवनाची कविता दुधाळ लिहित आहेत. जागतिकीकरण प्रभाव काळातील रानशिवाराचे त ग्रामजीवनाचे विश्व त्यांच्या कवितेतून प्रकटत आहे.विशेषतः या कवितेत खेड्यातल्या बाईच्या विश्वाकडे नव्या दृष्टीने पाहिले आहे. आई,सखी व कष्टकरी स्त्रीप्रतिमेचा तीमध्ये अधिकांशाने आढळ आहे. खेड्यातील बाईशी संवादरूपातून ती व्यक्त झाली आहे. 'चूल' या कवितेत चुलीच्या संवादातून बाईपणाच्या दुःखाची, कष्टविण्याची व राख होऊन जाण्याची, नाहीसे होण्याची जाणीव व्यक्त झाली आहे. चुलीशी संबंधित प्रतिमारूपाने ती प्रकट झाली आहे, तीस्त्रीच्या यातनेचा,जळण्याचा क्रमशः आयुष्य संपल्याचा (राख भरणे) भाव व्यक्तकरते. 'बाय आणि गाय' या कवितेतूनही स्त्रीशोषणाची जाणीव व्यक्त झाली आहे.

ग्रामसंस्कृतीतील प्रतीकांना गायीच्या बांधलेपणातून विशिष्टत्वदर्शक अर्थ प्राप्त होतो. बाईच्या अनादी दुःखाचा महापट या दुहेरी प्रतीकातून विस्तारतो. वाच्यार्थाने गायीच्यादावणीपासून, बांधल्याचा प्रवासारंभ सुरू होतो आणि बाईच्या दुःखात तो विराम पावतो. या दोहोत एक समानधर्मीत्वाचे नाते स्थापित होते. 'बाई ग तू काय नि मी काय, जन्मभर दावणीला बांधलेलो' असे समान जखडलेपणाचे ती नाते सांगते.बाईच्या नाहीशा होण्यापर्यंत व्यवस्थेविरुद्ध तिला लढावे लागेल असा आशावादही त्यामध्ये आहे. चिकटलेलं रक्तपिपासू गोचीड आणि आणि घोंगावणाऱ्या गोमाशा या प्रतिमा समाजशोषणाचे स्वरूप दर्शवितात. तर कित्येक शतकांपासून 'काळीज फुटेपर्यंत मी धावतच आहे' हे स्त्री दुःखाचे आदिम उच्चारण त्यामध्ये आहे. 'आईच्या पदराखालून' या कवितेत मातृत्वाविषयीचासद्भाव व्यक्त झाला आहे. पदर या शब्दातून ममत्व, आधार, उबेची जाणीव व्यक्त होते. बालपणातील आईच्या स्मरणासारखी रूपे तीमधून दर्शविली आहेत. आयुष्यभराचे तिचे कष्ट, यातना आणि दुःख आणि तरीही संसाराविषयी, मुलाविषयी प्रेमभावाची

जाणीव व्यक्त झाली आहे. 'वठलेल्या झाडाच्या फांद्यांसारखे आईचे हात,' 'वाळलेल्या काटक्यागत राठ बोट' आणि 'कातडी बाजूला सारली तर गळून पडतील काटक्या' या वैशिष्ट्यपूर्ण शब्दप्रतिमांतून बाईच्या सर्व तऱ्हेच्या अभावरहिततेची जाणीव व्यक्त होते."शोभा रोकडे यांच्या कवितेमध्ये माती आणि माता यांचे कारुण्य, उदारता, सर्वांस स्वीकारण्याची वृत्ती, आधारशीलता आणि कायम सर्वांना माफ करत स्वीकारण्याची प्रवृत्ती झाली आहे. "माती... कोंबाचं गर्भाशय/पाण्याचा शांत तळ ग्रीष्मात भेगाळते/पावसाच्या धारा झेलते/बीजाचं दान स्वीकारते/अन् अंकुराला प्रसवते माती/माती गुलाल होते/माती चिखल होते/माती जपून ठेवते/पाऊलखुणा.../वारा येईपर्यंत/माती कधीच/नाही उडत/उडते फक्त बंडखोर धूळमाती पराक्रमाचा/गौरवटिळा होते... पळपुट्यांच्या पाठीशी लागते/माती होते भाद्रपदात गणपती/आश्विनात शारदा, दुर्गा, उंदीर/अन् राक्षसही विसर्जनात ती सोडून देते/अंगी आलेलं देवपण नि तळाशी जाऊन बसते/धीरगंभीर डोहाच्या/दिवाळीच्या दिव्यासाठी/स्वतःला भाजून घेते माती/माती काठ होऊन नदीला सावरते अन् माठ होऊन तृष्णेलाही/माती... पोट फाडून/जीवन देते माणसाला/अन् जीव गेला की पोटातही घेते माणसाला/मातीच सांभाळते.../दगडाचे कठोरपण/पाण्याचे ममत्व/भूकंपाचे, वादळाचे पिसाळलेपण/मातीच घेते पदरात सगळ्यांना.../सगळ्यांची माय होऊन..."प्रस्तुत काव्यातून निसर्गातील माती आणि स्त्री यांचे कर्तृत्व तुलनात्मक पद्धतीने मांडून त्यांची मानवी जीवन आणि संस्कृतीतील जागा चाचपडून पाहत स्थान निश्चित करण्याचे काम कवयित्रीने केले आहे. त्यातूनच स्त्री आणि निसर्गाची सारख्याच पद्धतीने सामावून घेण्याची प्रवृत्ती आणि झिजत जाण्याचे शल्य मांडले आहे. माती किंवा जमीन किंवा भूखंड नसून निसर्ग आणि पर्यावरणाचा अविभाज्य भाग आहे. ती माताच आहे त्यासाठी भूमाता हा संकल्पनात्मक भाग अनेकांसाठी आजही श्रद्धेचा विषय आहे. केशव खटिंग या मराठवाड्यातील कवीच्या सालोसाल या कवितासंग्रहामध्ये आलेली कविता या संदर्भात उल्लेखनीय ठरते.

"वावर म्हणजे नुस्ती जमीन,/नुस्ती लँड नाही हो सरकार,/माझ्या कित्येक पिढ्यांचा भूगोलय, इतिहासय,/सगळी शास्त्र, पुराणं सगळं/सगळंय हो/दुर्बिनीनं नका बघू,/माझ्या नजरेनं बघा ना-नजरेच्या एका टप्प्यात/अख्खं वावर... मला गर्भाशयासारखं दिसतंय माईच्या/अन् तुम्ही अचानक संपादन करणार या आमच्या पुढच्या हजारो पिढ्यांच्या गर्भाशयाचं?"म्हणजे स्त्रीच्या शारीर व्यथा वेदनांचा आदमास घेत आपल्या वेदनांची तीव्रता कवीने मांडली आहे. ज्या आईच्या वेदना तिच्या लेकरांना जाणवतात, त्याच व्यथा आणि वेदना मातीच्या संदर्भात कष्टकऱ्यांना व्यतीत करतात. तोच संदर्भ घेत जमीन संपादित करणे म्हणजे आमच्या आईचं गर्भाशय काढून घेणे आहे ही प्राणांतिक अगतिकता कवीने याद्वारे मुखर केली आहे. जमिनीचे हिरावण्याने,मातीची होत जाणारी धूप, वृक्षतोड नद्यांचे शुष्क होणे, पर्यावरणाची हानी एकीकडे आणि स्त्रियांचे होत जाणारे शोषण एकीकडे या दोघांचा सामायिक बिंदू म्हणजे अपरिमित आणि अगणित असे शोषण होय. मराठी कवितेमध्ये कधी जाणीवपूर्वक तर कधी बेमालूमपणे निसर्ग आणि स्त्री यांच्या व्यथावेदनांना वाचा फोडलेली आहे.

मातृत्वाचा आदिबंध आणि पर्यावरणीय स्त्रीवाद

एकंदरीतच भारतीय साहित्यामध्ये नदी, जमीन, वृक्ष,वनराई, डोंगर, जंगल,ओढा, चंद्रचांदण्या, आकाश यासारख्या प्रतिमांना आई,बाबा,आजोबा, मामा इत्यादी सख्य दर्शवणाऱ्या उपमा,प्रतिमा योजना त्याद्वारे निकटत्वाचा वारसा सांगणारा मार्ग पारंपरिक आणि सांस्कृतिक पर्यावरणाने दिला आहे. त्याद्वारे मराठीतील अनेक कथा कादंबऱ्यांमध्ये नदीच्या माध्यमातून येणारी केवळ आर्थिक सुबत्ता लक्षात न घेता त्यासोबत जुळत जाणारे भावनिक नाते सिद्ध झाले आहे. मराठीतील मनोज बोरगावकर यांची नदिष्ट कादंबरी त्याचेच प्रत्यंतर मानता येईल. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांनी पशुपक्षांशी आणि जंगल, वनराईशी नाती जुळवण्याची दिलेली युक्ती ही पर्यावरणीय जाणीव जागृती पसरवण्याची गुरुकिल्ली मानता येईल. लहान मुलांच्या संगोपनामध्ये चांदोमामा ही संकल्पना रुजवताना आपोआपच पृथ्वी ही त्याची माता आहे हेच त्यामध्ये अधिसूचित केलेले असते.

हिंदी साहित्यातील प्रख्यात कवी केदारनाथ सिंह यांनी एका कवितेमध्ये आईच्या अस्थिविसर्जन केल्यानंतर नदीला केलेली प्रार्थना म्हणजे एका आईने आपल्या दुसऱ्या आईला सांभाळून घ्यावे असा आर्त स्वर त्यामध्ये दिसतो. पर्यावरणामध्ये अनेक ठिकाणी मातृत्वाच्या प्रतिमा असंख्य कवींना दिसतात त्यात ही कविता अधिक स्पष्टता देणारी आहे.

"जैसे दिया सिराया जाता है/कल माँ को सिरा आया भागीरथी में/कई दिनों से गंगा नहाने की
कर रही थी ज़िद/सो, कल भरी दोपहर में/जब सो रहा था सारा शहर कोलकत्ता/मैंने उसे/हथेलियों पर उठाया/और बहा दिया लहरों परजब वह बहती हुई/चली गयी दूर तो ध्यान आया हाय, ये मैंने क्या किया/उसके पास तो वीजा है न पासपोर्ट/जाने कितना गहरा अथाह जलमार्ग हो जल के कस्टम के जाने कितने पचड़े/कुछ देर इस उम्मीद में/शायद कुछ दिख जाए/खड़ा खड़ा देखता रहा जल के भीतर की/वह गहरी अँधेरी जाम लगी सड़क/और जब कुछ नहीं दिखा/तो मैंने भागीरथी से कहा/माँ, माँ का ख्याल रखना,उसे सिर्फ भोजपुरी आती है।"म्हणजे प्रस्तुत कवितेने चेतना गुणोक्ती, अपंहुती सारखे अलंकार साधत नदीला आईच्या मोठ्या बहिणीचा दर्जा देत तिला सांभाळण्याचे आर्जव केले आहे.

मराठीतील ख्यातनाम गीतकार गुरु ठाकूर यांच्या एका गीतामध्ये तर पृथ्वी आणि माता यांचा पर्यावरणीय स्त्रीवादावर भाष्य करणारा प्रतिमा प्रयोग घडला आहे.तो इतक्या बेमालूम आणि चपखल पद्धतीने झालाय की वाचकांना हे आईचे शल्य की पृथ्वीची कैफियत असा संभ्रम निर्माण व्हावा.

"पिचलेला विझलेला टाहो कधी न कुणा कळला। तळमळलीस तू करपुनी हिरवा पदर तुझा जळला। छळ केला पिढीजात तुझा गं उखडून वनराई। अपराध किती झाले पण आता क्षरण तुला आई ।नभ पाझरता दे जलधन सारे बिलगु तुझ्या ठाई । हिरवा शालू देऊ तुझ आई ।उपरतीन आलिया जाण जागर झालया। जरी रुजलो उदरात तुझ्या कुशीत तुझ्या घडलो। स्वार्थाचे तट बांधत सुटलो अन वैरी तुझे ठरलो। चालवूनी वैराचे नांगर नासवली माती। छिन्न तुझ्या देहाची हि चाळण उरला आता हाती।"

मातृत्वाच्या प्रतिमेमध्ये समाविष्ट असलेल्या गुणविशेषणाचे आणि मातेचे स्त्री म्हणून झालेले शोषण प्रस्तुत ओळीतून व्यक्त झालेले आहे. याचाच अर्थ पृथ्वीवर मातेच्या आरोपातून दोन्हींच्या व्यथावेदनांचे कथन अत्यंत अकृत्रिमपणे करण्यात आले आहे.

निष्कर्ष

पर्यावरणीय स्त्रीवादामध्ये शोषण करणाऱ्या पितृसत्तेच्या पर्यायी व्यवस्थेचा शोध अंतनिहित आहे.मराठीतील समीक्षाविचारांमध्ये आदीबंधात्मक समीक्षा ही मानसशास्त्रीय समीक्षेच्या सिद्धांतनांवर उदयास आली. समाजाच्या सामूहिक नेणीवेमध्ये असलेल्या प्रतिमा त्यांचे, सामूहिक स्मृतीकोशामध्ये साठलेले दृश्य किंवा स्मृती म्हणजे आदीबंध होय. यामध्ये अनेक निसर्ग प्रतिमांना आई, माता, जननी अर्थात मातृत्व कल्पून त्यावर मातृत्वाचा आदीबंध योजलेला दिसतो. पूर्वापार चालत आलेल्या प्रथा परंपरांद्वारे स्त्री आणि निसर्ग या दोन्ही सर्जनशील गोष्टींना पितृसत्तेने हिन लेखले किंवा खीसगणतीतही घेतले नाही. त्यामुळे मानव जातीची अपरिमित हानी झाली आहे, त्यामुळेच भविष्यासाठीचे विविध धोके आणि मानव जातीला दुबळेपण आले आहे.पर्यावरणीय स्त्रीवादाने स्त्रियांना एकूणच निसर्ग,पर्यावरण आणि मानव संस्कृतीसाठी केंद्रस्थान दिले आहे.समूहाच्या नेणीवेमध्ये साठलेल्या आदिम प्रतिमांना आदिबंध म्हणता येईल. मातृत्वाच्या आदिबंधाचा प्रयोग मराठी कवितेमध्ये मोठ्या प्रमाणात करण्यात आलेला आहे. पर्यावरण आणि निसर्ग यांच्या संयोगाने उपयोजिलेल्या मातृत्वाच्या प्रतिमा अधिक आशयसमृद्ध आणि अर्थवाही होऊन प्रकट होताना दिसतात. निसर्ग आणि पर्यावरण त्यातील पशुपक्षी, डोंगर,नदी, ओढा, नाला, समुद्र, आकाश इत्यादी प्रतिमा अनेक अर्थाने वापरल्या गेलेल्या आहेत. मराठी कवितेमध्ये मातीसाठी मातृत्वाचा आदीबंध प्रकर्षाने उपयोजिलेला दिसतो. त्याद्वारे मातेच्या व्यथा, वेदना, शारीरसंवेदना अभिव्यक्त झालेल्या दिसतात. पर्यावरणीय स्त्रीवादामध्ये निसर्गाची होणारी हानी

तसेच स्त्रियांचे शोषण या दोन्ही घटीतांसाठी एकच कारक जबाबदार आहे ते म्हणजे पितृसत्ताक विचारपद्धती त्यासाठी आतापर्यंत झालेल्या विकासाचा पुनर्विचार करत भविष्यातील परिवर्तनासाठी पर्यावरणीय स्त्रीवादी विचार दिशादर्शक ठरू शकतो.

संदर्भसूची:

१)समीक्षा संकल्पनाकोश: गंगाधर पाटील
२)सिजर कर म्हणते माती: कल्पना दुधाळ
३)माझं इवलंसं हस्ताक्षर: संजय चौधरी
४) सलोसाल: केशव खटींग
५)शोभा रोकडे यांची कविता
६)केदारनाथ सिंह की कविताये
७)नदिष्ट: मनोज बोरगावकर
८)गुरु ठाकूर यांच्या कविता
९) अर्वाचीन मराठी कविता,प्रस्तावना:रणधीर शिंदे
१०) झपताल (कविता) विंदा करंदीकर

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071



DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

33.	**प्राप्ती महेंद्र गावकर.** मराठी अध्ययनशाखा, शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा, गोवा विद्यापीठ ईमेल - praptimgaonkar@gmail.com मो.नं. ७०३८१७३९०५	गोमंतकीय धालोगीते आणि स्त्रीजीवन	170
34.	**प्रा. डॉ. गणेश दिनकरराव वाघ** ग. भि. मुरारका महाविद्यालय, शेगाव	मराठी कथा व कादंबरी आणि स्त्री	175
35.	**सचिन दगडू धोत्रे** संशोधक विद्यार्थी न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅंड सायन्स कॉलेज, लालटाकी रोड, अहमदनगर ४१४००१ dhotresachin03@gmail.com	मराठी चित्रपटातील स्त्री	178
36.	**श्री. उत्तम विठ्ठल शिंदे** अहमदनगर कॉलेज, अहमदनगर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे	मोहन रणसिंग यांच्या 'ठाकर लोकगीते' या संकलित लोकगीतांमधील स्त्रीजीवन	184
37.	**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे** सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी.ता. गेवराई जि. बीड 8208694037 rameshringne@gmail.com	लोकसाहित्यातील स्त्रीविषयक जाणिवा	188
38.	**डॉ.स्वप्नील राजेश इंगोले,** सहायक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला. मो.७७९८०१४८९४ ईमेल: ingole_swapnil@rdgakola.ac.in	वऱ्हाडी बोलीतील अंगाईगीते: स्वरूप आणि विशेष	192
39.	**महाडिक पल्लवी भास्करराव** संशोधन विद्यार्थी, पेमराज सारडा महाविद्यालय, ता.नगर, जि.अहमदनगर.	शाश्वत जीवनासाठी स्त्रियांचे योगदान	196
40.	**प्रा.सोनिया सावंत** शासकीय महाविद्यालय कला, विज्ञान आणि वाणीज्य, केपे- गोवा.	गोमंतकातील स्त्रियांच्या कथालेखनातील नव्या जाणीवा	199
41.	**श्री जितेंद्र अनिल तरटे** संशोधक विद्यार्थी **प्रा.डॉ. श्री. तुषार चांदवडकर** मार्गदर्शक, आबड -लोढा - जैन महाविद्यालय, चांदवड, जि. नाशिक	'संत साहित्यातील स्त्री विषयक जाणीवा'	206

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

डॉ.स्वप्नील राजेश इंगोले,
सहायक प्राध्यापक,
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.
मो.७७९८०१४८९४
ईमेल:
ingole_swapnil@rdgakola.ac.in

One Day National Inter-Disciplinary Seminar
INDIAN WOMEN: YESTERDAY, TODAY AND TOMORROW
On 30th April, 2024 @
Sant Tukaram Maharaj Mahavidyalaya, Chohotta Bazar, Akot Dist. Akola
In collaboration with
Sanskardeep Pratishthan, Akola

वऱ्हाडी बोलीतील अंगाईगीते: स्वरूप आणि विशेष

ABSTRACT
मानवी मनाचे आणि काव्य,गीतांचे अतूट आणि अनन्य असे नाते आहे. कुठल्याही मनोवस्थेत असलेला मनुष्य अनेकदा आपली भावस्थिती गाण्यांमधून विशद करताना दिसतो. आनंदात असताना किंवा विवंचनेत असताना तशा पद्धतीच्या गीतांमधून तो आपली मनोवस्था अभिव्यक्त करत असतो. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हया निसर्गचेतना बालमनाला अधिक आकर्षित करतात. यामध्ये शब्द तर गीत काव्याचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. अंगाईगीत म्हणजे नवजात शिशुचे आईच्या माध्यमातून शब्द,स्वर आणि संगीताशी आलेले सर्वात पहिले नाते होय. हया मधूनच त्या नवजात शिशुचा संबंध शब्द,स्वर, गीत संगीत यांच्याशी येतो. त्या बालमनाला मुग्ध करणे, गुंगवून आणि गुंतवून त्याच्या मनाची स्थिती एकाग्र करणे या सर्व उद्देशाने, पालनपोषण करणाऱ्यांकडून विशेषत्वाने आईकडून अंगाईगीत गायले जाते.

प्रस्तावना

अंगाईगीतांमध्ये मोठ्या प्रमाणात निसर्ग, त्याचे विविध रूपं,समाजमनात रुजलेले दैवते, लोकदैवते, प्राणी, पशुपक्षी यांचे मोठ्या प्रमाणात उपयोजन केलेले दिसते. अंगाईगीते हे प्रामुख्याने लोकवाङ्मयाचाच भाग आहेत.'पाळण्यास झोके देऊन, हिंदोळून, जोजवून लहान बाळास झोपविण्याची प्रथा जितकी जुनी व पारंपरिक, तितकीच देशव्यापी आहे. माता व बासंगोपन यातील तो एक महत्त्वाचा दुवा असल्याने पिढ्यान्पिढ्या 'पाळणा' मुद्दाम जतन करण्याची पद्धत आजही टिकून आहे.लहान बाळास पाळण्यात झोपवीत असताना त्याची माता वा घरातील अन्य स्त्रिया झोक्याच्या शांत,संथ गतीवर पाळण्याच्या दोरीसमवेत सूर लांबवून, हळुवार आवाजात जे गीत गातात, त्यास 'पाळणागीत'म्हणतात.लहान मुलावरचा पहिला संस्कार म्हणजे त्याचा नामकरणविधी किंवा बारसे. या दिवशी जमलेल्या सुवासिनी 'कुणी गोविंद घ्या, कुणी गोपाळ घ्या' अशा अर्थी, पाळण्यास हलकेसे हलवीत, एकत्रपणे जे गीत गातात त्यासही 'पाळणा' म्हणण्याची पद्धत आहे.

पाळण्याव्यतिरिक्त, मांडीवर हळुवार डोलवून किंवा कुशीत कुरवाळून, थापटून-थोपटून गीत म्हणत, लहान मुलास झोपविण्याचीही पद्धत आहे. अशा गीतास 'अंगाईगीत' म्हणतात.

पाळण्याची हलकीशी गती (लय) व जोडीला अंगाईगीताची धून याने बाळाचे मन व शरीर यांना छानसा आराम मिळून, झोप व विश्रांती तसेच मनःस्वास्थ्य व शरीरस्वास्थ्य हा दुहेरी हेतू साध्य होतो. तद्वत एकलेपणाचे भय असेलच, तर ते नाहीसे होऊन बाळाच्या चित्तवृत्ती एकाग्र होऊन, तल्लीन अवस्थेत त्यासनिद्राधीन करणे सोपे व सोयीचे जाते.'(१) विदर्भातील लोक वाङ्मयाचा विचार करता त्यामध्ये प्रामुख्याने लोकगीत आणि लोककथा दिसतात त्यामध्येही लोकगीत ही लोकांची अभिव्यक्ती असून ती समूह मनाची सामूहिक मांडणी दिसते त्यामध्ये गुलाबाईचे गाणे वऱ्हाडी लग्न गीते

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

याबरोबरच अंगाई गीते ही वऱ्हाडी बोली भाषेमध्ये असून त्यामध्ये निसर्ग लोकदैवते पशुपक्षी आणि कथा प्राकथांचा मोठ्या प्रमाणात समावेश दिसतो. अनेक ठिकाणी महाराष्ट्र म्हणजे कथा किंवा गोष्टी सांगणारा प्रदेश असा उल्लेख प्राचीन मध्ययुगीन वाङ्मयामध्ये येतो आधी एखादी एखादी व्यक्ती गोष्ट सांगू लागताच आपोआपच अनेकांचे कान टवकारले जातात आणि ती गोष्ट ऐकण्याची जिज्ञासा निर्माण होते ही सवय बालपणापासून बालमनाला शिशु अवस्थेपासून लागलेली असते शब्द स्वर आणि त्याद्वारे अभिप्रेत अर्थ पेरण्याची किमया अंगाई गीत अंधारे साधल्या जाते वऱ्हाडी लोकगीतांचा विचार करता त्यामध्ये बोलीभाषा आणि सामाजिक स्थिती गतीचे वर्णन सहजगत्या आलेले दिसते त्याला अंगाई गीते देखील अपवाद नाहीत अंगाई गीतांमध्ये वऱ्हाडी बोलीभाषा येथील सामाजिक पर्यावरण सामान्य माणसांची स्थिती गती निसर्ग चित्र आणि लोकदैवतांच्या कथा येतात त्यामध्ये काव्य मन आकर्षित करणारे असले तरी बोलीभाषा सर्व वैदर्भीय बोलींच्या वैशिष्ट्यांसह आलेली पहावयास मिळते. शेती, माती, गाई म्हशी आमराई वाघ मांजर राम कृष्ण गोकुळ गोवर्धन यासारख्या प्रतिमा वारंवार प्रतिध्वनीत होताना दिसतात.

"हाळ व गाई रामा,
रामाच्या गायी कुठी,
साखर द्याना मुठी" (२)

ह्यासारख्या विदर्भात रुजलेल्या अंगाई गीतांमधून बालमनावर निर्भयतेचा संस्कार करणारे धृपद स्वीकारलेले दिसते. त्याचे गायन करताना त्यामध्ये एक प्रकारची गुंगवून टाकणारी लय ह्या शब्दांच्या जोडीला असते.

वऱ्हाडी अंगाईगीतांची भाषा

मराठी अंगाईगीतांची भाषा अत्यंत साधी, सोपी, सरल आणि तरल असली तरी देखील विलक्षण अर्थवाही आणि भावोत्कट आहे. बालमनावर संस्कार करताना किंवा त्याचे मनोरंजन घडवताना अत्यंत सहजगत्या आणि सरल शब्दांमधून मोठाच संस्कारीयुक्त आशय त्याद्वारे नवजात बालकांच्या मनावर बिंबवल्या जातो. मराठीतील एकंदरीतच अंगाई गीतांचे भाषिक विशेष मांडताना सुचेता बिडकर असे म्हणतात "अंगाईगीतातील भाषा : भाषा साधी, सोपी, सुटसुटीत असून शैली प्रासादिक, भाववाही वातावरणनिर्मितीस पोषक असते. ठरावीक शब्दांची पुनरावृती अटळ असली, तरी ती अर्थवाही व विलक्षण नादोपयोगी असते."(३)ह्या नादयुक्त गीतांमुळे नवजात बालकांवर त्याच्या जाणीव आणि नेनिवेत देखील संस्कार,संस्कृती, दैवते,धर्म, निसर्ग इत्यादी बाबींचे चित्रण सहजगत्या केल्या जाते.

अंगाईगीतांचा आशय

वात्सल्य भाव

अंगाई गीतांचा स्थायीभाव हा बालकांच्या मनावर रुंजी घालून त्याला एकाग्र करणे, गुंगवणे, निद्राधीन करणे हाच आहे. त्यासाठी अंगाई गीत गाणाऱ्यांकडून सहजगत्या वात्सल्य भाव अभिव्यक्त होतो.त्यातील आशयामध्ये सहजता आणि भावोत्कटता पहावयास मिळते. बालकाला उद्देशून 'बाळा,लडिवाळा' यांसारख्या पालुपदांची वारंवारता जाणवते. ह्या द्वारेच आईचे आपल्या बालकासाठी वात्सल्य भाव आणि प्रेमळ वृतीचे दर्शन घडते. आई आणि बालकांमधील लडिवाळ नाते देखील अनेक अंगाईगीतांमधून प्रकट झाले आहे. आईच्या अंगी असलेल्या वात्सल्य वृतीचे दर्शन याद्वारे बालकास होते. बालकांमधील खट्याळ आणि खोडकर वृती यांचे वर्णन विविध अंगाईगीतांमधून आलेले आहे.

बालमनाचे रंजन

अंगाई गीतांमधून बालमनाचे रंजन करणे, त्याला रुंजी घळणेबालमनाला जोजवणे त्याला एकत्र एकाग्र घालणे आणि आराम घडावा म्हणून निद्राधीन करणे असे अंगाई गीताचे प्रयोजन पाहावयास मिळते. त्यामध्ये बालकांच्या मनोरंजनासाठी अनेक कथा, प्राक्कथा, महापुरुषांचे पराक्रम, संस्कार देणाऱ्या गोष्टींचे वर्णन, गाई, पशुपक्षी यांचे मनाला हवेहवेसे वाटणारे वर्णन अनेक अंगाई गीतांमधून आलेले दिसते.

"बाळाच्या गायी आमराईत गेल्या
बाळाच्या गायी गायरानात गेल्या
बाळाच्या गायी गेल्या धसाधसा
बाळाला दूध मिळेल पसापसा
बाळाच्या गायी आल्या गोठ्यात

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

बाळाला दूध मिळाले लोट्यात"(४)

बालकांच्या मनोविश्वातील आणि भावविश्वातील अनेक प्रसंग घटना यांचे वर्णन त्यांच्याच लडिवाळ भाषेमध्ये अंगाईगीतातून प्रकट होताना दिसते. ह्या सर्व बाबींशिवाय अंगाई गीत पूर्णतः पूर्णत्वास जात नाही.

निसर्ग प्रतिमांचे उपयोजन

नवजात बालकांच्या मनावर संस्कार करणारे सर्वात पहिले गीत म्हणून अंगाईगीतांकडे पाहिले जाते. त्यामध्ये जसे देवदेवता, पराक्रमी पुरुष आणि स्त्रिया, धर्म, संस्कार ह्या गोष्टी गोष्टींची उपस्थिती जाणवते त्याचप्रमाणे निसर्ग,पशुपक्षी, पर्यावरण,झाड, वेली, फळे, फुले ह्या गोष्टीही नकळत आणि बेमालूनपणे पेरल्या जातात. ह्या निसर्गप्रतिमांची पेरणी करताना त्यामध्ये नाद आणि लय यांची सुरेल गुंफण जाणवते.

"हाड वं गायी गोठ्यात,
बाळाला दूध दे वाटीत,
बाळाची वाटी मनुताई चाटी,
मनुताई गेली रागाने,
तिला पकडले वाघाने"(५)

अशा काही उदाहरणांवरून अंगाईगीतातील निसर्ग,त्यातील पशुपक्षी, त्यातील शब्दांची नादयुक्त योजना पहावयास मिळते. म्हणजे यामध्ये शब्द, स्वर, कथा, काव्य, नाद, लय या सर्व बाबींचा समुच्चय झालेला पहावयास मिळतो.

पौराणिक कथाकाव्याचे उपयोजन

भारतीय संस्कृतीमध्ये संस्काराचा प्रारंभ हा अजाणत्या वयापासूनच बालमनावर केला जातो. त्याच्या जाणीवनेनिवेमध्ये शुद्ध आचार,विचारांची पेरणी केल्या जाते. त्यासाठी पराक्रमी आदर्श व्यक्तींच्या कथा, प्रसंग कळत नकळत पेरले जातात. लोकसंस्कृतीतील स्त्रीरुपे या ग्रंथात डॉ.कृष्णा इंगोले यांनी " बारसं बाळाच्या आयुष्यातील महत्त्वाचा दिवस, जन्मभर ज्या नावाने तो ओळखला जाणार ते नाव ठेवण्याचा हा दिवस.गवळी नाना आणि हावशा बंधूनं थाटात बारसं करायचे ठरविले. सारं घर फुलातोरणांनी सजविले.नातेवाईकांना निमंत्रण गेली, सोनाराकडून बाळाचे कानं टोचले. मुदी घातली. खोबऱ्याची वाटी फोडली, बाळाला नवीन अंगड टोपडं, कुंची शिवली. सरी बिंदली घेतली. मैनाबाईच्या सासरकडील मंडळी आली.गल्लीतल्या आयाबायांना बोलावंल. गव्हाचा चौक मांडून समोर बाळंतिणीला बसवलं शृंगारलेल्या पाळण्यातबाळाला घालून दोघी सुवासिनीनी 'गोंविद घ्या, गोपाळ घ्या' असं म्हणून उचलून खाली वर केलं.

देवाधर्माची, संत महंतांची नांव ठेवण्याचा काळ होता. अष्टमीला रात्री बारा वाजता जन्मला म्हणून बाळाच्याआत्यानं बाळाच्या कानात 'बाळकृष्ण कुर्र,' 'रामचंद्र कुर्र,' 'शिवाजी कुर्र,' अशी नावं ठेवली. इतरांनी तिच्या पाठीत मारलं. तिला मिठाई दिली. सर्वांना घुगऱ्या वाटल्या. शेवंता माळीनीनं पाळणा गायिला

पहिल्या दिवशी जन्मलं बाळ | कळस सोन्याचा देतोया डहाळ ||
पडला उजेड तिन्ही त्रिकाळ । दिपली नेत्र दोन्ही प्रेमळ ||
कृष्ण जन्मला कंसाचा काळ ॥१॥ जो बाळा रे जो ॥
दुसऱ्या दिवशी दुसरा रंग । रुप सावळं गोरं हे अंग ॥
जसा झळकितो आरशाचा भिंग । नारी पद्मिनी झाल्यात्या दंग ||
तान्हा कृष्णावरी फेकिला रंग ॥२॥ जो बाळा रे जो ॥
तिसऱ्या दिवशी वाजती घंटा | साऱ्या नगरीमंदी आनंद मोठा ॥
सीता सावित्री बायानो उठा || खारीक खोबरं सुंठवडा वाटा ||
आहेव नारीचा आहेव लुटां ॥३॥ जो बाळा रे जो ॥
चवथ्या दिवसी बोलवी बाळी । अनुसयाची वाजी टाळी ।
कृष्ण जन्मला यमुना स्थळी || नाव ठेवले वनवाळी ॥४॥ जो....

असा तिने बारा दिवसाचा पूर्ण पाळणा गाईला. मग रुक्मिणी कांबळेबाईनं रामाचा पाळणा गाईला. त्यातलं एक कडवं असे दहाव्या दिवसी बळी राजा पुजती । नगरीच्या नारी धाऊन येती ॥ गोपाच्या जोडीला बळीराजा घेती ॥ जो बाळा रे जो....बळीराजाची आठवण आमच्या मातामाऊलीनी लोकगीतातून अजून जपून ठेवली आहे."(६)ही नोंद करून प्रत्यक्षात जनमानसात बारसे,त्यातील पौराणिक उल्लेख आणि कथांचा आढावा घेतला आहे.

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

प्रभु श्रीराम, भगवान श्रीकृष्ण, बळीराजा,महात्मा गौतम बुद्ध, छत्रपती शिवराय अशा आदर्श पुरुषांचे जीवन हया बालकांच्या दृष्टीपथास आणून देण्यासाठी अनेकदा अंगाईगीतांचा उपयोग केला जातो महाभारत, रामायण यांसारख्या महाकाव्यातील प्रसंगांचे वर्णन करणारे काव्य देखील अंगाईगीतांमधून प्रकट होते.

समारोप

अंगाई गीतांमधील बहुतांश भाग हा आईचा बाळाशी वात्सल्यभावाने केलेला संवाद असलेला पाहायला मिळतो. गाय,बैल,पशुपक्षी,फळे,फुलेआमराया,शेती,माती,दूध,चारा, गोठा अशा कृषी संस्कृतीशी एकजीव आणि एकनिष्ठ झालेल्या अनेक प्रतिमांचे उपयोजन वऱ्हाडी अंगाई गीतांमधून पहावयास मिळते. वऱ्हाडी अंगाईगीतांमध्ये गाय, तिचे दूध, तिचा गोठा यांची हमखास उपस्थिती बहुतांश अंगाईगीतांमध्ये जाणवते. 'संसाराला आगळावेगळा अर्थ देणाऱ्या बाळाचे मनापासून कोडकौतुक करताना 'घननीळा, वेल्हाळा, मेघश्यामा'; 'लडिवाळा, छकुल्या, सोनुल्या';'चिमण्या, राजसा, मनमोहना'इ. शब्दांनिशी माता बाळाचे अनंत गुणगोडवे गाते, तद्वत कधी 'बागुलबोवा' ची भीतीही दाखवते.शूर, वीर पित्याचे वर्णन किंवा कधी पुराणपुरुषांचे पराक्रमही त्याच्या कानावर जाणताअजाणताघालते. देश वा संस्कृतिपरत्वे त्यांचे संदर्भ कदाचित बदलत असतीलही. पण बाळासमोर गतकाळ उभा करताना त्याच्या आचारविचारांची जडणघडण संस्कारसंपन्न व्हावी व भविष्यात तेही गुणी, कर्तृत्ववान,महापराक्रमी व्हावे ही सुप्त इच्छा व तळमळ त्यामागे दडलेली असते.ग्रामदेवता, कुलदेवता यांना विनवणी होते, की 'बाळाला सुखी, सुखरूप, सुरक्षित ठेव'.कुटुंबातील आराध्य देवतांच्या उपासनेचे प्रतिबिंब त्यात अचूक उमटलेले दिसते.'पाळख पाळणा, मोत्याने विणियेला, मामाने घडीयेला' म्हणताना स्त्रीस्वभावपरत्वे माहेरचा गौरव नकळत डोकावून जातो. तद्वत असे जगावेगळे चित्र रंगवत, माता बाळाच्या भावी सुखसमृद्धीच्या स्वप्नात रंगूनही जाते. 'लक्ष्मीबाईचा पाळणा हलतो नि झुलतो, बाई चिंचेखाली लोंबतो', अशी गरिबीची व्यथा-वेदनाही नकळत प्रगट होते. विनविते :काऊ-चिऊ-माऊ, मोर- पोपट -मैना इ. बाळाचे सगेसवंगडी अंगाईगीतात जमवून, ती बाळाला निजले गोकुळ, निजली कपिला, बाळमुकुंदा, गोविंदारे, बाळा जो जो रे', 'निजली काऊ, निजली माऊ, उद्या त्यास पाहू, बाळा जो जो रे' अशा रचना कोमल वातावरणनिर्मितीत सजीव व बोलक्या होतात.' (७) ही मांडणी यथार्थ वाटते.

मानवी मनामध्ये शब्द, स्वर,काव्य,कथा, इत्यादी बाबींचे बीजारोपण अंगाईगीतच करीत असते.त्यामध्ये सरल, स्वाभाविक तरीही प्रासादिक शब्दांची मांडणी असते. सोपं आणि सरल वाटत असलं तरी त्याला काव्याचे मोल असते.त्यामध्ये कुठला प्रसंग किंवा निसर्गचित्र उभे करण्याचे सामर्थ्य असते. त्या गीतामध्ये बालकांच्या अत्यंत चंचल आणि चपळ मनाला मंत्रमुग्ध करण्याचे गुपित दडलेले असते. म्हणूनच अंगाईगीत हे सरळ, साधे आणि तरल वाटत असले तरी देखील त्यामध्ये कमालीची उत्कटता आणि अनन्य असे सामर्थ्य असते. अंगाईगीतांना केवळ मनोरंजन करणारे, निद्राधीन करणारे गीत म्हणून अव्हेरता येणार नाही. कारण चंचलवृती घेऊन जन्मास आलेल्या बालकाची मनोवृत्ती स्थिर करण्याचे कार्य आणि शब्द, स्वर,कथा, काव्याचा परिचय घडवून तेथील सामाजिक पर्यावरणाचा संस्कार घडवण्याचे महत्कार्य अंगाईगीत करीत आलेले आहेत.

संदर्भ टीपा:

१) *मराठी वाङ्मयकोश, खंड चौथा समीक्षा- संज्ञा,* अंगाई गीत संकल्पना, सुचेता बिडकर , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई.२००२
२) वऱ्हाडी भाषेतील अंगाई गीतांचे संकलन
३) उनि: ,सुचेता बिडकर
४)वऱ्हाडी भाषेतील अंगाई गीतांचे संकलन
५)वऱ्हाडी भाषेतील अंगाई गीतांचे संकलन
६)*लोकसंस्कृतीतील स्त्रीरुपे* डॉ.कृष्णा इंगोले
७)उनि: ,सुचेता बिडकर

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071



DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

9.	**PROF.V.L. KHALATKAR** Head, Department of English, B.B. Arts, N.B. Commerce & B.P. Science College, Digras.Dist. Yavatmal, Maharashtra. *vkhalatkar23@gmail.com*	https://orcid.org/0009-0004-9249-2088	OVERCOMING ENGLISH LANGUAGE FEAR AMONG B.A. III STUDENTS AT B.B. ARTS COLLEGE, DIGRAS	40
10.	**DR. HIRALAL ANNAJI BANSOD** Assistant Professor in English, Yadaorao Poshattiwar Arts College, Talodhi Ba. Dist. Chandrapur *hiraybansod@gmail.com*	https://orcid.org/0000-0002-5533-0264	FREUDIAN INSIGHTS INTO CREATIVE WRITING: INVESTIGATING THE INTERPLAY BETWEEN DAYDREAMING AND LITERARY EXPRESSION	43
11.	**DR. PRASANTA KUMAR DAS** Assistant Professor, Department of Assamese. Kampur College, Nagaon, Assam *prasantakumardasg@gmail.com*	https://orcid.org/0000-0001-6291-4826	A CASE STUDY OF ARTIFICIAL FLOOD ON GUWAHATI FROM BHARALU RIVER: ITS PROBLEMS AND MEASURES	46
12.	**DR. SAGAR NARKHEDE** Research Supervisor, Saraswati Arts College, Dahihanda, Akola. *sagar_sports14@yahoo.co.in* **ABDUL FIROZ ABDUL KHALIQ ANSARI** Research Scholar, Sant Gadge Baba Amravati University, Amravati. *firoz.sports@gmail.com*	https://orcid.org/0009-0000-8598-814X https://orcid.org/0009-0007-8072-2557	STUDY OF ATTITUDE TOWARDS SPORTS OF STUDENTS OF MUSLIM MINORITY AIDED JUNIOR COLLEGES OF AMRAVATI REGION	50
13.	**DR. SWAPNIL RAJESH INGOLE** Assistant Professor, U.G. and Post Graduate Department of Marathi, Shrimati Radhadevi Goenka Women's College, Akola, Maharashtra *ingole_swapnil@rdgakola.ac.in*	https://orcid.org/0009-0009-9166-7735	FEMINISM AND ENVIRONMENTALISM: CONCEPTS, MOVEMENTS AND IMPLICATIONS	54

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

NATURE OF SOCIAL REVOLUTION IN RASHTRASANT TUKDOJI MAHARAJ'S LITERATURE

ORCID Connecting Research and Researchers
https://orcid.org/0009-0009-9166-7735

DR. SWAPNIL RAJESH INGOLE
Assistant Professor,
U.G. and Post Graduate Department of Marathi,
Shrimati Radhadevi Goenka Women's College,
Akola, Maharashtra
ingole_swapnil@rdgakola.ac.in

Received: 18.11.2023 Reviewed :21.11.2023 Accepted: 24.11.2023

ABSTRACT

Rashtrasant Tukdoji Maharaj derived his perspective from astute observations of societal nuances, cultivating a well-informed community. He instilled innovative and reformist endeavors into entrenched customs and traditions, addressing various societal facets like individuality, family, nationhood, and education with effortless solutions. Maharaj denounced societal inequalities based on caste, class, race, gender, and religion, branding untouchability as a national disgrace. His extensive public discourse and literary works encapsulate profound solutions for scholars, showcasing his remarkable social comprehension and problem-solving prowess. Through his literature, he meticulously documented contemporary societal challenges and their remedies, encompassing pre and post-independence eras. Maharaj fervently advocated for eradicating age-old customs, despite their entrenched nature, emphasizing societal evolution. His legacy resonates with a call to dismantle persistent disparities and caste divisions, urging society towards progress and equality.

KEYWORDS: *evolution, customs, progress*

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील सामाजिक क्रांतीचे स्वरूप

प्राचीन आणि मध्ययुगीन संतांच्या प्रबोधन पर्वाला आधुनिक भारतामध्ये अविरत चालू ठेवण्याचं कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कर्मयोगी गाडगे महाराज यांनी केले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील यावली शहीद या गावी **30** एप्रिल **1909** या दिवशी झाला.

'पैदा हुवा इस देह हमे सारा उडा घर बार है ।
आयीं हवा वक्त ही बंधन से बेडा पार है ।
माँ बाप कहते थे मुझे कदम नही तेरे स्थिर है ।
पैदा ही होने से तेरे पीछे लगी फिर है फिर है।'

जन्मताच मला निसर्गाने घराच्या बंधनातून मुक्त केले. अर्थात माझ्या जन्माच्या वेळी छप्पर उडाले असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात. राष्ट्रसंतांचे बालपणी 'माणिक' असे नामकरण माधानचे प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज आणि अकोटचे हरिबुवा यांनी केले अत्यंत हालाखीच्या आणि दयनीय परिस्थितीमधून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी 'माणिक ते तुकडोजी' असा प्रवास केला. त्यांचे सद्गुरु आडकोजी महाराज हे राष्ट्रसंतांच्या आजोळी म्हणजेच वरखेडला राहत असत. त्यांची अवस्था विदेही होती. त्यांच्या कृपाशीर्वादाने राष्ट्रसंत भजन काव्य लिहू लागले. अशी ग्वाही राष्ट्रसंत स्वतः देतात. गुरूंच्या समाधीनंतर राष्ट्रसंत साधना पर्वासाठी राम दिघी, रामटेक आणि

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

ताडोबाच्या अरण्यामध्ये निघून गेले. तेथे काही साक्षात्कार झाल्यानंतर राष्ट्रसंत समाजजीवनात परत आले. त्यानंतर प्रबोधन ,समाज संघटन आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी योध्या संताचे कार्य केले.

अनिष्ट प्रथांवर प्रहार करून अपेक्षित परिवर्तनाला चालना दिली. "आम्ही क्रांतीचे वीर गडी , नीट करू बिघडली घडी ।" अशी प्रतिज्ञा घेत राष्ट्रसंतांनी समाज जीवनामध्ये सुधारणांचा चंग बांधला. त्यांच्यावर काही लोकांनी अंधश्रद्ध म्हणून तर काही लोकांनी धर्म विध्वंसक म्हणून टीका केली. मात्र राष्ट्रसंत तुकडोजी महाराज त्याला न जुमानता आपल्या प्रतिज्ञेशी कर्तव्यकठोर राहिले.भारतीय स्वातंत्र्य चळवळ मध्ये **1942** च्या आंदोलनात त्यांना शंभर दिवसापर्यंत नागपूर आणि रायपूरच्या तुरुंगामध्ये राहावे लागले. यावली, आष्टी, चिमूर येथील रणसंग्रामाचे प्रणेते म्हणून त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीसह सामाजिक सुधारणांमध्ये विशेष योगदान दिले आहे. शंभर दिवस तुरुंगात घालून महाराज परत आले. महाराजांचे भाषणे आणि भजने इंग्रजांच्या जुलमी शासनाला सुरुंग लावण्याच्या हेतूने भारलेले होते

'अब काहे को धूम मचाते हो दुख्वा कर भारत सारे।
आते है नाथ हमारे।
झाडझडुले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना,
पत्थर सारे बॉम्ब बनेंगे ,
नाव लगेगी किनारे।
आते है नाथ हमारे ।'

अशा भजना मधून एकाच वेळी भारतीयांना लढण्याचा विश्वास आणि जुलमी इंग्रजी राजवटीला आव्हान देण्याचे कार्य राष्ट्रसंत तुकडोजी करीत होते.

वर्ष **1965** ला पाकिस्तानी भारतावर केलेल्या याप्रसंगी देशांतर्गत तणाव वाढण्याची अधिक शक्यता होती. राष्ट्रीय एकतेला बाधा येण्याची सर्वात अधिक शक्यता होती. हिंदू मुस्लिमांमध्ये संघर्ष होऊ नये म्हणून राष्ट्रसंत दक्ष होते.' वर्तमान युद्ध हिंदू मुसलमान धर्मो में अथवा धर्मावलंबीयो न होते हुए ,धर्मनिरपेक्ष हिंदुस्तान और युद्धपिपासू पाकिस्तान में है । दुनिया में सतपक्ष और असतपक्ष सदा सें ही रहे है । उस के लिए केवल आत्यंतिक अहिंसा कभी उपयोग मे नही आती। ' असे विचार व्यक्त करुन राष्ट्रसंतांनी युद्धाची अंतर्गत बंडाळीची शक्यता मोडीत काढली. भारत-पाक युद्धाच्या वेळी महाराजांनी राष्ट्रजागृती दौरा काढला.

जातीअंताची चळवळ असेल किंवा मंदिर प्रवेश आंदोलन असेल यामध्ये ते अग्रस्थानी होते . वरखेड मंदिर प्रवेश सत्याग्रह आणि साने गुरुजींचे पंढरपुरातील मंदिर प्रवेश सत्याग्रह या सर्वांमध्ये तुकडोजी महाराज अग्रस्थानी होते.

"तुकड्यादास म्हणे आम्ही हो बेजात ।
आत्म्याची जात लागू आम्हा।"

ही त्यांची जाती निर्मूलनाची पहाट पाहण्याची तीव्र इच्छा होती .भारत देशातील महाराष्ट्र राज्यास संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाते कारण महाराष्ट्राच्या प्रबोधन आणि परिवर्तनाच्या चळवळीमध्ये भक्ती चळवळींचे विशेष योगदान आहे .मराठी मनांवर संत विचारांचा एक सामाजिक संस्कार आजतागायत जिवंत आहे असे दिसते .विविध पंथ जसे भागवत संप्रदाय ,महानुभाव संप्रदाय, दत्त संप्रदाय , नाथ संप्रदाय आणि पुढे समर्थ संप्रदाय इत्यादी आहेत. भागवत संप्रदाय म्हणजेच वारकरी पंथाने बहुतांश तर महानुभाव पंथाने काही अंशी तत्कालीन विषमतेवर अस्पृश्यतेवर टीका केलेली पहावयास मिळते .जसे सर्वज्ञ श्री चक्रधर यांनी

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

आपल्या अनुयायांना "महारवाडा होऊनच धर्म काढावा" असा दंडक घालून दिला होता तर ज्ञानेश्वरांनी "भूता परस्परे जडो |मैत्र जीवांचे" असे पसायदान मागितले आहे .संत तुकारामांनी "भेदाभेद भ्रम अमंगळ" असे आपले ब्रीद मांडले आहे ."एकमेका लागती पायी रे "ही आपली परंपरा सुद्धा सांगितली आहे .याच विषमतेचा प्रखर विरोध करणाऱ्या आणि समतेचा पुरस्कार करणाऱ्या संताच्या यादीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे नाव क्रमाने घ्यावे लागते .स्वातंत्र्यपूर्वकाळात अस्पृश्यता निवारण्यासाठी ,विषमता निर्मूलनासाठी अनेक चळवळी सक्रिय होत्या. "ख्रिस्त मोहम्मद मांग ब्राह्मणासी | धरावे पोटाशी बंधू परी |मानवाचा धर्म सत्य आहे एक| भांडणे अनेक कशासाठी|" हा ध्यास महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून घेतला होता .ब्राम्हो समाज, आर्य समाज ,महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा, विदर्भातील गणपती महाराज यांची 'अजात ' चळवळ ही जाती आणि विषमतेच्या अंताच्या ध्यासाने भारलेली होती .

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी 'भजन' या प्रकाराचा जनप्रबोधनासाठी प्रभावी वापर केला. त्यांचा सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय सहभाग असायचा. स्वातंत्र्याचा लढा, भूदान चळवळ या त्यांच्या खंजरी भजनाने प्रेरणा निर्माण केली होती. त्यातूनच मोठ्या प्रमाणावर जनभावना संकलित झाली म्हणूनच डॉ. श्री.भा. वर्णेकर म्हणतात "मध्ययुगीन संतांच्या साहित्यातील सारी वैशिष्ट्ये विसाव्या शतकातील राष्ट्रसंतांच्या साहित्यात आहेत यात वाद नाही; पण राष्ट्रसंत श्रेष्ठ संत होते तसे ते श्रेष्ठ प्रतीचे राष्ट्रकार्य करणारे समाजधुरीण होते. " केवळ संत साधू म्हणून ते लोकांमध्ये प्रबोधन करत नव्हते तर त्यांचा व्यवहार देखील तसाच उक्तीस साजेसा होता .भारतीय भक्ती चळवळींचे संचित काही असेल तर ते 'आध्यात्मिक लोकशाही' हेच आहे .समता व बंधुता यांचा काही प्रमाणात प्रचार व स्वीकार झाला होता. एवढे होऊनही समाजात जात, पंथ ,संप्रदाय, वर्ण, वर्ग ,वंश, लिंग, आर्थिक परिस्थिती या बाबींवरून विषमता अधिक बोचरी व टोकदार होत आहे .हे पाहून राष्ट्रसंतांनी त्यावर कठोर हल्ला चढवला आहे. विषमतेच्या जाणिवा एखाद्या समूहास आणि त्यातील व्यक्तींना सर्वस्वी संपवून टाकत असतात .म्हणून राष्ट्रसंत समता व बंधुता या जीवनमूल्यांचा आग्रह धरतात ."आपल्या लोकसमाजाची परंपरागत धर्मदृष्टी आणि आधुनिक लोकशाहीचे नवे तत्वज्ञान या दोहोंचा मेळ राष्ट्रसंत मोठ्या कौशल्याने घालतात. "असे ग .ञ्यं .माडखोलकर म्हणतात.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी जनप्रबोधनासाठी 'खंजरी' हे वाद्य ,'भजन' हा लोकसंगीताचा प्रकार आणि 'बंधूतेचे' तत्वज्ञान अत्यंत प्रयोगशीलतेने वापरलेले आहे .समूह व सलोख्याची भावना विश्वकल्याणाचा हेतू साध्य करू शकते .जातीजातींमध्ये झालेले तुकडे एकत्रित करण्याचे स्वप्न राष्ट्रसंत पाहतात. पंथातील विद्वेष, धर्माधर्मांमधील वितंड, जातींमधील विखार, लिंगाधारित विषमता आणि आर्थिक मागासलेपण वरून होणारी अवहेलना या सर्वांवर राष्ट्रसंत आपल्या लेखणी, वाणीतून परखड टीका करताना दिसतात. 'सबका सन्मान करे 'हे त्यांचे ब्रीद होते तर 'मानव बनने जो चले उनकी हूं मैं शुभकामना 'हा त्यांच्या लेखणीचा ध्यास होता.

मानवी समूहातील बहुतेकांना कुठल्यातरी धर्मभावनांचा वा पंथ ,दैवतांचा मानसिक आधार हवा असतो. त्यातूनच आम्हीच व आमचे म्हणणे, मानणे श्रेष्ठ आहे, इथपर्यंत ठीक आहे मात्र इतरांना तुच्छ वा कनिष्ठ समजण्यातून विद्वेषाची भावना निर्माण होते .कधी कधी तर ही भावना विकोपाला जाऊन सामाजिक आरोग्यासाठी धोका पोहोचत असतो.म्हणूनच राष्ट्रसंत केवळ उपदेश करून वा काव्य करून थांबले नाहीत तर 'सक्रिय पाठ- सामुदायिक प्रार्थना' त्यावर उपायही सांगितला आहे.

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

" किती पण भिन्न जाहले |
येणेची राष्ट्र नासले |
हा मिटवता गलबला जागु या,
आपल्या माणुसकीला |
बंधुनो प्रार्थने चला| "

विकोपाला गेलेला पंथाचा वाद राष्ट्रविघातक ठरतो याचे भानही राष्ट्रसंत देतात. तुकडोजी महाराज अशा मंदिराची पायाभरणी, उभारणी करतात ,ज्यामध्ये कुठलाच भेद केला जात नाही .'आम्ही न कोण्या पंथाचे पण सर्व पंथ ही आमचे' आहेत हा उदार विचार ते अंगीकारतात. धर्म ,पंथ ,गट,तट मिटवायचे असतील तर "धर्म पंथ यांचे भांडण | न मिटे ऐक्य प्रेमाविण"असा समन्वय साधणारा उपाय राष्ट्रसंत सुचवतात काहींना बंदी आणि काहींना संधी असा देव व त्यांचे घर राष्ट्रसंत त्यांना मान्य नाही.

"सबके लिए खुला है मंदिर ये हमारा|
मतभेद को भुला है मंदिर हमारा |"

अशा प्रार्थनास्थळी सर्वांना खुल्या मनाने येण्याचे आवाहन राष्ट्रसंत करतात.

ब्राह्मण ,क्षत्रिय ,वैश्य आणि शूद्र ही वर्णव्यवस्था प्रचलित होती. यातूनच निर्माण झालेल्या जातीला त्या समूहाचा व्यवसाय हा तेवढा आधार होता जाती व वंशावरून कोणी श्रेष्ठ व कनिष्ठ असू शकत नाही ,हा विचारच नुरला होता. एखाद्या प्राण्यापेक्षा ही वाईट स्थिती मानवाने मानवाची केली होती. 'नरेची केला किती हीन नर' याची जाणीव पदोपदी होत होती .म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारत होते 'भेदभाव कशाला माणसा-माणसात रे? 'बंधूभावना वाढीस लागेल तरच समाज एकसंध राहील. अन्यथा त्याचे शकलं शकलं पडून तो खंडित होईल .

"सर्वची माझी भावंडे ही ,
परस्परांच्या कामी सगळी| उचनीच मग का समजुनी|
दुखविता मन सळसळा| बोलला भारत दाटुनी गळा |
करीता भेद असा सगळा |"

जातीच्या विखाराचा चटका समाजात वावरण्याचा आत्मविश्वास हिरावून घेत असतो. तथाकथित उच्च जातीत जन्म झाल्याचा अभिमान बाळगणारा यांना राष्ट्रसंत समजावतात 'मानव का गौरव जाती नही, धनद्रव्य नही, अधिकार नही 'तर समाजाच्या मानवाच्या जातीचा गौरव काही असेल तर परस्पर सामंजस्य व बंधुभाव जपणे वृद्धिंगत करणे .अस्पृश्यता हा राष्ट्राच्या आणि संस्कृतीच्या माथ्यावरील कलंक आहे तो मिटवला पाहिजे राष्ट्रसंतांचा उद्देश होता. "स्पृश्यास्पृश्य हटे यह सारा ,देश कलंक मिटाने" हा देश तेव्हाच निष्कलंक होईल जेव्हा तो समता व बंधुता या तत्वास आचरणे प्रारंभ करेल .ही भावना राष्ट्रसंतांच्या अशा असंख्य भजनात प्रगटते.

तीर्थक्षेत्र बग्गी यात्रेमध्ये महाराजांनी अस्पृश्य मानले गेलेल्या तत्कालीन जातीतील काही लोकांच्या पंगती वाढल्याने तेथे उपस्थित असणाऱ्या एका गृहस्थाने त्यांना हा अधर्म होत असल्याची त्यांना सूचना केली तेव्हा राष्ट्रसंत त्यांना म्हणाले की हा अधर्म नसून हा युगधर्म आहे.असे ठणकावून सांगितले होते.

स्त्री पुरूष यांच्यामध्ये प्रारंभापासूनच उपभोग्य वस्तू व उपभोक्ता हाच संबंध होता. व्यक्ती म्हणून स्त्रीचे महत्व पुरुषसताक व्यवस्थेने कधी मान्य केलेच नाही 'बाई 'नावाचा 'माणूस 'समजून घेताना आज एकविसावे शतक उजाडले तरी ही बाईला माणूस म्हणून 'पुरुष' समजून घेताना दिसत नाही. प्रगतीचे इतके पाऊल टाकून आल्यानंतरही स्त्रियांना जीव मुठीत घेऊन जगावे लागते .लाभाचे ,अधिकाराचे ,प्रतिष्ठेचे पद पुरुषांकडे आणि जिकिरीचे,जबाबदारीचे आणि कष्टाचे कर्तव्य स्त्रियांकडे हीच हिस्से वाटणी समाजात चालताना दिसते .

"स्त्रियेसी मानावे अभद्र|

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

मुलगी जन्माताचीदळभद्र।
वय वाढण्याची मानावे शुद्र ।
हा दुष्टपणा समाजाचा ।।"

असे ग्रामगीतेच्या महिलोन्नती अध्यायात राष्ट्रसंत लिहितात . माणूस म्हणून मान्यता मिळण्यापासूनही स्त्रियांना वंचित ठेवणे योग्य नाही ." मिळो बहुमान मातांना ,जसा देशात पुरुषांना "असा राष्ट्रसंतांचा आग्रह आहे. मातृत्वाचा पराक्रम त्याचा योग्य सन्मान व आदर राष्ट्रसंत एका भजनात मोठ्या धाडसाने व नाट्यात्मक प्रसंगाने समजावतात.

"बाईंनो, अबला म्हणे कुणी ,
धरुणी त्याच्या मनगटा,
तुकड्या म्हणे सांगा तया तुझा जन्म फुकटची होई का
,देश अबलेचा की तुमचा हा भेद कुणी पाही का।"

स्त्रीचा एक मुलगी, माता ,बहीण म्हणून रक्षण करण्यापेक्षा एक माणूस म्हणून तिचे अस्तित्व मान्य करणे व स्वातंत्र्याची संधी देणे समतेसाठी गरजेचे वाटते. मानवी भावभावना मनोव्यापार निर्मिती व्यवहार हे आर्थिक पार्श्वभूमीवर अवलंबून असतात असे कला व्यवहारात 'पाया-इमला' सिद्धांत सांगतो मात्र समाजात आर्थिक स्थिती बहुदा निवडक लोकांची समजूत असलेली पाहायला मिळते .शेतकरी मजूर कामगार व्यापारी अधिकारी भांडवलदार यांचे आर्थिक स्थिती भिन्न असते त्यांच्यात न्यूनगंड झाल्याने समाजात विद्वेषाची बीजे पडतात. एक कुपोषणाने आणि एकाचे अतिपोषण करतो. म्हणून राष्ट्रसंत म्हणतात

" एकाच्या महालात फुलतात बागा ।
एकास धड नाही राहण्यास जागा ।
अन्नासाठी फिरतो नागवा ।
देशात समता नांदवा,
ग्रामजयंतीचा मंत्र घ्या हो नवा।"

देशात समता व बंधुत्व नांदवण्यासाठी आर्थिक समानता प्राधान्याने आवश्यक ठरते. म्हणूनच अधिक आर्थिक विषमता असलेल्या समाज हा सहजीवनासाठी असमर्थ ठरत असतो. "नांदोत सुखी, गरिब, अमिर एक मतांनी" हा राष्ट्रसंतांचा आदर्शवाद आहे. मात्र अशक्यप्राय कोटीतील वाटत नाही. "काया ,वाचा ,बुद्धी ,प्राण हे तो आहे गावाचे धन "जे जे म्हणून आमचे आहेत ते सर्व समूहात व्हावे .अत्यंत गरीब वा श्रीमंतीस राष्ट्रसंत समाज समाजरचनेतील विकृती मानतात .म्हणून समतेचा संस्कारच बंधूत्वाची संस्कृती निर्माण करू शकेल. हीच आजची क्रांती आहे. म्हणूनच क्रांतीची हाक आली आहे असे राष्ट्रसंत म्हणतात. गाव समाजातील कुठल्याही कारणावरून होणारा भेदभाव मिटून तो समन्वयाने सामंजस्याने व सहकार्याने बरा व्हावा .जात ,धर्म ,लिंग ,वंश आर्थिक स्थिती ही विषमतेस वाव देणारी असू नये.

गावागावाशी जागवा।
भेदभाव समोर मिटवा।
उजळवा ग्रामोन्नतीचा दिवा।
तुकड्या म्हणे।।

मुळासहीत भेदभाव संपल्या वाचून ग्राम उन्नतीची आशा पल्लवित होऊ शकत नाही. वैश्विक शांतीसाठी सुद्धा हेच अर्थात दुरावा मिटणे अत्यावश्यक आहे. विश्वशांतीचा मार्ग ही सामंजस्य व समन्वयातून जातो. असा इतिहास आहे आणि निसंकोच भविष्य असणार आहे.

समारोप

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा समाजातील सूक्ष्म घटनांच्या निरीक्षणातून दृष्टिकोन घडला होता. त्यांचे समाज वाचन सव्यसाची होते. त्यांनी समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा यांच्यावर समाजोपयोगी नाविन्यपूर्ण आणि सुधारणावादी उपक्रमांची कलम रोपित केली. सामाजिक घटक समजून घेताना त्यामध्ये व्यक्ती, कुटुंब ,राष्ट्र, समाज, विवाह, संस्था, जन्म, मृत्यू ,बालसंस्कार, शिक्षण, व्यवसाय आणि अर्थव्यवस्था आदी बाबींचे चिंतन

ISSN : 2231 4377
(Peer Reviewed Journal)

वर्ष : १३ वे अंक : दुसरा
जुलै – ऑगस्ट – सप्टेंबर २०२३


दालनी प्रकाशन
पुणे-५८.

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच
संपादक : प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन

डॉ. आ. ह. साळुंखे साहित्य विशेषांक




वितरण क्षेत्र : * राज्य : पश्चिम बंगाल (कलकत्ता), उत्तर प्रदेश (वाराणसी), कर्नाटक, गोवा, गुजरात (बडोदा), तेलंगणा (हैद्राबाद)
* जिल्हा : पुणे, अहमदनगर, नाशिक, मुंबई, ठाणे, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, यवतमाळ, लातूर, परभणी, जालना, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, नांदेड, जळगांव, धुळे, नंदूरबार, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम

अं|त|रं|ग

*	डॉ.आ. ह.साळुंखे (तात्या) : विवेकी दीपस्तंभ	प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन (पुणे)	०२
१.	डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या ललित लेखनातील जीवनविषयक तत्त्वज्ञान	प्रा. डॉ. सुहासकुमार बोबडे (कराड)	०४
२.	'आ. ह.' : एक बुद्धफूल	महावीरभाई जोंधळे (पुणे)	०९
३.	दाहक व्यथेचा एक सौम्य अविष्कार : तुळशीचे लग्न : एक समीक्षा	प्रा. डॉ. सदाशिव पाटील (पुणे)	१५
४.	विवेकी सिद्धांत आणि आ. ह. !!	प्रा. इंदुमती जोंधळे (पुणे)	२२
५.	मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती : समर्थ प्रतिवाद	प्रा. डॉ. सुधाकर शेलार (अहमदनगर)	२४
६.	डॉ. आ.ह. साळुंखे यांची धर्मशास्त्रातील स्त्री–समीक्षा	प्रा. डॉ. जितेंद्र पांडुरंग कदम (खटाव)	२९
७.	चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये, म्हणून! भावी पिढीसाठी चे मार्गदर्शक तत्त्वज्ञान	प्रा. डॉ. गणपतराव ढेंबरे (जळगाव)	३२
८.	डॉ. आ. ह. साळुंखे यांची 'तुकोबा' चिंतन	प्रा. डॉ. स्वप्नील राजेश इंगोले (अकोला)	३८
९.	डॉ. आ. ह. साळुंखे यांचे बौद्ध साहित्याला योगदान	प्रा. अमित मेधावी (कोल्हापूर)	४५
१०.	वर्णवर्चस्ववादी कल्पित बखरकाराची खबर	प्रा. डॉ. रणधीर शिंदे (कोल्हापूर)	४९
११.	भूमिकेशी सुसंगत भाषाशैली	प्रा. हयातमहंमद पठाण (सोलापूर)	५४
१२.	आ.ह. साळुंखे यांचे चार्वाक आणि संत तुकाराम	प्रा. डॉ. ज्ञानेश्वर भोसले (पालघर)	५९
१३.	डॉ. आ. ह. साळुंखे : धर्मांची चिकित्सा करणारे आणि धर्माची संहिता लिहिणारे लेखक	प्रा. डॉ. माधव पुटवाड (अमरावती)	६५
१४.	आ.ह.साळुंखे यांचे मनुस्मृती विषयक विचार	प्रा. डॉ. विकास बापूराव बहुले (पुणे)	८४
१५.	सर्वोत्तम भूमिपुत्र: गौतम बुद्ध या ग्रंथातील काही बौद्ध स्त्रीव्यक्तिरेखा	प्रा. डॉ. प्रशांत गायकवाड (हातकणंगले)	८८
१६.	प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या साहित्यात आलेले आर्थिक विचार: एक विश्लेषणात्मक अभ्यास	प्रा. डॉ. विजयकुमार वावळे (नाशिक)	९२
१७.	धर्मचिकित्सा व मिथकचिकित्सेचा फुले–आंबेडकरी वारसा – डॉ. आ. ह. साळुंखे	डॉ. रवींद्र श्रावस्ती (सांगली)	१०१
१८.	डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या साहित्यातील शैक्षणिक विचार	प्रा. डॉ. जयश्री शिंदे–गायकवाड (हातकणंगले)	१०५
१९.	आ. ह साळुंखे यांनी 'नवभारत'मधील लेखांतून केलेली इहवादी, विवेकनिष्ठ धर्मचिकित्सा	प्रा. डॉ. महेश गायकवाड (सातारा)	११५
२०.	इतिहासाच्या पुनर्मांडणीत आ.ह. यांचे योगदान	ॲड. डॉ. सुचित्रा घोगरे–काटकर (सातारा)	१२१

डॉ. आ. ह. साळुंखे यांचे 'तुकोबा' चिंतन



प्रा. डॉ. स्वप्नील राजेश इंगोले
सहायक प्राध्यापक,
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.
दूरभाष : ७७९८०१४८९४
ingolešswapnilrdgakola.ac.in

> **"महाराष्ट्रीय लोकांच्या भावविश्वाचे एक अतूट, अविभाज्य अंग बनले. त्यांचे अभंग ही या लोकांच्या संस्कृतीला फुटलेली ताजी, टवटवीत पालवी ठरली. त्यांचे आचारविचार हे या लोकांच्या दृष्टीने निरामय, निरागस आदर्श ठरले. स्वाभाविकच, या काळात या लोकांनी त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव केला. हे प्रेम इतके उत्कट होते, की अक्षरशः असंख्य कुटुंबांनी या तुकारामांच्या पाठोपाठ आपल्याही घरात एका नव्या तुकारामाचे अस्तित्व बहरावे, असे स्वप्न पाहिले."**

आ.ह.साळुंखे हे परिवर्तनवादी चळवळीचे महत्त्वाचे भाष्यकार आणि प्रवक्ते आहेत. विवेकी विचारधारा जनमानसात रुजवण्यासाठी त्यांनी वाणी आणि लेखणी अनेक वर्ष उपयोजिली आहे. उभी हयात प्रबोधन आणि लोक जागरणासाठी वेचली आहे. जगद्गुरु तुकाराम महाराज ह्यांची जनमानसामध्ये भोळसट, साधाभोळा आणि व्यवहारशून्य अशी प्रतिमा काही लोकांनी जाणीवपूर्वक रुजवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र आ.ह. साळुंखे यांनी ह्या बाबीला आपल्या लेखनातून, विवेचनातून आणि वक्तृत्वातून कडाडून विरोध करत प्रयत्नपूर्वक तुकारामांच्याच दाखल्यांनी तुकारामांचे जीवनचरित्र कसे शूरत्व, व्यवहारचातुर्य आणि करुणेने ओतप्रोत भरलेले आहे ते दर्शवून दिले. जनसामान्यांसाठी मेनाहूनही मऊ असणारे तुकोबा कटकारस्थानी आणि दिशाभूल करणाऱ्या लोकांसाठी वज्रास भेदणारे आहेत. अत्यंत करुणा आणि दयाभाव असणारे तुकोबा, अन्याय करणाऱ्या लोकांसाठी खड्गाधारी आहेत. ही मांडणी जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या चरित्र आणि काव्याविषयी, त्यातही प्रामुख्याने काव्याविषयी तात्यांच्या लेखनामध्ये आढळते. तुकोबांचे व्यक्तिमत्त्व कमालीचे आत्मनिष्ठ होते. आपल्या ज्ञानाचा, वाणीचा, अभंगाचा झरा साक्षात ईश्वरी स्फूर्ती हाच आहे अशी त्यांची धारणा होती. फार मोठी किंमत देऊन त्यांनी हा अनुभव घेतला होता. म्हणून आपण श्रुतीचे अंकित नसून साक्षात ईश्वराशी संबंध असल्याच्या खात्रीपोटी आणि वेदांचे अध्ययन न करताही तुकोबांनी वेदांची खंडे निवडण्याचे धाष्टर्य ईश्वरी प्रसाद लाभल्याच्या डोळस अनुभवामुळेच केले. अशा निमित्ताने दिसणारे वेद व त्यांच्या विचारातील अर्थसाम्य मूळ वेद नसून वेदांचे जे मूळ म्हणजे ईश्वरच आहे अशी त्यांची धारणा होती. ईश्वरानेच आपली निवड केली आणि आपल्याला अभिषिक्त केले अशी बेडर भूमिका म्हणूनच ते घेऊ शकले.[१]

महाराष्ट्रामध्ये जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंग, काव्याची दि.पु. चित्रे, सदानंद मोरे, किशोर सानप, दिलीप धोंगडे विचारवंतांनी मांडणी केली आहे .त्यातही शैली, अभिव्यक्ती, आशय आणि प्रतिपाद्य विषय या अंगाने ती मांडणी आहे. आ.ह.साळुंखे यांच्या विवेचनामध्ये जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगाचे वर्गीकरण केले असून त्याचे आशयसूत्र शोधण्याचे काम तात्यांनी केले आहे. त्यातील विद्रोही तुकाराम, तुकारामाचे अभंग शतक, तुकारामांचा शेतकरी, न सरे ऐसे तुकोबाचे दान, तथागत बुद्ध आणि संत तुकाराम ह्या ग्रंथांच्या आधाराने तात्यांच्या अन्वयार्थाची अपूर्वता अर्थात व्यवच्छेदकता दृष्टीपथास येते. डॉ. साळुंखे हे संस्कृतचे ख्यातकीर्त अभ्यासक आहेत. ते समृध्द आणि समजूतदार व्यक्तिमत्वाचे धनीही आहेत. त्यांनी 'चार्वाक , हिंदु संस्कृती आणि स्त्री', 'वैदिक धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी' अशा ग्रंथामधून आपला अभ्यास मांडला आहे. आजवर अनेक अभिजनांनी केवळ आपल्या हिताला केंद्र करुन लेखन केलेले आहे. अलीकडच्या काळात या सर्व मांडण्यांचे, संहितांचे अत्यंत मूलगामी पातळीवरुन Deconstruction ही झालेले आहे. होत आहे. देशातील एकूणच बहिष्कृत वैचारिकदृष्ट्याही आणि भावनिकदृष्ट्याही भूतकाळातसुध्दा एकचित नव्हते आणि आजच्या वर्तमानातील संकटांच्या गर्दीतही ते एकचित्त नाहीत. या देशातील लक्षावधी बहिष्कृत त्यांच्या जातींच्या, धर्मांच्या आणि वर्गांच्या वेगवेगळ्या मजल्यांवर राहत आलेले आहेत. या बहिष्कृतांमधील सर्वच घटक जाती, धर्म आणि वर्ग यांच्यानुसार केवळ एकमेकांपासून फटकूनच राहतात असे नाही तर ते परस्परांची घृणाही करतात

आणि त्यातील वरचे खालच्यांवर भीषण अत्याचारही करतात.[२]

ही सामाजिक विषमतेची कारणमीमांसा डॉ. यशवंत मनोहर यांनी केली आहे. त्यासोबतच त्यांनी डॉ.साळुंखे यांचे साहित्य आणि भाषा क्षेत्रातील सामर्थ्य विशद केले आहे. ह्या सांस्कृतिक लढाईमध्ये 'वेदाचा तो अर्थ आम्हासीच ठावा, येरानी वहावा भार माथा' असे म्हणणारे तुकोबा नाकारल्या गेलेल्या आणि पिचलेल्यांचे प्रणेते ठरतात.पंढरपूरची वारी करणाऱ्या आईकडून तुकारामांच्या वाङ्मयाचा वारसा जसा मला मिळाला, तसाच माझे कुटुंब हे एक शेतकरी कुटुंब असल्यामुळे शेतकऱ्यांचे एकूण जीवन कोणत्या प्रकारचे असते, याचा अनुभवही मला लहानपणापासूनच घेता आला. आमच्या भागातून पंढरपूरला जाणाऱ्या एका दिंडीचे दुपारचे एक 'पेणे' गेली सुमारे चाळीस वर्षे आमच्या गावाकडच्या घरी असते. याचा परिणाम म्हणून संतसाहित्याचे काही संस्कार माझ्या मनावर लहानपणापासूनच झाले आहेत. मी ते संस्कार डोळे मिटून जसेच्या तसे स्वीकारलेले नाहीत, त्यांना फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांची व आधुनिक विज्ञानाची जोड दिली आहे, ही गोष्ट वेगळी. माझे वडील मात्र शेतीलाच पंढरपूर मानण्याच्या वृत्तीचे होते. स्वाभाविकच, संत तुकारामांनी शेतकऱ्यांच्या जीवनाविषयी मांडलेले विचार हा नेहमीच माझ्या जिज्ञासेचा विषय बनून राहिला आहे. विशेषतः, महात्मा फुले यांनी तुकारामांच्या शेतकरी असण्याचा आवर्जून आणि आत्मीयतेने उल्लेख केला असल्यामुळे तुकारामांचे शेतीविषयीचे अभंग जाणीवपूर्वक अभ्यासावेत, असे मला पुनःपुन्हा वाटत आले आहे. ही डॉ.आ.ह. साळुंखे यांच्या तुकारामांच्या अभ्यासाकडे वळण्याची प्रेरणा आहे. या संभाषितांमधून तात्यांचे तुकोबांकडे बघण्याचे आयाम स्पष्ट होतात. त्यांचे दृष्टिकोन आणि विचारव्यूह दिशादर्शक ठरायला लागतात. जगद्गुरु तुकाराम यांच्या अध्ययनाच्या प्रेरणा त्यांच्या बालमनातील जिज्ञासेत आणि शेतकरी कुटुंबात झालेल्या पालनपोषणात दिसायला लागते. लोकांना केवळ भाविक, धार्मिक वाटणारे जगद्गुरु तुकोबाराय तात्यांना मात्र शेतकऱ्यांचे आणि त्यातही अन्यायाला वाचा फोडणारे,प्रस्थापित सांस्कृतिक चौकटी मोडू पाहणारे,विद्रोही संत दिसतात. आतापर्यंत न गवसलेला तुकोबारायांच्या अभंगातील अन्वयार्थ वाचक आणि अभ्यासकांपुढे डॉ.आ.ह.साळुंखे यांनी आणलेला आहे.

विद्रोही तुकाराम :

अन्यायकारक आणि प्रस्थापित व्यवस्थेला झुगारून, नाकारून, प्रश्न विचारत, मोडीत काढण्यासाठी केलेला जोरदार प्रयत्न किंवा हल्ला म्हणजे व्यवस्थेची द्रोह होय. साधारणतः संत प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून अशी अपेक्षा केली जात नाही. जनप्रबोधन करणे आणि लोकांकडून कुठलीही अपेक्षा न करता केवळ आपण सरळमार्गी जीवन जगणे हेच जनसामान्यांना संतांकडून अभिप्रेत असते. मात्र जगद्गुरु तुकाराम महाराज यांनी तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेला अधिकार आणि हक्क नाकारणाऱ्या तथाकथित उच्चभ्रू धर्मपंडितांना प्रश्न केला आहे. हीच मांडणी 'विद्रोही तुकाराम' या ग्रंथामधून आली आहे. तात्यांनी सिंहाचे चित्रण शेळीच्या स्वरूपात, वेदांचा अंकित नसल्याची घोषणा, यातिकुळ येथे असे अप्रमाण,काय बा करिशी सोवळे ओवळे?, कोणी गुरू नाही, कोणी शिष्य नाही, आम्ही नशीब लिहिणाऱ्या देवाचे स्वयंभू बाप आहोत !, न्यायालयात खेचले, मरणाही आधी राहिलो मरोनी,विचारांची कत्तल ही शारीरिक हत्येपेक्षाही भीषण ह्या शीर्षकाच्या लेखांमधून तुकारामांचे विद्रोहीत्व विशद केले आहे. तुकाराम हे एक डोळस आणि संवेदनशील गृहस्थ होते. ते डोळस असल्यामुळे आपल्या अवती-भवतीच्या सामाजिक परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण करीत होते. त्यामुळे आपल्या समाज-व्यवस्थेतील त्रुटी आणि उणिवा त्यांना जाणवू लागल्या होत्या. धर्माच्या नावाखाली होणारा अन्याय, शोषण आणि नीतीची विटंबनात्यांच्या ध्यानात आली होती. बलवंतांची, प्रस्थापितांची मग्रुरी आणि गोरगरिबांची दुर्दशा त्यांच्या लक्षात आली होती. डोळस असल्यामुळे हे सगळे जसे त्यांनी अचूकपणे हेरले, तसेच ते संवेदनशील असल्यामुळे या सगळ्याच्या विरोधात एका उत्कट विद्रोहाची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली.[३]

अर्थात जगद्गुरु तुकाराम महाराज सर्वप्रथम संवेदनशील कवी होते, विठ्ठलाचे परम भक्त होते. मात्र त्याचसोबत अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे, रोकडा धर्म समाजात रुजवणारे प्रखर प्रबोधनकार होते. त्यांच्या ठायी अन्यायाविरुद्ध, प्रस्थापित आणि शोषण करू पाहणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध चीड होती. याचीच सांगोपांग चर्चा 'विद्रोही तुकाराम' या ग्रंथामध्ये आलेली आहे. एखाद्या सिंहाचे चित्र शेळीसारखे करत तुकारामांना भोळसट आणि व्यवहारशून्य ठरवत त्यांच्यावर अवास्तवाचे आरोपण करण्यात आले होते. तुकारामाच्या संदर्भात हे एक प्रकारे सत्यशोधन किंवा तुकारामांचे वास्तव दर्शन म्हणता येईल.तुकाराम ! मानवी जीवनातील नाना प्रकारच्या उत्कट अनुभवांना अत्यंत आशयघन शब्दांत साकार करणारा एक शब्दार्थप्रभू प्रतिभावंत. धर्माला नीतीचे आणि निष्कपट भावनेचे अधिष्ठान देणारा एक आचारशील भक्त. अक्षरशः सर्वस्व पणाला लावून सांस्कृतिक व सामाजिक अन्यायाच्या विरोधात दंड थोपटणारा एक आव्हानवीर योद्धा. प्रतिभावंत, भक्त आणि योद्धा या तिन्ही भूमिकांचा एकत्र

मिलाफ झालेला महापुरुष - कवी तुकाराम, संत तुकाराम, विद्रोही तुकाराम !

ज्या काळामध्ये वेदप्रामाण्य आणि वेदप्राबल्य होते, त्या काळामध्ये तुकारामांनी वेदाचा अर्थ, त्याची महती आणि त्याची यथार्थता आम्हालाच ठाऊक असल्याची गवांदी दिली, घोषणा केली. ते जगद्गुरु तुकाराम महाराज प्रस्थापितांना हादरवून सोडणारे आणि आत्मबळ प्रगट करणारे होते. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत विनम्र दाखवताना अनेकांनी त्यांना अगदीच मिळमिळीत करून टाकले आहे. मात्र 'विद्रोही तुकाराम' ह्या ग्रंथाने प्रस्थापितांविरुद्ध उभा ठाकलेला थोर योद्धा तरीही आपल्या सृजनशील सहसाने नवनिर्मिती करणारे आणि भक्तामध्ये निर्भयता पेरणारे प्रणेते होते. ही आ.ह.साळुंखे यांच्या 'विद्रोही तुकाराम' ची मांडणी यथार्थ आणि वास्तव वाटते.

तुकारामाचे अभंगशतक :

सांप्रतकालीन कर्मकांडाला फाटा देत उभा राहिलेल्या शिवधर्माच्या नित्य उपयोगाच्या बाबतीत उपयोजिले जाणाऱ्या अभंगांचे एकत्रित रूप म्हणजे तुकारामांचे अभंग शतक होय. त्याची निवड, त्यावरील विवेचन आणि विविध प्रसंगी जसे जन्म,मृत्यू ,वाढदिवस, लग्न, कौटुंबिक मेळावे यांचे प्रयोजन सांगून अभंगाचे उपयोजन तात्यांनी प्रस्तुत अभंग शतकात केले आहे. त्यामध्ये पुढीलप्रमाणे विषयनिहाय अभंगाचे वर्गीकरण करण्यात आले आहे. आईवडील, आघात, संत, सत्य, हितासाठी, उपदेश, नम्रता, क्षमा, शांती, शुद्धता, शब्द, प्रसिद्धी, कीर्ती, अनुभव, शेती, प्रयत्न, आनंद ह्या विषयांवर तुकाराम गाथेतील दहा ते पंधरा अभंगाचे संकलन करण्यात आले आहे. त्यावर तात्यांनी अर्थपूर्ण आणि जीवनोपयोगी भाष्य केलेले आहे.

मायबापे केवळ काशी । तेणें न वजावे तीर्थासी ।। १ ।।
पुंडलीकै काय केले ? । परब्रह्म उभे ठेले ।। २ ।।
तैसा होई सावधान । हृदयीं धरी नारायण ।। ३ ।।
तुका म्हणे मायबापे । अवघी देवाची स्वरूपे ।। ४ ।।
(अ.क्र.२९०६)

आईवडील म्हणजे शुद्ध काशी होत. जो मनुष्य आईवडिलांच्या सहवासात असेल, त्यानं काशीची तीर्थयात्रा केल्यासारखं होतं. त्यानं तीर्थयात्रेला जाण्याची गरज नसते. अशा वेळी पुंडलिकानं काय केलं, ते ध्यानात घ्यावं. तो आईवडिलांची सेवा करणं थांबवून देवाकडं धावला नाही. त्यानं देवालाच उभं रहायला लावलं. तेव्हा, प्रत्येकानं पुंडलिकाप्रमाणं सावध रहावं. ईश्वराला आपल्या हृदयात ठेवावं, पण त्याला प्राप्त करण्यासाठी आईवडिलांची सेवा करणं थांबवू नये. कारण, आईवडील म्हणजे पूर्णांशानं ईश्वराचं स्वरूप होत. तुकाराम महाराज आपल्याला सांगत आहेत, की आईवडिलांची सेवा हीच ईश्वराची पूजा होय.

संकलनातील अभंगाचा, त्यावरील भाष्याचा उद्देश रुढी, प्रथा, परंपरा, कर्मकांड यांना फाटा देत तुकारामोक्त रोकडाधर्म रुजवणे हाच आहे. त्यातील अभंगांची निवड, त्यावरील भाष्य आणि विवेचन अत्यंत सुगम,सुबोध आणि दैनंदिन जीवनामध्ये उपयोगी,प्रेरक ठरणारे आणि आचरणात यावे असे आहे. जीवनातील सुखदुःखाच्या प्रसंगी धीराने कसे सामोरे जावे, मन:स्थिती कशी सांभाळावी, आघात कसे सहन करावे,बोलणे, चालणे आणि व्यवहार या सर्वांना उपयोगी ठरणारे भाष्य म्हणजे तुकाराम अभंग शतक होय.

तुकारामांचा शेतकरी :

जगद्गुरु तुकाराम महाराजांचा जन्म कुणबी अर्थात शेतकरी समुदायातील आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी तर त्यांना 'कुणब्यांमध्ये उभा राहिलेला संत' असे संबोधले आहे. प्रत्यक्ष शेतीमातीत राबताना वारा, ऊन, पाऊस, डोंगर, उतार, चढ, नदी,नाले, समुद्र, पर्जन्य, दाणे, कणीस, धनधान्य, आऊत, बैल, पशुपक्षी ह्या सर्वांच्या प्रत्यक्ष संपर्कात येऊन पराकोटीच्या सृजनशील तुकोबांच्या अभंगांमधून निर्माण झालेल्या काव्यप्रतिमा अलौकिक परिणाम साधणाऱ्या आहेत. त्याचेच परिपूर्ण वर्णन डॉ.आ. ह.साळुंखे यांच्या 'तुकारामांचा शेतकरी' या विवेचनपर ग्रंथांमध्ये आलेले आहे. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे या सगळ्याचा परिपाक होय. खरे तर हा विषय यापेक्षा फार विस्ताराने मांडण्याची आवश्यकता आहे. सध्या तरी सूत्ररूपाने हा विषय वाचकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. तसे पाहिले, तर तुकारामांनी समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रांना स्पर्श करणारे अभंग लिहिले आहेत. त्यामुळे त्यांच्या इतर क्षेत्रांविषयीच्या अभंगांचाही स्वतंत्रपणे अभ्यास करणे शक्य आहे. उदा. त्यांचे केवळ व्यापार, उद्योग या क्षेत्रांविषयीचे विचार एकत्रितपणे अभ्यासणेही महत्त्वाचे ठरू शकते, अशी प्रस्तावना तात्यांनी प्रस्तुत पुस्तकाला लिहिली आहे. त्यामधून जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे यांच्या अभंगातील सर्वस्पर्शीत्व प्रत्ययास येते. प्रस्तुत पुस्तकात मी शेतीचे क्षेत्र निवडले आहे, याला एक महत्त्वाचे कारण आहे. भारतीय समाजातील सत्तर-ऐंशी टक्के लोक शेतीशी संबंधित आहेत आणि तरीही भारतीय वाङ्मयामध्ये शेतकऱ्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब मात्र अत्यल्प प्रमाणातच आढळते. स्वाभाविकच, तुकारामांनी केलेल्या शेतकऱ्यांच्या चित्रणाला या पार्श्वभूमीवर एक आगळेच महत्त्व प्राप्त होते. तुकारामांना शेतीचा प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळेआणि त्यांच्या प्रतिभेचा पल्ला फार उंच भरारी घेणारा असल्यामुळे या विषयावरील

त्यांच्या अभंगांमध्ये जो जिवंतपणा आलेला आहे, तो तर अगदी दुर्मिळ आणि अपवादात्मकच म्हणावा लागेल.' म्हणूनच आपल्या अलौकिक प्रतिभेद्वारे तुकारामांनी शेतीमातीशी संबंधित प्रतिमांचे उपयोजन करून पहिल्यांदाच साहित्यामध्ये हा परिणाम साधला. तुकारामांचा अभंग हा सामान्यांच्या जीवनाशी एवढे समरूपत्व साधणारा होता की तुकारामांची उक्ती अर्थात तुकोक्ती ही अगदी नकळत आणि बेमालूमपणे लोकोक्ती झाली हे खरे आहे. आपला व्यवसाय आणि शास्त्र, वेद, धर्म यांचा दुरान्वयानेही संबंध नाही. त्यामुळे मला दंभ, अहंकार इत्यादी रीपुंचा स्पर्श झाला नाही. अशी कबुली तुकाराम महाराज आपल्या व्यवसायाचा आधार घेत देतात. महात्मा फुल्यांनी ज्याप्रमाणे 'शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला साधू या शब्दात संत तुकारामांचा निर्देश करून तुकारामांचे शेतकऱ्यांच्या जीवनाशी असलेले नाते स्पष्ट केले आहे, त्याप्रमाणे स्वतः तुकारामांनीही आपण कुणबी म्हणजेच शेतकरी असल्याचा आवर्जून उल्लेख केला आहे. **बरा देवा कुणबी केलो। नाही तरी दंभेचि असतो मेलो ।।** (३२०), हे त्यांचे वचन तर विख्यातच आहे. **याखेरीज तुका कुणबियाचा नेणे शास्त्रमत। एक पंढरीनाथ विसंबेना ।। (४३९२) आणि तुका विनवी कुणबियाचा ।** (३७५२), यांसारख्या वचनांतूनही त्यांनी आपल्या शेतकरी असण्याचा खास उल्लेख केला आहे.तुकारामांचे बंधू कान्होबा यांनीही विठ्ठलाबरोबर प्रेमाचे भांडण भांडताना एका अभंगात आपल्या कुणबी असण्याचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात, **आता निदसुर नसावे । गाठ पडली कुणब्यासवे । तुकयाबंधु म्हणे राखावे । देवा महत्त्व आपुले ।। (३०१५)** यामध्ये तुकाराम महाराज आणि त्यांचे बंधू कान्होबा यांनी आपण कुणबी अर्थात शेतकरी समुदायात जन्मलो, वाढलो आणि तोच व्यवसाय करीत आलो. त्याची कबुली, व्यवसायातील तंत्र आणि त्या व्यवसायाची महती विशद केली आहे.

जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगातील प्रतिमा अत्यंत समर्पक बोलक्या आणि लोकजीवनातील असल्याने त्यांचे सर्व स्पर्शीत्व जगजाहीर आहे. एखाद्या धुरीणाला, प्रणेत्याला सर्वप्रथम समर्पणवृत्तीने आयुष्य झोकून द्यावे लागते तेव्हाच येणाऱ्या पिढ्यांचा उत्कर्ष साधला जातो. यासाठी तुकाराम महाराजांनी पुढीलप्रमाणे मातीमध्ये गाढून घेणाऱ्या दाण्याचे उदाहरण उपयोजिलेले आहे. **एका बीजा केला नास, मग भोगिले कणीस एका बीजा केला नास । मग भोगिले कणीस ।।१।।**
कळे सकळां हा भाव । लहान थोरांवरी जीव ।।२।।
लाभ नाही फुकासाठी । केल्याविण जीवासाठी ।।३।।
तुका म्हणे रणी । जीव देता लाभ दुणी ।।४।।
आता हे खरे आहे, की जे बीज स्वतःच्या गाभ्यामधून अंकुराला जन्म देते, ते त्या अंकुराला जन्म दिल्यानंतर स्वतः मातीमध्ये विलीन होऊन जाते. त्याच्यामधून जन्मलेला अंकुर हा त्याच्याच 'स्व'चा एक नवा आविष्कार असतो, ती एक नवी अभिव्यक्ती असते." ही तुकारामांची सहज अभिव्यक्ती प्रचंड मोठा समर्पणभाव आणि नेतृत्वाच्या ठायी अभिप्रेत असलेल्या गुणांची ओळख पटवून देतो. हे आणि यासारखे असंख्य उदाहरणे तुकोबांच्या अभंगांमधून डॉ.आ.ह. साळुंखे यांनी संकलित करून त्यावर परिपूर्ण समर्पक भाष्य केले आहे. प्रत्यक्ष शेतीचा अनुभव पेरणी, कापणी, पिकांची निर्मिती, त्याची विक्री, त्यातून मिळणारे उत्पन्न, त्याचा व्यय ह्या सर्व बाबी तुकारामांनी अभंगाद्वारे अभिव्यक्त केलेल्या आहेत. शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याचे महत्व मांडताना 'बळ बुद्धी वेचून या शक्ती 'उदक चालवावे युक्ती' 'प्राण गेलिया शरीर' काय करील व्यवहार 'तुका म्हणे जीवनेविण' 'पीक नव्हे नव्हे जान' ही मांडणी असो किंवा मिळालेल्या उत्पन्नाच्या खर्चावरील 'उदास विचारे वेच करी,मिरासीचे म्हूण शेत, नाही देत पीक उगे खोल ओलीं पडे, ते पीक उत्तम, गोमट्या बीजाची फळेही गोमटी, जीवनेविण पीक नव्हे नव्हे जाण, ओले मूळ भेदी खडकाचे अंग, न काढिता तण, कैंचे येति कण हातासी ते? झाडेझुडे जीव सोईरे पाषाण, शेत आले सुगी, सांभाळावे चारी कोण? पिकविले तया खाणे किती?, घरी मोडकिया बाजा, वरी वाकळांच्या शेजा,आनंदचि अंग आनंदाचे' हे काव्य आणि मांडणी तुकारामांचे व्यवसायातील प्रवीणत्व आणि व्यवहारातील चातुर्य विशद करते.

न सरे ऐसे तुकोबाचे दान :

जगद्गुरु तुकाराम महाराज हे अलौकिक प्रतिभेचे कवी आणि समकालाचे थोर भाष्यकार होते. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी त्यांना मराठीतील वैश्विक कवी म्हणून पाहिले आहे. तुकारामांचे काव्य जनसामान्यांच्या जीवनाशी समरूप होणारे, सामान्य प्रतिमा उपयोजनातून अलौकिक परिणाम साधणारे आहे. त्यांचे अभंग वारकरी परंपरेला, भागवत धर्माला जसे पुढे नेणारे आणि परमप्रिय आहेत, तसेच मराठी वाङ्मयाला नवेच कोंदण प्राप्त करून देणारे आणि मराठी कवितेच्या प्रगल्भतेच्या वाटा खुले करणारे आहे. **'सरे ऐसे ज्याचे दान । त्याचे कोण उपकार ? ।।'** असं तुकारामांचं एक विख्यात वचन आहे. ज्याचं कोणत्याही क्षेत्रातलं योगदान आयुष्यभर, अनेक पिढ्यांपर्यंत टिकत नाही, त्याचं कार्य समाजाला फार उपकृत करणारं नसतं, असं त्यांनी यातून सूचित केलं आहे. त्यांनी आपल्याला दिलेलं दान मात्र कधीही न सरणारं आहे, म्हणून या

पुस्तकाला 'न सरे ऐसे तुकोबांचे दान' असं शीर्षक दिलं आहे. या पुस्तकातील त्यांचे विचार सर्वांनाच जीवनात पथप्रदर्शक ठरणारे आहेत, असा माझा विश्वास आहे.' ही तात्यांची भूमिका अत्यंत मोलाची आहे. तुकोबांनी दिलेल्या ह्या दानाला कधीच कमीपण, उणेपण किंवा ओहोटी येणार नाही. म्हणूनच 'न सरे ऐसे तुकोबाचे दान'. प्रस्तुत ग्रंथामध्ये विवेचन आणि भाष्यासाठी पुढीलप्रमाणे अभंग निवडण्यात आलेले आहेत.

येतो कळवळा म्हणूनिया, उचनीच काही नेणे भागवंत, मन करा रे प्रसन्न, असाध्य ते साध्य,सुखे करावा संसार, जाऊनया तिर्था काय तूवां केले, विधीने सेवन विषय त्यागाचे समान ,जाणिवेचे काळे तोंड देवा ,घोडे काय थोडे वागविते ओझे, नका दंतकथा येथे सांगू कोणी, तुका म्हणे झरा आहे मूळचा की खरा, मेघदृष्टीने करावा उपदेश, त्याच्या पुण्या नाही पार, नित्य नवा दिस जागृतीचा, कायबा करीशी सोहळे ओवळे, शुभकाळ शोभा, कृपा मातेची समान, पटपुत्र सांभाळी, उदक म्हणे काय याहो मज प्यावे, बोलो जाणे अंगी नाही शूरपण, लटक्याच्या आवतन जेवलीया साच, नाही शब्दमुखी लागत तिखट, माझी आता लोक सुखी निंदा करू, नवनीत तोवरी कडकडे लोणी, नाही देवापाशी मोक्षाचे गाठोडे, तुका म्हणे गर्भावासी सुखे घालावे आम्हासी, तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते, हेची संतांचे पूजन, संताचा अतिक्रम देवपूजा तो अधर्म, नाही संतपण मिळत ते हाटी, संतांचा संगत तोची स्वर्गवास, कठीण वज्रास भेद ऐसे, दुर्जनांचा मान सुखी करावा खंडन, विषाचे किडे दुग्धी मरे, मरणा आधी राहिलो मरूनी, मज नाही कोठे उरला दुर्जन, नव्हे शब्द एक देशी, चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती, झाला इहलोकी परलोक, तुका आकाशाएवढा, आनंदाचा कंद गाईला गीती ह्या अभंगांचे यथार्थ आणि समर्पक आशयसूत्र मांडत धांडोळा घेतला आहे. विवेचनासाठी तात्यांनी निवडलेले हे अभंग परिवर्तन घडवणारे, सत्य-असत्य, श्रेयस-प्रेयस,साच लटिकें त्याचे दर्शन घडवणारे रूढी, प्रथा परंपरांना झुगारून देणारे, रोकडा धर्म मांडणारे, संतत्वाचे खरी प्रचिती देणारे आणि विवेकी विचार जागवणारे आहेत.तुकारामांनी एका अभंगात दिलेलं उदाहरण म्हणजे त्यांच्या सर्जनशील प्रतिभेचं उत्तम प्रतीक आहे. ते म्हणतात, 'विषाचे ते कीडे दुग्धीं मरे ।' विषातच वाढलेले जे किडे असतात, ते दुधात मरतात. विष हे त्यांचं अन्न बनतं आणि दूध हे त्यांच्या दृष्टीनं जीवघेणं विष बनतं ! दुष्टपणाची सवय झालेल्या व्यक्तींचं हे वर्णन चित्तहर काव्यात्मकतेचं अत्युच्च शिखर गाठणारं आहे. तुकारामांची निरीक्षणशक्ती खरोखरच अजब म्हटली पाहिजे. आणि जे निरखलेलं आहे, ते सूत्रासारख्या अल्पाक्षर वचनात बांधण्याची त्यांची क्षमता तर त्याहूनही अफलातून म्हणायला हवी. किती मार्मिक, अर्थपूर्ण आणि प्रभावी सुभाषित आहे, विषाचे ते कीडे दुग्धीं मरे !' तात्यांनी संत तुकाराम महाराज यांच्या काव्याचे आशय आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर विशेष नोंदविले आहेत. आ.ह. साळुंखे यांनी तुकाराम महाराजांच्या काव्य निर्मितीमधील विशेष त्यांच्या अभंगातील प्रतिमा, उदाहरणे, दाखले आणि त्याद्वारे अभिव्यक्त केलेल्या विचारातून मांडले आहेत. तुकाराम महाराज यांच्या अभंगाची विश्वव्यापकता आणि त्यांच्या काव्यलेखनाचे सामर्थ्य तात्यांनी प्रस्तुत अभंगांच्या विवेचनातून विशद केले आहे. केवळ संसारी, भौतिक एवढेच नव्हे तर मनोवस्थांचा धांडोळा देखील तुकारामांनी घेतला आहे.स्वत:च्या मनातच एक प्रदीर्घ वाट असते. तिच्यावरही काटे असतात. खाचखळगे असतात. विकारांचे असतात. आणि कशाकशाचे असतात. ते चुकवून नीट चालता आलं, तर मग बाहेरच्या जगातील रस्त्यावरही नीट चालता येतं.इतरांना वाट दाखवण्याचा टप्पा तर त्यानंतरचा होय.

माणसाच्या अंतर्यामी चाललेल्या या प्रवासाचं तुकारामांनी एका अभंगात फार मार्मिक शब्दांत वर्णन केलं आहे. ते म्हणतात, तुका म्हणे मना पाहिजे अंकुश नित्य नवा दिस जागृतीचा ।। ज्याला जीवन सफल करायचं आहे, त्यानं मनावर अंकुश ठेवला पाहिजे. त्यामुळं बाह्य इंद्रियांवरही नियंत्रण येतं. पण मनावर अंकुश ठेवणं, हीच कठीण गोष्ट आहे. एखादं महायुद्ध जिंकावं, तसं हे आहे. हे युद्ध जिंकण्यासाठी माणसाला मोठी तयारी करावी लागते. आतल्या आत अनेक उलथा-पालथी होतात. शस्त्रं परजली जातात. त्यांचे वार केले जातात. प्रत्येक क्षण एक वेगळा अनुभव घेऊन येतो. (१०) मानवी मन हे रणांगण असून त्यावर कायमच युद्ध चालू असतात. त्याची प्रचिती तुकारामांच्या अनेक अभंगांमधून येते 'रात्रंदिना आम्हा युद्धाचा प्रसंग, अंतर्बाह्य जग आणि मन' असे म्हणत तुकारामांनी मानसिक द्वंद्वाचे आणि रणाचे वर्णन केले आहे. मन, मनाचे शत्रू, मनाच्या अवस्था, मन नियंत्रणासाठी आवश्यक अंकुश तुकारामांनी नोंदविले आहेत.तुकाराम महाराजांनी अभंगाद्वारे व्यक्त केलेल्या मनोवस्थांचे अध्ययन डॉ.आ.ह. साळुंखे यांनी प्रस्तुत ग्रंथाद्वारे केले आहे.

तथागत बुद्ध आणि संत तुकाराम :

प्रस्तुत ग्रंथ म्हणजे डॉ.आ.ह. साळुंखे यांची विविध ठिकाणी झालेली व्याख्याने आणि काही लेखांचे संकलन आहे. प्रथमदर्शनी हे लेख आणि व्याख्याने वैविध्यपूर्ण विषयांवरचे वाटत असले तरी त्यामध्ये भगवान बुद्ध आणि संत तुकाराम यांच्या विचारांचा अखंड प्रवाह

दृष्टिपथास येतो. जगाला शांती, समता, स्वातंत्र्य, बंधुता इत्यादी मानवी मूल्यांचा उपदेश देणाऱ्या भगवान बुद्धांच्या विचारांचा प्रभाव तात्यांच्या एकूणच जीवनकार्यावर आहे. त्यांना प्रभावित करणाऱ्या व्यक्तींमध्ये संत तुकारामांचे स्थान वरचे आहे. भगवान गौतम बुद्ध आणि संत तुकाराम यांच्यामधील वैचारिक अनुबंध शोधून त्यावर तात्यांनी अपूर्व प्रकाश टाकला आहे. ह्या ग्रंथामध्ये स्वातंत्र्य : संकल्पना आणि व्यवहार; आपल्यासाठी बुद्ध आणि तुकाराम दोघेही जामीन व्हायला तयार; बुद्धांनी सांगितलेली पराभवाची कारणे.. आणि तुकारामांचे काही विचार; पाली, संस्कृत आणि मराठी : परस्परसंबंध; तथागत बुद्ध आणि संत तुकाराम : आणखी काही साम्ये या लेखांचा समावेश करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या ग्रंथ निर्मितीमागील प्रेरणा विशद करताना डॉ.आ.ह. साळुंखे लिहितात; 'तथागत बुद्ध आणि संत तुकाराम ! तुकाराम बुद्धांच्या इतके जवळ पोचले होते, की त्यांच्या असंख्य वचनांमध्ये बुद्धांचा उपदेश ध्वनित झाल्याचे आढळते. हे ध्वनित होणे कधी बुद्धांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभावाने प्रतिध्वनित होणे आहे, तर कधी तुकारामांच्या जीवनातील स्वयंभू, स्वानुभूत, स्वयंस्फूर्त सत्याचे स्वयंशैलीमध्ये स्वतंत्रपणे ध्वनित होणे आहे.

दुसऱ्या बाजूला मला हे दोघेही इतके जवळचे वाटतात, की मी माझ्या हृदयाच्या एकाच स्पंदनात या दोघांचाही उपदेश एकाच वेळी, किंबहुना एकरूप होऊन ध्वनित झाल्याचा अनुभव घेत असतो. हे दोघेही प्रदीर्घ काळापासून माझ्या हृदयाचा, मस्तकाचा, एवढेच नव्हे तर अवघ्या अस्तित्वाचा अविभाज्य भाग बनलेले आहेत. अर्थात, माझ्या जीवनाच्या सांस्कृतिक रचनेमध्ये तथागत बुद्धांचे स्थान सर्वोच्च आहे. माझ्या आयुष्यात भारतीय इतिहासातील ज्या इतर व्यक्तींचे स्थान अत्युच्च स्वरूपाचे आहे, त्यांमध्ये संत तुकारामांचा मी अतिशय कृतज्ञतापूर्वक उल्लेख करू.इच्छितो. 'तथागत बुद्ध आणि संत तुकाराम' या पुस्तकाच्या माध्यमातून मी या दोनमहामानवांच्या विचारांचा काही वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. बहुजन समाजाने या दोन्ही महापुरुषांच्या चरित्रांचे योग्य रीतीने आकलन करावे आणि त्यांचे विचार आत्मसात करून प्रत्यक्ष आचरणात उतरावावेत, असे मला नेहमी वाटत आले आहे. तसे बघितले, तर तथागत बुद्धांचा त्यांच्या नंतरच्या समग्र भारतीय संस्कृतीवर फार मोठा प्रभाव पडला आहे. स्वाभाविकच, संत तुकारामांवरही हा प्रभाव होता, हे एक ऐतिहासिक सत्य आहे. संत तुकारामांविषयी नितान्त आदर असलेल्या लोकांनी हे सत्य जाणून घेऊन बुद्धांना स्वतःच्या संतुलित दृष्टीने समजून घ्यावे आणि आपले कल्याण साधावे, या भावनेतून मी संत तुकारामांचे बुद्धांशी असलेले नाते आधारानिशी परंतु संक्षेपाने आणि केवळ दिशादर्शक म्हणून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.[११] त्यांची ही भूमिका भगवान गौतम बुद्धाचे भारतीय सांस्कृतिक पर्यावरणावरील प्रभाव आणि त्यांच्या वैचारिक प्रकाशातील विचारवंतांची ओळख नव्याने करून देणारी आहे. तात्यांच्या वैचारिक जडणघडणीमध्ये बुद्धांचे सर्वोच्च स्थान आहे.तर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये संत तुकारामांचे वरचे स्थान आहे. म्हणूनच तात्यांनी संत तुकारामांवरील बुद्धांचा प्रभाव शोधण्याचा प्रयत्न केला आहे. ती वैचारिक नाळ कायम असून कालपरत्वे अभिव्यक्तीची साधने आणि मांडणीच्या पद्धती भिन्न झाल्या आहेत, असे म्हणावे लागेल. मात्र दोघांचेही प्रबोधन आणि जागरणाचे मोठे कार्य लोकभाषेतच घडलेले आहे, असे पहावयास मिळते. कवी टिळक यांनी येशू ख्रिस्ताच्या पायाजवळ मी आलो त्याचे कारण संत तुकाराम आहेत असे म्हटले होते. अर्थात 'तुका निर्मित सेतूवरूनी, मीही आलो ख्रिस्त चरणी' ही कवी टिळक यांना तुकारामांच्या ठायी गवसलेली येशू ख्रिस्ताची करुणा, दयाबुद्धी, ममता ख्रिस्ताकडे घेऊन आली तर डॉ.आ.ह.साळुंखे यांनी भगवान गौतम बुद्ध आणि संत तुकाराम यांच्या वैचारिक नात्याचे दर्शन नव्याने जगाला करून दिले.धर्मानंद कोसंबींची तरुणपणीच संत तुकारामांशी वैचारिक भेट झाली आणि तुकाराम कोसंबीच्या दृष्टीने त्यांना बुद्धांकडे घेऊन जाणारा सेतू ठरले. तुकारामांचे बुद्धांशी असलेले अतिशय निकटचे सांस्कृतिक नातेच या घटनेला कारणीभूत झाले.

बुद्धांनी माणसाच्या मनाला पूर्वी कधीही कोणीही दिले नसेल इतके सौंदर्य दिले, सुगंध दिला. तुकारामांनीही कधी बुद्धांचे अनुसरण करीत, तर कधी स्वतंत्रपणे आणि स्वयंस्फूर्तीने मानवी मनाला सुंदर आणि सुगंधी बनविले. तथागत बुद्ध हे भारतीय संस्कृतीच्या क्षितिजावरचे सर्वांत अधिक प्रसन्न व आनंददायक स्मित आहे आणि संत तुकाराम हा भारतीय समाजव्यवस्थेला अतिशय निर्मळ बनविणारा प्रवाही व तृषाशामक निर्झर आहे ! या दोघांपुढे नतमस्तक होणे आणि त्यांना आपल्या हृदयात व मस्तकात धारण करणे म्हणजे उन्नत मनुष्यत्वाकडचा प्रवास सुरू करणे होय ![१२] कविवर्य टिळकांना ख्रिस्तापर्यंत नेणारा आणि धर्मानंद कोसंबींना भगवान बुद्धापर्यंत नेणारा सेतू म्हणजे संत तुकाराम होय. भारतीय वैचारिक परंपरेमध्ये भगवान गौतम बुद्धांनी मनाचे अत्यंत सूक्ष्म चिंतन, त्याच्या अवस्था, त्याचे शत्रू आणि त्याला नियंत्रित करण्याचे उपाय सुचवले आहे. त्यानंतर ते तुकारामांच्या अभंगांमध्ये प्रकर्षाने जाणवते. प्रस्तुत ग्रंथामध्ये स्वातंत्र्याच्या विविध व्याख्या, त्याचे स्वरूप, त्याची गरज आणि त्याचे उपयोजन, स्वातंत्र्याचे अवलंबन करण्याच्या पद्धती,भगवान गौतम बुद्ध आणि

तुकारामांचे स्वातंत्र्यसंबंधी विवेचन पहिल्याच लेखात आले आहेत. पाली, प्राकृत, संस्कृत, मराठी यांचे आंतरिक संबंध, भगवान गौतम बुद्ध आणि तुकारामांच्या अभंगाद्वारे उलगडून दाखवले आहेत. दोघांमधील वैचारिक अनुबंध उलगडण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न प्रस्तुत ग्रंथाद्वारे झाला आहे.

समारोप :

डॉ. आ.ह. साळुंखे यांनी विद्रोही तुकाराम, तुकारामाचे अभंग शतक, तुकारामांचा शेतकरी, न सरे ऐसे तुकोबाचे दान, तथागत बुद्ध आणि संत तुकाराम ह्या ग्रंथकर्तृत्वाद्वारे संत तुकारामांचे वैचारिक पर्यावरण, त्यांची मांडणी, अभिव्यक्ती, त्यांच्या विचारातील स्पष्टता, प्रतिमांतील समर्पकता म्हणजे एकूणच वाङ्मयातील नीतीतत्व आणि सौंदर्य शोधन केले आहे. संत तुकारामांचा महाराष्ट्रीय लोकजीवनावरील परिणाम देखील याद्वारे त्यांनी अभ्यासला आहे. म्हणूनच ते अभ्यासांती म्हणतात की, गेल्या तीनचार शतकांच्या कालखंडात तुकाराम हे महाराष्ट्रीय लोकांच्या भावविश्वाचे एक अतूट, अविभाज्य अंग बनले. त्यांचे अभंग ही या लोकांच्या संस्कृतीला फुटलेली ताजी, टवटवीत पालवी ठरली. त्यांचे आचारविचार हे या लोकांच्या दृष्टीने निरामय, निरागस आदर्श ठरले. स्वाभाविकच, या काळात या लोकांनी त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव केला. हे प्रेम इतके उत्कट होते, की अक्षरशः असंख्य कुटुंबांनी या तुकारामांच्या पाठोपाठ आपल्याही घरात एका नव्या तुकारामाचे अस्तित्व बहरावे, असे स्वप्न पाहिले. आपल्याला तुकारामांसारखा पुत्र व्हावा,अशी आकांक्षा बाळगली. किंबहुना, जणू काही स्वतः तुकारामच पुन्हा आपल्या उदरी जन्माला यावेत, अशी ओढ त्यांच्या मनाला लागली. या स्वप्नातून, या आकांक्षेतून, या ओढीतूनच त्यांनी आपल्या मुलाचे नाव मोठ्या अभिमानाने आणि एका उत्कट ध्येयनिष्ठेने 'तुकाराम' असे ठेवले. येथील घराघराच्या हृदयात तुकारामांविषयी केवढे आपलेपण होते, केवढा आदर होता, हे यावरून सहजपणे स्पष्ट होते.अर्थात तुकारामासारख्या सुपुत्राची अभिलाषा महाराष्ट्रातील असंख्य वडिलांना आहे. तुकारामाच्या उक्तीने अर्थात तुकोक्तीने नकळतपणे लोकोक्तीची जागा घेतली आहे. तुकारामांवर भोळसट आणि व्यवहारशून्य असल्याचा आरोप झाले. आर्थिक दुरावस्था आणि दारिद्र्य आले म्हणून तुकोबा देवभक्तीला लागले हे काही सयुक्तिक आणि खरे नाही. संत तुकारामांच्या जीवन आणि कार्यावर वास्तवाचा लखलखीत प्रकाश याद्वारे डॉ. आ. ह.साळुंखे यांनी टाकला आहे.'विशीत असलेल्या तुकारामांना भांबनाथाच्या डोंगरावर साक्षात्कार झाला, हे पण हा साक्षात्कार आध्यात्मिक स्वरूपाचा नव्हता, तर सामाजिक न्यायाच्या होता. या साक्षात्कारानंतर त्यांनी पहिले पाऊल उचलले, ते वडिलांनी दिलेल्या कर्जाची कागदपत्रे इंद्रायणीच्या डोहात बुडवण्याचे होय. त्यांनी हे कृत्य विटल्यामुळे नव्हे, तर संसाराला चिकटणारा शोषणाचा घटक छाटून केले. अन्नान्न दशा झाल्यामुळे ते ईश्वरभक्तीकडे वळले, हे काही लेखकांचे खरे नव्हे. कारण, मी जनार्दनाकडे आलो, ते काही अन्नाला महाग झालो होतो म्हणून नाही. असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. मी वेदांचा अंकित नाही; भेदभाव,वेदांचा भाग गाळून उरलेला भाग मी प्रमाण मानतो.' ही भूमिका संत तुकारामांच्या अभंगाद्वारे अनेकदा ध्वनीत झाली आहे.त्याची मांडणी डॉ. आ.ह. साळुंखे यांनी वरील पाचही ग्रंथांच्या आधारे केली आहे. 'विद्रोही तुकाराम' या ग्रंथाच्या आधारे संत तुकारामांची प्रस्थापित आणि अन्यायी व्यवस्थेविरुद्धची बंडखोरी प्रकर्षाने प्रकाशात आणली आहे. 'तुकारामांचे अभंग शतक' या ग्रंथाद्वारे रूढी, प्रथा, परंपरांना आणि कर्मकांडाला बगल देत नवीन संस्कृती रुजवण्यासाठी नित्य उपयोगी अभंगाचे संकलन आणि भाष्य करण्यात आलेले आहे. तुकारामांचा शेतकरी ह्या ग्रंथाद्वारे महात्मा फुले यांनी केलेले विधान 'शेतकऱ्यांमधून उभा राहिलेला साधू म्हणजे संत तुकाराम' या विधानाची यथार्थता पटते. त्यामध्ये शेतीमाती, पीकपाणी, निसर्ग, पशुपक्षी, नांगरणी, पेरणी, कापणी, कोळपणी याद्वारे तुकारामांचे शेतकरी असणे आणि त्यातही व्यवहारचातुर्य प्रकट झाले आहे. गौतम बुद्ध आणि संत तुकाराम या ग्रंथाद्वारे दोन्ही देदीप्यमान विचारवंतांचा वैचारिक अनुबंध डॉ.आ.ह.साळुंखे यांनी व्यक्त केला आहे. तर 'न सरे ऐसे तुकोबाचे दान' या ग्रंथाद्वारे संत तुकाराम महाराज यांच्या महत्त्वपूर्ण अभंगावर डॉ.आ.ह.साळुंखे यांनी अभंगाचा सयुक्तिक अन्वयार्थ लावत विवेचन केले आहे. त्यातील विचार आणि प्रतिमा तुकारामांच्या वैचारिक उंचीचा आणि काव्यातील सौंदर्याच्या परिचय करून देणाऱ्या आहेत. ■


*संदर्भसूची : १) सक्षम समीक्षा- संपा.डॉ.शैलेश त्रिभुवन, डॉ.सदानंद मोरे विशेषांक, प्रा. बापट यांचा लेख पृ. क्र. ११ २) डॉ.आ.ह. साळुंखे यांचे साहित्य,डॉ. इंदिरा आठवले,एक्सप्रेस पब्लिशिंग हाउस, डॉ.यशवंत मनोहर यांची प्रस्तावना, पृ. क्र.१४ ३) विद्रोही तुकाराम- डॉ. आ.ह.साळुंखे, लोकायत प्रकाशन, पृ. क्र. १० ४) तत्रैवः, पृ. क्र.१३ ५)तुकाराम अभंग शतक -डॉ.आ.ह. साळुंखे,जिजाऊ प्रकाशन,पृ. क्र.०३ ६) तुकारामांचा शेतकरी - डॉ.आ.ह. साळुंखे,लोकायत प्रकाशन, पृ. क्र.०७ ७) तत्रैवः, पृ. क्र.१७ ८) न सरे ऐसे तुकोबाचे दान -डॉ. आ.ह.साळुंखे, लोकायत प्रकाशन, पृ. क्र. १५ ९)तत्रैवः, पृ. क्र.२३ १०)तत्रैवः, पृ. क्र.३७ ११)गौतम बुद्ध आणि संत तुकाराम - डॉ. आ.ह.साळुंखे, लोकायत प्रकाशन, पृ. क्र. ०४ १२)तत्रैवः, पृ. क्र.०५

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta®

International Peer Reviewed Research Journal

Issue-49, Vol-07, Jan to March 2024



Editor
Dr.Bapu G. Gholap

13) व्यष्टी अध्ययन एक संशोधन पद्धती ||69
प्रा. जया डब्लु. वागदे, जि. चंद्रपूर

14) जयशंकर प्रसाद के नाटकों में राष्ट्रीय चेतना ||71
डॉ. निभा शांतिलाल उपाध्याय, अकोला, महाराष्ट्र

15) व्यंग्यकार अर्चना चतुर्वेदी की रचनाओं में सामाजिक व्यंग्य ||74
श्वेता शर्मा, डॉ. कल्पना शर्मा, ग्वालियर (म.प्र.)

16) प्रेमचंद की कहानी में कृषक जीवन ||78
डॉ.माया पारस, जिला—अनूपपुर (म.प्र.)

17) अज्ञेय के काव्य में प्रेम—चेतना ||81
प्रा. डॉ. रमेश विठोबा कांबळे, ता. जि. धाराशिव

18) नारी विमर्श और प्रेमचंद ||85
स.प्रा.प्रकाश आनंदा लहाने, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र)

19) दिव्यांगजनों को गुणवत्तापूर्ण शिक्षा और रोजगार के अवसर ||88
डॉ.भावना सिंह भदौरिया, जिला मुरैना

20) 'गोदान' उपन्यास और भारतीय किसान की स्थिति ||91
Indra Devi, Dr. Rajni Kumari

21) शिक्षण प्रशिक्षण संस्थान के संसाधनों का प्रशिक्षणार्थियों की अभिरूचि पर पडने वाले ... ||95
अनिता शर्मा, जयपुर

22) Use of WhatsApp, Google Meet and Other Applications during Covid-19 in ... ||97
Assit. Prof. Vikki P. Wankhede, Gondia

23) Regression Analysis of ESG Scores & Cost of Debt (Frame of reference - ... ||100
Dr. Rupali Shah, Ms. Rupa Kurapati, Surat, Gujarat, India

24) पंचायती राज व्यवस्था में आदिवासी महिलाओं की भूमिका एक अध्ययन ||107
श्रीकांत दुबे, रामचन्द्र कोठे, नर्मदापुरम्

25) कोविड –१९ का भारत में केन्द्र–राज्यों के मध्य संबंध ||110
डॉ. नीरजा गर्ग, जबलपुर

व्यष्टी अध्ययन पद्धतीचे मर्यादा

१) व्यष्टी अध्ययन पद्धती ही सिमीत क्षेत्राकरिता उपयोगी आहे.

२) व्यष्टी अध्ययन पद्धतीत तथ्य संकलन करित असताना पक्षपातपणा होऊ शकतो.

३) व्यष्टी अध्ययन पद्धती ही अधिक खर्चिक व अधिक वेळ खाणारी पद्धती आहे.

४) व्यष्टी अध्ययन पद्धती ही नमुनापद्धतीवर आधारित नसल्यामुळे या पद्धतीत प्रातिनिधिक एककाचा अभ्यास होऊ शकत नाही.

५) या पद्धतीत तथ्याची सत्यता पारखता येत नाही, कारण सत्यता मापण्यासाठी कोणताही मापदंड नाही.

समारोप

समाजिक संशोधनात व्यष्टी अध्ययन ही एक महत्त्वपूर्ण संशोधन पद्धती आहे. व्यष्टी अध्ययन करित असतांना कालचक्राचा (Time Element) प्रभाव अध्ययनात दिसून येतो. त्यामुळे या पध्द्तीत विशिष्ट विषयावरील सखोल माहिती प्रत्यक्ष स्वरूपात मिळविली जाते. तसेच एखादा समुह, व्यक्ती, संस्था इत्यादी एककांचा सूक्ष्म अभ्यास करायचा असेल तर व्यष्टी अध्ययन पद्धती अत्यंत उपयोगी ठरते.

संदर्भसूची

१. आगलावे, प्रदिप. (२०००). संशोधन पध्द्ती शास्त्र व तंत्र. नागपूर: विद्याप्रकाशन.

२. कन्हाडे, बी. एम. (२००७). शास्त्रीय संशोधन पध्द्ती. नागपूर: पिंपळापूरे प्रकाशन.

३. भांडारकर, पु. ल. (१९८७). सामाजिक संशोधन पध्द्ती. नागपूर: महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ.

४. सोमण. मा. रा. (१९८४). सामाजिक संशोधन तंत्रे. पुणे: विद्यार्थी प्रकाशन

५. निकोसे, सत्यप्रकाश. (२००७). ग्रंथालय आणि माहिती शास्त्र संशोधन पध्द्ती. नागपूर: प्रज्ञा प्रकाशन.

६. कायदे—पाटील, गंगाधर, (२००६). संशोधन पध्द्ती. नाशिक: चैतन्य पब्लिकेशनस

७. पाटील, बा. भा. (२००६). संशोधन पध्द्ती. पुणे: प्रशांत पब्लिकेशन्स

८. काचोळे, दा. धो. (१९९३). सामाजिक संशोधन पध्द्ती. औरंगाबाद: कैलास पब्लिकेशनस

९. घाटोळे, रा. ना. (१९९०). समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती. नागपूर: मंगेश प्रकाशन

14

जयशंकर प्रसाद के नाटकों में राष्ट्रीय चेतना

डॉ. निभा शांतिलाल उपाध्याय
हिंदी विभागाध्यक्ष,
श्रीमती राधा देवी गोयनका महिला महाविद्यालय
अकोला, महाराष्ट्र

प्रस्तावना:— जयशंकर प्रसाद छायावाद के आधार स्तंभ कवि तथा हिंदी साहित्य जगत के प्रसिद्ध कथाकार, नाटककार उपन्यासकार आदि के रूप में साहित्य जगत में विख्यात है। सफल नाटककार जयशंकर प्रसाद जी ने कई नाटक लिखे है उनके हर एक नाटक की अपनी विशेषताएं है ।

चंद्रगुप्त और स्कंदगुप्त नाटकों में स्वर्णिम अतीत को वर्तमान के लिए प्रेरणादायी बनाने वाले जयशंकर प्रसाद के नाटकों में राष्ट्रीय चेतना का स्वर प्रमुख है— प्रसाद जी ने नाटक, उपन्यास, कहानी, निबंध आदि अनेक साहित्यिक विधाओं में उच्चकोटि की रचनाओं का सृजन किया है। उन्होंने अपने अधिकांश साहित्य को ऐतिहासिक कलेवर में रचा है। उनके सभी नाटक भारत के स्वर्णिम अतीत का महिमा गान करते हुए प्रतीत होते हैं। महाभारत से लेकर हर्षवर्धन तक के काल को प्रसाद जी ने अपने नाटकों का आधार बनाया है।

किसी का हमने छीना नहीं, प्रकृति का रहा पालना यहीं हमारी जन्मभूमि थी यही, कहीं से हम आए थे नहीं। १

राष्ट्रीय चेतना का तात्पर्य किसी विशेष राष्ट्र के लोगों के बीच एक समान इतिहास, संस्कृति और मूल्यों के प्रति पहचान, अपनेपन और जागरुकता की समरूप भावना से है।

राष्ट्रीयता का अर्थ यह है कि प्रत्येक व्यक्ति राष्ट्र का अंश है और इस राष्ट्र की सेवा के लिए इसको धन—धान्य से संपन्न बनाने के लिए प्रत्येक व्यक्ति को सब प्रकार के त्याग और कष्ट स्वीकार करने चाहिए। प्रसाद जी ने अपने नाटकों में भारत भूमि का गौरव गान करते हुए उसके जो चित्र अंकित किए

है वह हृदय पर अमिट छाप छोड़ते हैं। भारत की गुलामी को लेकर प्रसाद जी के मन में गहरी व्यथा थी वे चंद्रगुप्त नाटक में ऐतिहासिक प्रसंग के माध्यम से भारत के स्वतंत्र होने के विश्वास की वाणी दी ।

जयशंकर प्रसाद के नाटकों में राष्ट्रीय चेतना:—

प्रसाद जी के नाटक हिन्दी साहित्य की अनमोल निधि है इनके नाटकों में एक विशेष प्रकार का उदात्त तत्व है। इनमें भारत की सांस्कृतिक गौरव गरिमा और राष्ट्रीय चेतना को वाणी मिली है। स्वतंत्रता के पूर्व किसी लेखक ने कहा था—

नैराश्यपूर्ण वर्तमान और भविष्य में प्रसादजी के आशावादी नाटक, राष्ट्रीय आंदोलन को अग्रसर करने के अनुपम साधन है। इस रूप में उनका महत्व किसी राष्ट्रीय नेता से कम नहीं है। ब्रज रत्नदास के शब्दों में प्रसाद जी के हृदय में देशप्रेम भग हुआ था, पर वह कर्मशील न होकर मानवशील ही अधिक थे। इसलिए देश— हितकारी कार्यों में हाथ न बटा सकने पर अपनी साहित्यिक रचनाओं से ही देश का जो उपकार कर सकते थे, वहीं उन्होंने यथा शक्ति पूरी तरह से किया। २

प्रसाद जी के सभी नाटकों का आधार स्तंभ इतिहास है,

परंतु उनकी प्रेरणा— राष्ट्रीयता है। जयशंकर प्रसाद के अभ्युदय से राष्ट्रीय चेतना का पूर्ण विकास हुआ है, वे अपने नाटकों में राष्ट्र की रक्षा और आत्मसम्मान पर बराबर बल देते रहे। स्कंद गुप्त, चंद्रगुप्त, ध्रुवस्वामिनी आदि नाटक इसके उत्कृष्ट प्रमाण है। चंद्रगुप्त नाटक में राष्ट्रीयता का उद्घोष प्रसाद जी चाणक्य के माध्यम से करवाते है—

स्त्रियांना दुय्यमत्व देण्यामागे जी पुरुषी राजकारण आहे त्याचा नायनाट करणे हे स्त्रीवादाचे मूळ उद्दिष्ट आहे. या स्त्रीवादाअंतर्गत अनेक गोष्टींचा समावेश होतो. स्त्रीलाही स्वतःचे अस्तित्व आहे, त्यांना स्वविकास, स्वतंत्रता याची आवश्यकता आहे. स्वत:चीओळख, स्वायत्तता, स्वयंनिर्णय, सक्रिय सहभाग या सर्व गोष्टी स्त्रियांना व्यक्ती म्हणून परिपक्व बनवितात. त्या मिळवून देण्याचा प्रयत्न स्त्रीवादी चळवळीने केला. पाश्चात्त्य स्त्रीवादाच्या विचारसरणीत मानसन्मान सर्व प्रकारची स्वातंत्र्य आणि समानता यावर भर देण्यात आला आहे. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांच्या उद्धाराचे प्रयत्न राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, आगरकर, न्यायमूर्ती रानडे, महर्षी कर्वे इत्यादी पुरुषांनीच मोठ्या प्रमाणामध्ये सुरू केले. कुटुंब संस्थेला भारतीय संस्कृतिमध्ये अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. पिता, भाऊ, मामा, काका या नातेसंबंध मधून स्त्री विकासाचे मार्ग आपल्याला खुले झालेले दिसतात. व्यक्ती स्वातंत्र्यापेक्षा समाजहितासाठी त्याग करण्याची परंपरा भारतात असल्याने स्त्रीवादी भूमिका भारतीय परिप्रेक्षामध्ये पाश्चात्त्य विचारांपेक्षा वेगळी करण्याची आवश्यकता आहे.

पर्यावरण संरक्षण आणि भारतीय स्त्री:

पर्यावरण संरक्षणात महिलांनी नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शिवाय, स्त्रिया देखील लोकसंख्येच्या स्फोटावर नियंत्रण ठेवण्यास मदत करू शकतात. त्यामुळे वातावरणातील भयानक परिस्थितीं नियंत्रणात राखली जावू शकते. कौटुंबिक नियोजनात जास्तीत जास्त योगदान देण्यासाठी वैज्ञानिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्या महिला सर्वोत्तम स्थितीत आहेत. कुटुंबाच्या आणि समाजाच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यात महिलांनी नेहमीच महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. पारंपारिक अल्प उर्जा संसाधने आणि उर्जा वापराच्या कार्यक्षम तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे लोकांना, विशेषतः महिलांना घरगुती उर्जा गरजांसाठी त्यांच्या स्वतःच्या श्रमावर आणि जैवउर्जास्रोतांवर अवलंबून राहावे लागते. त्यांच्या रोजच्या गरजा. पुरेसे पर्यावरणीय शिक्षण आणि जागरुकतेमुळे स्त्रिया या पुरुषांच्या तुलनेत अधिक कार्यक्षमतेने ऊर्जा संसाधनांचे संरक्षण करू शकतात. घरातील स्वच्छतेची जबाबदारी महिलांवरच असते. घरातील सर्व (कुटुंबातील) सदस्यांचे आरोग्य स्त्रियांवरच बरेचसे अवलंबून असते. महिलांना योग्य ज्ञान, शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन बहुतेक जलजन्य, अन्न आणि वायुजन्य रोग कमी करता येतात.

मध्ययुगीन आणि अलीकडच्या पुरुष प्रधान परंपरेने महिलांना निर्णय घेण्याच्या अधिकारापासून दूर ठेवले होते. स्त्रियांचा शिक्षणाचा असमान प्रवेश आणि सर्व स्तरांवर निर्णय अधिकाराचा अभाव यामुळे महिलांचे समाजातील

स्थान खालावले आहे. परिणामी उत्पन्न, पोषण, आरोग्य, सामाजीक स्तर आणि घरगुती ज्ञानावर त्याचा विपरीत प्रभाव पडलेला दिसून येतो. व्यावहारिकदृष्ट्या निसर्गाच्या जवळ असल्याने, स्त्रिया नेहमीच पर्यावरणीय समस्या चांगल्या प्रकारे जाणण्यास सक्षम असतात. स्त्रिया या सुविधांचा संभाव्य वापरकर्त्या असल्याने, पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या नियोजनात आणि त्यासाठीचे विविध उपक्रम व प्रकल्प राबवताना महिलांना प्राधान्य देण्याचा किंवा सम प्रमाणात सामावून घेण्याचा विचार करणे आवश्यक आहे. महिलांनी पर्यावरण क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. तो आदर्श समाजाला अवगत करून देणेही आवश्यक आहे.

पर्यावरणवाद आणि स्त्रीवाद यांतील संबंध अधोरेखित करणाऱ्या चळवळीला पर्यावरणवादी स्त्रीवाद म्हटले जाते. या अनुषंगाने आज आपल्याकडेही अनेक महिला कार्यरत आहेत. त्यांच्ये कार्य ही सामाजिक, आर्थिक क्षेत्रात नवीन भर घालून शास्वत विकासाचे स्वप्न पूर्ण करणारे आहेत. अशा काही प्रमुख महिलांचे कार्य पुढील प्रमाणे.

जागतिक पर्यावरणवादी महिला

वांगारी माथाई:

सन 2004 पर्यावरण विकास आणि शांतता या कार्याबद्दल नोबेल पारितोषिक प्राप्त पहिली आफ्रिकन महिला केनियन पर्यावरणवादी सामाजिक कार्यकर्ता अंगारी मथाई यांनी पर्यावरण आणि वृक्ष संवर्धन आयुष्यभर ठामपणे भूमिका मांडली होती. आपल्या राहत्या घरामागील हिरवागार डोंगर व्यापारी हेतूने झालेल्या जंगलतोडीमुळे ओसाड पडून जमिनीची धूप पाण्याचे प्रदूषण स्थानिक लोक प्रचंड समस्यांनी घेरले गेले पुढारी उत्पन्न थांबले महिलांना जळण्याच्या लाकडासाठी वन वन या समस्या पाहून त्यांनी आपल्या या विषयावर अभ्यास करण्याचे ठरविले आणि वृक्षतोडीवर वृक्ष लागवड आणि संवर्धन हा एकमेव मार्ग अवलंबिला तीन वर्षातच त्यांनी तीन कोटीहून अधिक झाडे लावली महिलांमध्ये प्रबोधन घडवून आणून त्यांच्याकडून त्यांनी सर्व कार्य करून घेतले होते कमी शिकलेल्या गरीब जनतेत आपला कोणताही तंत्रज्ञाना शिवाय अथवा भांडवला शिवाय अक्षर आणि संवर्धनाचे काम करू शकतो हा विश्वास त्यांनी निर्माण केला एक भरगच्च सावली आणि पोटापाण्यासाठी अन्नाची सोय करण्यासाठी जनतेला प्रवृत्त केले त्यांची ही चळवळ लोक चळवळ म्हणून नावारूपाला आले. त्यांच्या या कार्यामधून त्यांनी राजकारणामध्ये प्रवेश केला आणि राजकारणामध्ये सुद्धा त्यांनी पर्यावरण मंत्रीपद स्वीकारलं वंगारी मथाई यांना मामामिठी अर्थातच **'वृक्ष माता'** ही पदवी दिली.

इसतोउ सेसाय (Isatou Ceesay):

इसतोउ सेसाय, पुनर्चक्रीकरणाची राणी अर्थात "Queen of Recycling" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एक गॅम्बियन पर्यावरण कार्यकर्त्या आहेत. त्यांनी गॅम्बियामध्ये वन प्लास्टिक बॅग नावाची पुनर्वापराची चळवळ सुरू केली. इसतोउ सेसाय यांनी नागरिकांना विविध वस्तूंचा व संसाधनांचा पुनर्वापर करण्याविषयी आणि निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी शिक्षित करण्याचे काम केले आहे. त्यांनी प्लास्टिकचे धागे तयार करणाऱ्या एका प्रकल्पाची स्थापना केली आणि त्यामाध्यमातून पुनर्चक्रीत केलेल्या कचऱ्यापासून पिशव्या बनविल्या जातात. त्यांच्या या प्रकल्पामुळे तिच्या गावातील कचऱ्याचे प्रमाण नाटकीयरीत्या कमी झाले आहेच, पण त्या या प्रकल्पाच्या माध्यमातून शेकडो पश्चिम आफ्रिकन महिलांना रोजगार देत आहेत आणि त्यांना मासिक उत्पन्नही मिळवून देत आहे.

मे बोईवे:

मे बोईवे (May Boeve) या वेबसाइट 350.org च्या सह-संस्थापक आहेत. ही संस्था जगभरातील नेत्यांना जोडून हवामान बदलाविरुद्ध काम करण्यासाठी समर्पित आहे. वातावरणातील कर्बवायूची (कार्बन डाय ऑक्साईडची) पातळी जागतिक तापमानवाढ अंदाजानुसार धोकादायक होणार नाही अशा बिंदूपर्यंत कमी करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी मे बोईवे यांची ही संस्था जीवाश्म इंधन उद्योगासारख्या थेट कर्ब उत्सर्जन स्त्रोताकडे लक्ष देऊन कार्य करतांन दिसून येते. त्यासाठी. मे बोईवे या जीवाश्म इंधन उद्योगाची शक्ती मर्यादित करून, ते कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन मर्यादित करण्याबद्दल सरकारला कृतीशील मार्गदर्शन करतात.

भारतीय पर्यावरणवादी महिला:

पूर्वापार भारतीय संस्कृतीत महिलांचे पर्यावरणाशी अतूट नाते आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाच्या उद्देशाने कोणत्याही देशातील उपाययोजनांसाठी स्त्रियांची भूमिका महत्त्वाची आहे. याचे उदाहरण म्हणजे भारतीय महिलांचा पर्यावरण चळवळी व आंदोलनातील सक्रीय सहभाग व सक्षम नेतृत्व, किंबहुना भूतकाळातील संवर्धन चळवळींमध्ये महिलांचे मोठे योगदान असल्याचे दिसून येते.

गौरा देवी:

चिपको, म्हणजे मिठी मारणे. झाडांना तोडण्यापासून रोखण्यासाठी मिठी मारून केले जाणारे हे आंदोलन होते. 'वृक्ष बचाव चळवळ' हा विषय जो की,चिपको नावाने ओळखला जातो तो जवळपास सर्व शाळांमध्ये शिकवला जातो. गौरा देवी यांच्या नेतृत्वाखाली चिपको आंदोलन सुरू झाले. गौरा देवी यांनी सहकारी महिलांना झाडास गळाभेट

देण्यासाठी, म्हणजेच चिटकून राहण्यासाठी आणि झाड कापण्यापासून रोखण्यासाठी संघटित केले. त्या रेणी गावातील महिला मंगल दलाच्या प्रमुख होत्या. ज्या दिवशी लाकूडतोडे झाडे तोडणार होते, त्या दिवशी गौरी देवीनी २७ स्त्रियांना त्यांचा सामना करण्यासाठी नेले. कारण, त्या दिवशी पुरुष मंडळी बाहेरगावी चमोलीला गेले होते. तिने सुरुवातीला झाडे तोडण्यासाठी आलेल्यांची बोलण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचे ऐकून घेऊन दाद न देता या लाकूडतोड्यांनी महिलांना शिवीगाळ करून धमक्या दिल्या. त्यामुळे महिलांनी झाडे तोडण्यापासून रोखण्यासाठी त्यांना मिठी मारण्याचा निर्णय घेतला. लाकूडतोडे शरणागती पत्करून निघून जाईपर्यंत त्यांनी रात्रभर झाडांचे रक्षण केले. या चळवळीची बातमी शेजारच्या गावांमध्ये वेगाने पसरली आणि अन्य लोकही मोठ्या प्रमाणात त्यात सामील झाले. उत्तराखंडच्या इतर भागांमध्येही वृक्षबचावासाठी अशीच पुनरावृत्ती झाली आणि त्यामुळे महिलांना पर्यावरणीय रक्षणाचा उपाय म्हणून पाहिले गेले.

मेधा पाटकर:

मेधा पाटकर यांना एक लोकप्रिय पर्यावरणवादी, नर्मदा बचाव आंदोलन (NBA) मध्ये त्यांच्या सक्रिय भूमिकेसाठी ओळखले जाते. त्यांनी नर्मदा नदीवर मोठ्या धरणाच्या बांधकामाविरुद्ध लोकजागृती करून एक शक्तिशाली जनआंदोलन उभे केले. प्रस्तावित सरदार सरोवर धरण हा कोट्यवधींचा प्रकल्प आहे आणि त्यामुळे ३२०,००० हून अधिक लोक विस्थापित झाले असतील. मेधा पाटकर यांच्यावर पुनर्वसनात अडथळे आणण्यासाठी परदेशी निधी वापरला जात असल्याचा आरोप करण्यात आला. मेधा पाटकर यांना या प्रकल्पाची तिथल्या स्थानिक लोकांना कल्पना नसल्याची खंत होती. म्हणून, त्यांनी पर्यावरण आंदोलनासाठी १९८९ मध्ये एनबीएची स्थापना केली आणि तेव्हापासून त्या या चळवळीत सामील आहेत. या नर्मदा प्रकल्पाचा निषेध करण्यासाठी शांततापूर्ण मार्ग म्हणून त्यांनी अनेकवेळा उपोषण केले. त्यानंतर नर्मदा बचाव आंदोलन उभे करून उच्चस्तरीय जागरूकता निर्माण केली आहे.

सुनीता नारायण:

'सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट' (CSE) च्या महासंचालक आणि 'डाउन टू अर्थ' च्या प्रकाशक आहेत. सुनीता नारायण यांनी १९८० च्या दशकात अनिल अग्रवाल यांच्या सोबत पर्यावरणतज्ज्ञ म्हणून 'स्टेट ऑफ इंडिया' नावाने देशाच्या पर्यावरण अहवालाचे सह-संपादित केलेल्या कामात पुढाकार घेऊन पर्यावरण क्षेत्रातील कामास सुरुवात केली. सरिस्का येथे वाघांचे नुकसान झाल्यानंतर, सुनीता नारायण यांनी २००५ मध्ये संरक्षणासाठी टायगर टास्क फोर्सचे अध्यक्षपद भूषवले. सुनीता नारायण या पंतप्रधानांच्या हवामान बदल परिषदेच्या आणि राष्ट्रीय गंगा नदी खोरे प्राधिकरणाच्या सदस्या होत्या. त्या माध्यमातून त्यांनी नदी स्वच्छता कार्यक्रमात कार्य केले. सन 2005, 2008 व 2009 मध्ये सुनीता नारायण यांना 'यूएस जर्नल फॉरेन पॉलिसीने' जगातील १०० सार्वजनिक बुद्धिवाद्यांच्या यादीत स्थान दिले होते. तसेच. सुनीता नारायण यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हवामान बदलावर भर देणारी जागतिक लोकशाही आणि वन संसाधन व्यवस्थापन आणि जलसंबंधित समस्या हाताळणारी स्थानिक लोकशाही हे त्यांच्या संशोधनाच्या आवडीचे विषय आहेत.

मेनका गांधी:

प्रसिद्ध भारतीय राजकारणी संजय गांधी यांच्या पत्नी होत्या. तरीही, मेनका गांधी या जगभर त्यांच्या वेगळ्या कारणांसाठी ओळखल्या जातात. मेनका गांधी या एक प्राणी हक्क नेत्या आणि पर्यावरणवादी नेत्या म्हणून परिचित आहेत. सन १९९४ मध्ये मेनका गांधी यांनी 'पीपल फॉर ॲनिमल्स' (People for Animals) ही भारतातील प्राण्यांच्या कल्याणासाठी सर्वात मोठी संस्था स्थापन केली. मेनका गांधी यांचा अहिंसेवर विश्वास दृढ असल्याने भारतात प्राण्यांशी होणारी निर्दयी वागणूक थांबवण्यासाठी चळवळीची गरज ओळखली. म्हणून मेनका गांधी यांनी पुढाकार घेऊन "हेड्सअँडटेल"हाटीव्हीकार्यक्रमअँकरकेलाआणित्याचशीर्षकाखालीएकपुस्तकलिहिले.
मेनकागांधीयादरवर्षीवर्षातीलसर्वोत्कृष्टपर्यावरणीयनवकल्पनांनापुरस्कारदेणाऱ्या'इंटरनॅशनलएनर्जीग्लोबफाउंडेशन' च्याज्युरीच्याअध्यक्षम्हणूनजबाबदारीसांभाळीतआहेत. प्राण्यांबाबतच्या त्यांच्या क्रांतिकारी रक्षणकार्यासाठी, त्यांना जगातील काही सर्वोच्च पुरस्कार मिळाले आहे.

वंदना शिवा:

दिल्लीस्थित पर्यावरणवादी आणि पर्यावरणीय स्त्रीवादी (Eco-feminist) आहेत. त्या अहिंसक गांधीवादाच्या अनुयायी आहेत, अहिंसक मार्गाने जंगलांचे रक्षण करण्यासाठी, महिलांचे नेटवर्क आयोजित करण्यासाठी आणि स्थानिक जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी सर्वहारा प्रयत्नांसाठी कार्य केल्याने त्या पर्यावरण क्षेत्रात प्रसिद्ध आहेत. मुळत: त्या भौतिकीशास्त्रज्ञ आणि विज्ञानाच्या तत्वज्ञानी आहेत. त्यांनी मोनोकल्चर्स ऑफ द माइंड, बायोपायरेसी अँड सॉइल नॉट ऑइल: एन्व्हारॉन्मेंटल जस्टीस, स्टेइंग अलाइव्ह:वुमन, इकोलॉजी अँड डेव्हलपमेंट सारखी पर्यावरणाशी संबंधित पुस्तके लिहिली आहेत. त्यांना सन २००३ मध्ये, टाइम मॅगझिनने पर्यावरणीय 'नायक' म्हणून नवी ओळख दिली. वंदना शिवा या डेहराडून येथील रिसर्च फाउंडेशन फॉर सायन्स, टेक्नॉलॉजी आणि नॅचरल रिसोर्स पॉलिसीच्या संचालक आहेत.

त्यांच्या पर्यावरणक्षेत्रातील कार्याबद्दल त्यांना नोबेल पारितोषिकाच्या समांतर मानला जाणारा 1993 चा राइट लिव्हलीहुड अवॉर्ड देण्यात आला. 'नवदन्य' ही राष्ट्रीय चळवळ शेतकरी, महिला आणि भूमी यांना अग्रस्थानी मानून अन्नधान्य उत्पादनाच्या बीज रूपातील सजीव संसाधनांच्या विविधतेचे रक्षण करण्यासाठी सुरु केली. अर्थात, त्यांच्या उत्तेजनातून व सहभागातून सन 1991 मध्ये ती निर्माण झाली. त्याच्या अवघ्या 20 वर्षापासूनच्या कार्यातून त्यांनी तांदळाच्या 2000 हून अधिक जातींचे जतन केले गेले आहे आणि देशभरातील 13 राज्यांमध्ये एकूण 34 बीजपेढी, अर्थात बियाणे बँकांची स्थापना करण्यात योगदान दिले आहे.

सुगथाकुमारी:

सुगथाकुमारी या दक्षिण भारतीय कवयित्री आणि पर्यावरणवादी म्हणून त्यांची ओळख आहे. सुगथाकुमारी यांनी त्यांचे बहुतेक लेखन पर्यावरणाला म्हणजेच, निसर्ग मातेला समर्पित केले आहे. त्या केरळ राज्याच्या रहिवासी आहेत. दक्षिण भारतातील पर्यावरण आणि स्त्रीवादी चळवळींमध्ये त्या आघाडीवर राहिली आहेत. त्यांनी प्रकृती संरक्षण समितीची स्थापना केली आहे. या समितीच्या माध्यमातून त्यांनी केरळच्या पलक्कड जिल्ह्यातील सदाहरित उष्णकटिबंधीय जंगल, सायलेंट व्हॅलीच्या संरक्षणाच्या उद्देशाने 'सेव्ह सायलेंट व्हॅली' चळवळीच्या माध्यमातून पर्यावरणनाशाबाबत निषेध नोंदवून पर्यावरणपूरक भूमिकेतून सामाजिक चळवळीत सक्रीय सहभाग घेतला होता.

राधा भट्ट:

राधा भट्ट यांनी सन 2008 मध्ये उत्तराखंड भागात नदी बचाओ अभियानाचा सक्रियपणे वापर करून जलविद्युत प्रकल्पांच्या बांधकामाला विरोध करण्यासाठी आवाज उठविला. या जलविद्युत प्रकल्पांच्या मालिकेच्या बांधकामाने केवळ गंगा आणि तिच्या बहुतेक उपनद्यांचा प्रवाह धोक्यात आणला नाही तर नाजूक, मोठ्या प्रमाणावर धोका निर्माण केला. ही बाब राधा भट्ट यांनी अभ्यासून जनमत तयार करून लोकांच्या हक्कासाठी चळवळ उभी केली आहे. हिमालयीन व संबंधित राज्याच्या जंगलतोड झालेल्या प्रदेशातील पर्यावरण रक्षणासाठी व लोकांच्या पाण्याच्या हक्कासाठी राधा भट्ट यांनी चळवळ उभी करून आवाज उठवण्यासाठी 2000 किलोमीटरची पदयात्रा काढली. त्यामुळे त्यांची पर्यावरण नेत्या म्हणून देशात ओळख आहे.

एकूणच, पर्यावरण क्षेत्रातील उपरोक्त उदाहरणांवरून या सर्व पर्यावरणवादी महिलांचे, महिला नेत्या म्हणून केलेले कार्य, समर्पण, योगदान, क्षमता व कर्तृत्व यांचा विचार करून जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने काही अपेक्षा ठेवायला हरकत नाही. पर्यावरण व्यवस्थापनाशी संबंधित महिला निर्णयकर्ते, नियोजक, सल्लागार आणि व्यवस्थापक यांचे संरक्षण वाढवले पाहिजे, त्याकरिता नागरी भागाबरोबरच ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाचेप्रमाण आणि स्तर उंचावला पाहिजे व पर्यावरण शिक्षणाचा विस्तार झाला पाहिजे. विविध पर्यावरण चळवळीतील सहभागावरून स्त्रिया एकदा एकत्र आल्यावर पर्यावरण संरक्षणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात, हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षमतेचा वापर पर्यावरणाशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी महिलांना अधिक वेळ देता यावा यासाठी महिलांच्या घरातील आणि बाहेरील कामाचा ताण कमी करण्यासाठी केला पाहिजे असे मत डॉ मागो व गुणवाल यांनी त्यांच्या अभ्यासातून मांडले आहे, ते योग्य वाटते. शाश्वत विकासात महिलांच्या पूर्ण सहभागासाठी विविध घटनात्मक, कायदेशीर, प्रशासकीय, सामाजिक आणि आर्थिक स्वरूपातील अडथळे दूर करण्यासाठी केंद्र सरकारने धोरण विकसित केले पाहिजे. अशा विकसित धोरणाद्वारे प्रोत्साहित करून सरकार, गैर सरकारी व स्वयंसेवी संस्था, पर्यावरण संवर्धन संस्था आणि सामान्य माणसांनी आपल्याला टिकून राहणाऱ्या नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि समृद्ध करण्यासाठी महिलांना सक्रिय सहभागी म्हणून ओळखले पाहिजे आणि त्यांना एकत्रित केले पाहिजे. याबरोबरच, औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाद्वारे पर्यावरणरक्षणाकरिता जागरूकता निर्माण करताना महिलांच्या भूमिकेचे योग्य मूल्यमापन करून ते प्रसारित करणे आवश्यक आहे. या मोजक्या अपेक्षा करणे अनाठायी ठरणार नाही.

संदर्भसूची :

1- Shiva Vandana (2014) Sacred Seed, Golden Sufi Center, U.S.
2- Shiva Vandana (2010), Maria Mies Ecofeminism, Rawat Publication, Jaipur
3- Datar Chhya (2011) Ecofeminism Revisited: Introduction to the Descourse, Rawat Publication, Jaipur
4- Warren Karen, J (2018) Ecofeminism Women, Culture Nature, Rawat Publication, Jaipur
5- Mate Kavita: https://marathivishwakosh.org/46302/
6- Chavan Balbhim L. : https://janvicharnews.com/3777/

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

डॉ.हनुमंत अंकुशराव भोसले
सहाय्यक प्राध्यापक,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग
जी.एस कॉलेज, खामगाव

डॉ प्रदिप विठ्ठलराव ताकतोडे
सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला महाविद्यालय,
मलकापूर अकोला

डॉ; नितीन ज्ञानदेव चौधरी
सहाय्यक प्राध्यापक,
विभाग प्रमुख
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग
श्रीमती राधादेवी गोयनका
महिला महाविद्यालय
अकोला

Two - Day 47th Annual Conference of **Vidharbha Arthashastra Parishad**
@ Gondwana University, Gadchiroli.
3rd & 4th February, 2024

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार

ABSTRACT

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म 1 ऑगस्ट 1888 रोजी परभणी, महाराष्ट्र, भारत येथे झाला. ते एका सामान्य कृषी कुटुंबातील होते आणि त्यांचे सुरुवातीचे जीवन शिक्षण आणि सामाजिक सुधारणांच्या वचनबद्धतेने चिन्हांकित होते. त्यांनी कायद्याचे उच्च शिक्षण घेतले आणि पुढे संस्कृतमध्ये पदव्युत्तर पदवी घेतली.

डॉ. देशमुख यांच्या सुरुवातीच्या काळात भारतामध्ये महत्त्वपूर्ण सामाजिक-आर्थिक आणि राजकीय बदल होत होते. देश ब्रिटीश औपनिवेशिक राजवटीत होता आणि या वर्चस्वाचा प्रभाव समाजाच्या विविध क्षेत्रांवर खोलवर जाणवला. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेली कृषी क्षेत्र शोषक जमीन महसूल प्रणाली आणि आधुनिक तंत्राचा अभाव यासारख्या आव्हानांना तोंड देत होते.भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीची महत्त्वाची भूमिका ओळखून डॉ. देशमुख यांनी कृषी सुधारणांना चालना दिली. त्यांनी शेती पद्धतीमध्ये वैज्ञानिक पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर भर दिला. शिवाय, त्यांनी यशस्वी सहकारी चळवळींच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, विशेषत: गुजरातमधील अमूल डेअरी सहकारी, जी संपूर्ण देशासाठी एक मॉडेल बनली.डॉ. पंजाबराव देशमुख यांना भारतीय कृषी क्रांतीचे प्रणेते म्हणून सुद्धा ओळखले जाते. 'बहुजन हिताय' व 'शेतकरी सुखी तर देश सुखी' हाच भाऊसाहेबांच्या जीवनाचा खरा मूलमंत्र होता.

प्रस्तावना

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म 1 ऑगस्ट 1888 रोजी परभणी, महाराष्ट्र, भारत येथे झाला. ते एका सामान्य कृषी कुटुंबातील होते आणि त्यांचे सुरुवातीचे जीवन शिक्षण आणि सामाजिक सुधारणांच्या वचनबद्धतेने चिन्हांकित होते. त्यांनी कायद्याचे उच्च शिक्षण घेतले आणि पुढे संस्कृतमध्ये पदव्युत्तर पदवी घेतली.

डॉ. देशमुख यांच्या सुरुवातीच्या काळात भारतामध्ये महत्त्वपूर्ण सामाजिक-आर्थिक आणि राजकीय बदल होत होते. देश ब्रिटीश औपनिवेशिक राजवटीत होता आणि या वर्चस्वाचा प्रभाव समाजाच्या विविध क्षेत्रांवर खोलवर जाणवला. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेली कृषी क्षेत्र शोषक जमीन महसूल प्रणाली आणि आधुनिक तंत्राचा अभाव यासारख्या आव्हानांना तोंड देत होते.

भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीची महत्त्वाची भूमिका ओळखून डॉ. देशमुख यांनी कृषी सुधारणांना चालना दिली. त्यांनी शेती पद्धतीमध्ये वैज्ञानिक पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यावर भर दिला. शिवाय, त्यांनी यशस्वी सहकारी चळवळींच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, विशेषत: गुजरातमधील

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

अमूल डेअरी सहकारी, जी संपूर्ण देशासाठी एक मॉडेल बनली.

डॉ. पंजाबराव देशमुख यांना भारतीय कृषी क्रांतीचे प्रणेते म्हणून सुद्धा ओळखले जाते. 'बहुजन हिताय' व 'शेतकरी सुखी तर देश सुखी' हाच भाऊसाहेबांच्या जीवनाचा खरा मूलमंत्र होता. त्यामुळेच त्यांनी भारतातील शेतकरी आणि येथील शेती व्यवस्था सुधारण्याकरिता शिक्षणाचा सर्व दूर सर्वसामान्यांपर्यंत प्रसार करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना कायदेशीर न्याय मिळावा, त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडावी, त्यांचे कोणी शोषण करू नये, शेतकरी भूलथापांना बळी पडू नये यासाठी त्यांनी वकिली व्यवसाय सुरू केला. जेणेकरून सर्वसामान्यांना सावकार, जमीनदार, व्यापारी यांच्या जाव्यातून मुक्त करता येईल. डॉ. पंजाबराव देशमुख बहुमुखी व्यक्तिमत्त्वाचे धनी होते. त्यामुळेच त्यांना 'शिक्षण महर्षी', कृषि तज्ञ, महान कर्ते समाजसुधारक, थोर विचारवंत, महामानव, निर्भीड राजकारणी, बहुजनांचे आणि शेतकऱ्यांचे कैवारी, स्पष्ट वक्ते, पहिले शेती सुधारक, कृतीनिष्ठ, कायदे पंडित आणि भारतीय शेतकऱ्यांचे हृदय सम्राट म्हणून संबोधले गेले आहे. भाऊ साहेबांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील 'पापळ' या गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यामुळेच लहानपणापासूनच शेतकरी आणि त्यांचे प्रश्न यांची जाण त्यांना होती. सोबतच शेतकऱ्यांच्या या स्थितीला कोण जबाबदार आहे याचे विचार लहानपणापासूनच त्यांच्या मनात येऊ लागले.

डॉ. पंजाबराव यांचे असे मत होते की, कृषी ही औद्योगीकरणाचा आधार आणि आर्थिक विकासाचे भांडवल आहे, तसेच शेतकरी हा सर्वात मोठा उत्पादक, उपभोक्ता आणि मतदाता आहे तरीसुद्धा त्याचे सर्व स्तरातून शोषण केल्या जाते. त्यामुळे तो दारिद्र्याच्या जगात वाढत आहे. उद्योगांना क्रशक्ती निर्माण करून देणारे शेतकरीच दारिद्र्यात ठेवले तर त्यांच्या देशाचे दारिद्र्य नष्ट होणार नाही. दारिद्र्याचा. राहणीमानावर आणि क्रशक्तीवर परिणाम होत असतो तेव्हा शेतकऱ्यांचे दारिद्र्य नष्ट करणे आवश्यक आहे.

अफाट लोकसंख्येला देशाबाहेरील शत्रू पराभूत करू शकत नाहीत या देशाचे शत्रू या देशातच आहेत दारिद्र्य, अज्ञान, बेकारी, भेदाभेद, भिकारी, वारांगणा, शोषण, फाळणी, अस्पृश्यता, विषमता, काळाबाजार, करबुडवेपणा, चोरटा व्यापार, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, मक्तेदारी, अराजक मूल्यांची धुळधान हे सारे अपराध आहेत. या साऱ्या परिस्थितीने भारतीय जीवनमान विस्कळीत केले आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक असंतोशाची हीच मूळ कारणे आहेत. कृषी क्रांती हीच यावरची खरी उपाययोजना आहे हेच खऱ्या अर्थाने डॉ. पंजाबरावांच्या कृतिशील विचारातून व्यक्त होते.

भाऊसाहेबांच्या मते, ग्रामीण शेतकऱ्यांचा विकास म्हणजेच देशाचा विकास, हा त्यांचा विचार म्हणजे महात्मा गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या संदेशाला अनुसरूनच आहे. देशातील आर्थिक विषमता, आर्थिक परावलंबन, अतिरिक्त खर्च आणि आर्थिक घसरण यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या निर्माण होऊन त्यांची परिणीती शेतकरी आत्महत्येत होईल, असे भाकित त्या काळातच भाऊसाहेबांनी केले होते. भारतातील सर्व राज्यात दूरपर्यंत शेतकरी शेती करतात. त्याचे संपूर्ण जीवन शेतीवर अवलंबून असते. त्यामुळे भारतीयांची मूळ कर्मभूमी कृषी प्रधान आहे, असे भाऊसाहेबांचे मत होते. त्यामुळेच भारतातील शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्येसाठी त्यांच्यामधील निरक्षरता आणि असंघटितपणा जबाबदार असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक सामाजिक विकासाकरिता कृषी सुधारणा करिता आणि त्यांचे संघटन मजबूत करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केलेले आहे.

शेतकरी संघ :

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

भाऊसाहेबांनी १९२८ मध्ये 'मध्यप्रांत आणि वऱ्हाड शेतकरी संघाची' स्थापना शेतकऱ्यांच्या समस्या समजून त्या कशा सोडवाव्यात याकरिता करण्यात आली. त्यांच्या मते, भारतातील शेतकरी अनेक कारणांनी विखुरलेले असल्याने त्यांच्यावर अन्याय अत्याचार आणि त्यांचे शोषण केले जाते. त्यामुळे शेतकरी संघटित झाल्याशिवाय त्याला हक्क आणि न्याय मिळविता येणार नाही. याकरिता शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आपले प्रश्न समजून घ्यावेत आणि सार्वजनिक उपाययोजना करावी. परंतु आज अशा शेतकरी संस्था कमी असून ज्या आहेत त्या प्रस्थापित राजकारणांनी प्रेरित असल्याचे आढळून येते. त्यामुळे शेतकऱ्यांना अशा संस्थांची आज नितांत गरज आहे.

ब्रिटिश काळातील मध्यप्रदेश विधानसभेवर 1930 साली निवडून आल्यानंतर भाऊसाहेबांनी शिक्षण, कृषी आणि सहकार मंत्री मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण कायदा, खादी विक्री प्रचार मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. तसेच प्रामुख्याने शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणाची समस्या दूर करण्याकरिता त्यांनी १९३१ मध्ये 'कर्ज लवाद कायदा' मांडला. कर्जबाजारी शेतकऱ्यांना सावकाराच्या जोखडातून कर्जमुक्त करण्यासाठी या कायद्याचे त्यांनी शासनाकडे आग्रह धरला. या कायद्यांतर्गत त्या काळामध्ये ९०% शेतकऱ्यांची सावकाराच्या तावडीतून मुक्तता करण्यात आली. त्यांच्या कर्ज लवाद समितीने हजारो कर्जाची प्रकरणे तात्काळ सोडवून शेतकरी वर्गाच्या आर्थिक समस्या कमी केल्याचे आढळते. शेतकरी आत्महत्याचे सत्र जे आज सुरू आहे, हे त्या काळातच सुरू झाले असते त्यामुळे आजही शेतकरी आत्महत्या रोखण्याकरिता भाऊसाहेबांचा कर्ज लवाद कायदा काळाची गरज ठरला आहे.

भारत कृषक समाज:

भाऊसाहेबांनी ही राष्ट्रीय संघटना १९५४ साली स्थापन केली. शेतकऱ्यांनी कृषी विकासाच्या योजना कशा निर्माण कराव्यात, त्या योजना शेतकऱ्यांनी समजून घ्याव्यात आणि या योजनांमध्ये शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे याकरिता मार्गदर्शन करण्याकरिता ही संघटना निर्माण केली की, जी आजही शेती व शेतकरी विकासाशी संबंधित अनेक कार्य करीत असताना आढळते. राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ आणि कृषक सहकारी भारतीय अधिकोष या संघटनेद्वारा निर्माण करण्यात आलेल्या आहेत.

शैक्षणिक कार्य आणि शेती विकास:

शेतकरी शिक्षित होणे गरजेचे आहे. शेतकऱ्याला शिक्षणाची गरज नाही आणि कुणीही योग्य रीतीने शेती करू शकतो हा सर्व दूर पसरलेला चुकीचा समज आहे. हा दृष्टिकोन बदलविणे अत्यंत आवश्यक आहे, असे डॉ. पंजाबराव यांचे मत होते. भारतातील बहुजनांच्या सर्व समस्यांचे मूळ निरक्षरता असल्याने शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळावे यासाठी अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष असताना शिक्षण सक्तीचे केले व शिक्षणावरील खर्च वाढवावा याकरिता शिक्षण करा मध्ये वाढ करण्याचे त्यांनी सुचविले होते. शेतकऱ्यांचे दुःख, दारिद्र्य दूर करण्यासाठी प्रथम तो शिक्षित झाला पाहिजे. शिक्षणाने त्याला आपल्या परिस्थितीची आणि आपले सामर्थ्याची खरी जाणीव होईल हे भाऊसाहेबांनी ओळखले होते. त्यामुळेच सर्वप्रथम १९५२ मध्ये भारतात शिक्षण सर्वसामान्य व्हावे याकरिता पंडित नेहरूंना त्यांनी एक प्रस्ताव सादर केला होता. तसेच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षण आयोगात ग्रामीण विद्यापीठ, लोक विद्यापीठाची, कृषी विद्यापीठाची संकल्पना त्यांनी मांडली. त्याचबरोबर कृषी शिक्षणाची कास धरून शेतकऱ्याच्या मुलांना शिक्षणामध्ये विशेष सवलतीवर त्यांनी भर दिला होता. भाऊसाहेबांनी स्त्री-शक्तीला ओळखून स्त्रियांच्या शिक्षणाला आणि अध्यापन कार्यात स्त्रियांचा सहभाग वाढविण्यावर सुद्धा भर दिला होता. शिक्षणाशिवाय बहुजनांच्या बुद्धीची धार तिक्ष होणार नाही. म्हणजेच शोषणाची लादलेली बंधने तोडणे त्यांना कधीच शक्य होणार नाही. याची भाऊसाहेबांना जाण होती, म्हणूनच सन १९३१ मध्ये त्यांनी अमरावती येथे 'श्री शिवाजी शिक्षण संस्थेची' स्थापना केली. आजही ही शिवाजी शिक्षण संस्था महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाची संस्था

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

असून शिक्षणाची गंगा सर्वसामान्य शेतकरी आणि बहुजनांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करीत असल्याचे आढळून येते.

स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून भाऊ साहेबांचे कार्य:

स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री म्हणून ऑगस्ट १९५२ मध्ये भाऊसाहेबांची निवड झाली. १९५२ मध्ये नंतर भारताचे पहिले कृषिमंत्री असताना सामुदायिक कृषी विकास योजना, गावोगाव सहकारी पतपेढ्या, भाताची जपानी पद्धत, गव्हाची मेकसिकन पद्धत यातून त्यांनी भारतात कृषी क्रांती घडवून आणली. शेतकऱ्यांच्या हितार्थ त्यांनी शेतकरी, शेतमजुरांसाठी शिक्षण आरोग्य वैद्यकीय सोयी इत्यादींची खबरदारी घेणे नितांत गरजेचे आहे म्हणून त्यासाठी शेतकऱ्यांच्या कल्याणाचे कायदे घटनेत अंतर्गत करून ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कल्याणकारी अधिकारी नियुक्त करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

भाऊ साहेबांच्या मते आपल्या देशात दर दहा व्यक्तींमागे सात व्यक्ती या आपल्या उदरनिर्वाहासाठी कृषीवर अवलंबून आहेत. गेल्या काही पिढ्यांपासून भारतीय शेतकरी कर्जत जन्म घेतो आणि कर्जातच जगतो आणि कर्ज फेडण्यापलीकडे क्वचितच काहीतरी करतो. म्हणून कृषी व्यवसायाला आव्हान देणाऱ्या या समस्येकडे फार काळ दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणून कृषी मंत्री असताना भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांकरिता अनेक भरीव असे कार्य केले आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना आधुनिक प्रशिक्षणासाठी परदेशी पाठविले, जपानी भात शेतीचे महत्व पटवून सांगितले, तसेच १९६० मध्ये भारतीय घटक राज्यातील शेतकरी मंडळाचे नेते म्हणून त्यांनी रशियाला भेट दिली आणि १९६३ मध्ये भारत कृषक समाजाच्या विकासासाठी न्यूझीलंड सुद्धा त्यांनी भेट दिली.

कृषी सहाय्यक संघटना:

भाऊसाहेबांच्या मते, सहकारातूनच शेती आणि शेतकरी विकास साध्य होऊ शकतो त्याकरिताच त्यांनी अखिल भारतीय मधमाशी पालक संघटना, अखिल भारतीय ताडगुळ महासंघ, भारतीय तरुण कृषी संघ, भारतीय कृषी यंत्रसामुग्री संघटना, भारतीय कृषी शास्त्र संस्था, कृषी उत्पादक आंतरराष्ट्रीय संघटना, आंतरराष्ट्रीय धान्य मंडळ, भारताबाहेर आफ्रो-आशियाई ग्रामीण पुनर्रचना संघटना इत्यादी शेती आणि शेतीशी संबंधित संघटना निर्माण करून शेतकऱ्यांसाठी स्थायी स्वरूपाचे भरीव असे कार्य भाऊसाहेबांचे आहे.

जागतिक कृषी प्रदर्शन:

भारतातील भूतो-ना-भविष्यती अशा कृषी प्रदर्शनीचे आयोजन भाऊसाहेबांनी १९५९-६० मध्ये दिल्ली येथे केले. दिल्ली मथुरा रोडवर १०० एकर जागेवर ही भव्य प्रदर्शनी भरविण्यात आली होती. या प्रदर्शनात भारत आणि भारताबाहेरील अनेक शेतकऱ्यांनी आणि संबंधित शेतकरी संस्थांनी आपली दालने उभी केली होती. कृषी प्रदर्शनीला शेतकऱ्यांनी दिलेला प्रतिसाद पाहून प्रदर्शनीच्या कालावधी शेवटी वाढवावा लागला. भारतातील शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची माहिती व्हावी, संकरित बियाणांचा वापर कसा करावा, नवीन तंत्रज्ञान समजून घ्यावे, दुसऱ्या शेतकऱ्यांचे शेतीविषयक आचार विचार समजून घ्यावेत यासाठी या प्रदर्शनेचे महत्त्व आहे. या प्रदर्शनीला देशातीलच नव्हे तर विदेशातील अनेक मान्यवरांनी भेटी देऊन मुक्तकंठाने या प्रदर्शनीची प्रशंसा केली की, ज्यामुळे भाऊसाहेबांना जागतिक स्तरावर शेतकऱ्यांचे खरे कर्ते म्हणून ओळख मिळाली.

आधुनिक कृषी पद्धती

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा आधुनिक कृषी पद्धतींचा पुरस्कार हा भारतीय शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांच्या दृष्टीचा आधारस्तंभ होता. या क्षेत्रातील त्यांचे प्रयत्न वैज्ञानिक तंत्रे, तांत्रिक प्रगती आणि प्रगतीशील धोरणे सादर करून पारंपारिक शेती पद्धतींमध्ये परिवर्तन करण्याचे उद्दिष्ट होते.

वैज्ञानिक शेतीला प्रोत्साहन:

डॉ. देशमुख यांनी उत्पादकता वाढविण्यासाठी शेतीमध्ये वैज्ञानिक पद्धतींचा समावेश करण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी सुधारित बियाणे, खते आणि कीड नियंत्रण उपायांचा वापर करून पीक उत्पादन वाढवण्याचा सल्ला

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

दिला. शाश्वत कृषी पद्धतींकडे नेणारे ज्ञान आणि साधने शेतकऱ्यांना सुसज्ज करण्याच्या उद्देशाने वैज्ञानिक शेतीवर त्यांचा भर होता.

आधुनिक तंत्रज्ञानाचा परिचय:

आधुनिक तंत्रज्ञानातील परिवर्तनाची क्षमता समजून घेऊन कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरणाचा अवलंब करण्याचे प्रतिपादन त्यांनी केले. यामध्ये ट्रॅक्टर, सिंचन प्रणाली आणि इतर आधुनिक उपकरणे यांचा शेतीच्या प्रक्रियेत सुसूत्रता आणण्याचा समावेश आहे. तंत्रज्ञानाच्या एकत्रीकरणाकडे श्रम-केंद्रित पद्धती कमी करण्यासाठी आणि कृषी क्षेत्रातील एकूण कार्यक्षमता वाढवण्याचे साधन म्हणून पाहिले गेले.

संशोधन आणि विकास उपक्रम:

डॉ.देशमुख यांनी कृषी क्षेत्रातील संशोधन आणि विकासाला प्राधान्य दिले. त्यांनी पीक वाण, मातीचे आरोग्य आणि शाश्वत शेती पद्धती यावर अभ्यास करण्यासाठी कृषी विद्यापीठे आणि संशोधन संस्थांच्या स्थापनेला पाठिंबा दिला.

संशोधनाचे निष्कर्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे, त्यांना नवीनतम ज्ञान आणि तंत्राने सक्षम करणे हे उद्दिष्ट होते.

शेतकऱ्यांसाठी विस्तार सेवा:

सतत पाठबळ आणि शिक्षणाची गरज ओळखून, डॉ. देशमुख यांनी कृषी विस्तार सेवा स्थापन करण्यास चॅम्पियन केले. या सेवांचा उद्देश वैज्ञानिक संशोधन आणि जमिनीवरील शेती पद्धती यांच्यातील अंतर कमी करणे आहे. विस्तार सेवांनी शेतकऱ्यांना सर्वोत्तम पद्धती, पीक व्यवस्थापन आणि शेतीमधील नवीनतम नवकल्पनांची माहिती दिली.

कृषी विकासासाठी धोरण तयार करणे:

केंद्र सरकारचे कृषी मंत्री या नात्याने डॉ. देशमुख यांनी शेतीच्या आधुनिकीकरणाला अनुकूल अशी धोरणे आखण्यात मोलाची भूमिका बजावली. या धोरणांमध्ये कृषी क्षेत्राला पाठिंबा देण्यासाठी जमीन सुधारणा, कर्ज सुविधा आणि पायाभूत सुविधांचा विकास समाविष्ट आहे. त्यांच्या धोरणात्मक उपक्रमांचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक आणि शाश्वत शेती पद्धतीकडे जाण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करणे हा आहे.

सहकारी शेती मॉडेल:

वैयक्तिक शेती-स्तरीय बदलांसोबतच, डॉ. देशमुख यांनी सहकारी शेती मॉडेल्सच्या स्थापनेची वकिली केली. यामध्ये शेतकऱ्यांना एकत्र येण्यासाठी आणि संसाधने एकत्र करण्यासाठी प्रोत्साहित करणे, सामूहिक निर्णय घेण्यास प्रोत्साहन देणे आणि आधुनिक पद्धतींचा अवलंब करणे समाविष्ट आहे. सहकारी शेती हे लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना सामायिक संसाधने आणि ज्ञान उपलब्ध करून देऊन त्यांना सक्षम करण्याचा एक मार्ग म्हणून पाहिले जात होते.

14 कलमी कार्यक्रम:

देशातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने भाऊसाहेबांनी 14 कलमी कार्यक्रम जाहीर केला होता. त्यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांना कमी व्याजाने कर्ज देण्याची मागणी, गावातील केंद्रित संपत्तीचे विकेंद्रीकरण करावे, गावातच ग्रामोद्योग आणि लघुउद्योग स्थापनेस प्राधान्य द्यावे, शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षणासाठी आणि वसतिगृहाची स्थापना करावी, गाव गावात शिक्षणाच्या सुविधा निर्माण कराव्यात, शिक्षण हे शेतीशी संबंधित ज्ञान आणि मार्गदर्शन करणारे असावे, देवस्थानाच्या संपत्तीचा वापर शिक्षण, आरोग्य आणि सार्वजनिक हितासाठी करावा, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव देण्याची तरतूद सरकारने करावी, त्याचबरोबर सहकारी पतपेढी हा बाजारपेठ गावोगावी निर्माण केल्या जाव्यात, संशोधन हे शेतीशी संबंधित असावे, शेतकऱ्यांनी नवप्रवर्तनशील असावे, कर्जबाजारीपणाची समस्या दूर करण्यासाठी कर्ज लवाद निर्माण करावेत, इत्यादी कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात आले ज्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीत अमुलाग्र बदल घडून आलेला दिसून येतो.

समारोप

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य आणि त्यांचे विचारांद्वारे एका नवीन कृषी युगाची संकल्पना त्या

काळात मांडली. जी आजही भारतातल्या प्रत्येकाला आवश्यक वाटते. त्यांच्या या कार्यानेच आजच्या शेतकऱ्याला परंपरागत अवस्थेतून काही प्रमाणात का होईना प्रगट अवस्थेपर्यंत नेण्यात भाऊ साहेबांचे मोठे योगदान आहे. आजही अनेक शेतकरी, सावकार, जमीनदार व्यापारी, ठेकेदार, राजकीय व्यक्ती, प्रशासकीय अधिकारी यांच्या अत्याचाराला बळी पडत असलेले दिसतात त्यावेळी खरोखरच त्या काळातील डॉ. पंजाबरावांचे विचार आजही किती समर्थक आहेत याची प्रचिती येते.

संदर्भ सूची :

१. ढाले रवींद्र, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषिविषयक आर्थिक विचार, नभ प्रकाशन, अमरावती
२. शेजुळे भीमराव , (२०१७) असा मी जगलो, मिलिंद प्रकाशन
३. देशमुख कल्पना, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवनचरित्र
४. दैनिक देशोन्नती, आत्मोन्नती, दि. २७ डिसेंबर २०१२
५. शेतकरी मासिक, डिसेंबर २०१२
६. डॉ. पंजाबराव देशमुख : https://mr.wikipedia.org
७. मेघे ज्ञानेश्वर, पुत्र सर्वश्रेष्ठ धन निर्मात्याचा डॉ. पंजाबराव देशमुख,
८. सावरकर सुदाम, सुर्यकर रा.ब. डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख जीवन व कार्य, खंड-१
९. मोहिते उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता लोकनेता, डॉ. पंजाबराव देशमुख

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

Two - Day 47th Annual Conference of **Vidharbha Arthashastra Parishad**
@ Gondwana University, Gadchiroli.
3rd & 4th February, 2024

डॉ पंजाबराव देशमुख: दुरदृष्टी असलेला सुधारणावादी नेता

डॉ.हनुमंत अंकुशराव भोसले
सहाय्यक प्राध्यापक,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग
जी.एस कॉलेज, खामगाव

डॉ संजय तुकाराम वराडे
प्राध्यापक,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग
जी.एस कॉलेज, खामगाव

डॉ; नितीन ज्ञानदेव चौधरी
सहाय्यक प्राध्यापक व
प्रमुख पदवी व पदव्युत्तर
अर्थशास्त्र विभाग
श्रीमती राधादेवी गोयनका
महिला महाविद्यालय
अकोला

ABSTRACT

स्वतंत्र भारताचे प्रथम कृषी मंत्री राहिलेले डॉ. पंजाबराव देशमुख हे प्रामुख्याने राजकीय नेते म्हणून ओळखले जात असले तरी, त्यांनी देशाच्या सामाजि, उन्नतीसाठी बजावलेली कामगिरी ही उल्लेखनीय आले. समाजातील अनिष्ठ रूढी व जाचक चालीरिती नष्ट करण्यासाठी त्यांनी कृतिशील प्रयत्न केलेले आहेत. हिंदू धर्मातील जातीभेदाला त्यांनी विरोध केला होता. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शिक्षणाच्या विविध सोयी त्यांनी केल्या. डॉ. पंजाबरावांच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास करतांना त्यांच्या सामाजिक कार्यातून त्यांची महत्ता लक्षात येते. त्यामुळे डॉ पंजाबराव देशमुख हे दुरदृष्टी असलेले समाजसुधारक आहेत. त्यांनी सुरू केलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याची फलश्रुती आज आपणाला पहायला मिळते आहे.

प्रस्तुत शोघ निबंधात डॉ. पंजाबराव देशमुखांनी केलेल्या विविध सामाजिक सुधारणा कार्याचा सविस्तर अभ्यास करण्यात आलेला आहे. तत्कालीन समाज व्यवस्था, त्यात असलेल्या रूढी, प्रथा, परंपरा इत्यादींच्या विरोधात डॉ. पंजाबराव देशमुखांनी दिलेला लढा व त्यातून घडवून आणलेली समाज सुधारणा, स्त्री शिक्षणात त्यांची भूमिका, व त्यांनी भरविलेल्या विविध परिषदा व त्यातून केलेले सामाजिक कार्य इत्यादी बाबींचा प्रस्तुत शोघ निबंधात केला गेला आहे.

प्रस्तावना

स्वतंत्र भारताचे प्रथम कृषी मंत्री राहिलेले डॉ. पंजाबराव देशमुख हे प्रामुख्याने राजकीय नेते म्हणून ओळखले जात असले तरी, त्यांनी देशाच्या सामाजि, उन्नतीसाठी बजावलेली कामगिरी ही उल्लेखनीय आले. समाजातील अनिष्ठ रूढी व जाचक चालीरिती नष्ट करण्यासाठी त्यांनी कृतिशील प्रयत्न केलेले आहेत. हिंदू धर्मातील जातीभेदाला त्यांनी विरोध केला होता. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शिक्षणाच्या विविध सोयी त्यांनी केल्या. डॉ. पंजाबरावांच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास करतांना त्यांच्या सामाजिक कार्यातून त्यांची महत्ता लक्षात येते. त्यामुळे डॉ पंजाबराव देशमुख हे दुरदृष्टी असलेले समाजसुधारक आहेत. त्यांनी सुरू केलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याची फलश्रुती आज आपणाला पहायला मिळते आहे.

प्रस्तुत शोघ निबंधात डॉ. पंजाबराव देशमुखांनी केलेल्या विविध सामाजिक सुधारणा कार्याचा सविस्तर अभ्यास करण्यात आलेला आहे. तत्कालीन समाज व्यवस्था, त्यात असलेल्या रूढी, प्रथा, परंपरा इत्यादींच्या विरोधात डॉ. पंजाबराव देशमुखांनी दिलेला लढा व त्यातून घडवून आणलेली समाज सुधारणा, स्त्री शिक्षणात त्यांची भूमिका, व त्यांनी भरविलेल्या विविध परिषदा व

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

त्यातून केलेले सामाजिक कार्य इत्यादी बाबींचा प्रस्तुत शोध निबंधात केला गेला आहे..

सामाजिक कार्य:-

१) सामाजिक सुधारणांची नांदी:-

बदलत्या काळ व परिस्थितीनुसार महाराष्ट्रातील जनतेची सामाजिक जाण वाढत होती. पूर्वापार चालत आलेल्या रूढी, प्रथा, परंपरा यांना काही प्रमाणात विरोध व्हायला लागला होता. "सत्यशोधक समाज, ब्राह्मणेत्तर पक्ष यांच्या उदयाने समाजक्रांतीची प्रभात उजाडली. त्याचबरोबर प्रतिगामी शक्ती खडाडून जाग्या झाल्या त्यांनी धर्मसंस्था, हिंदूसभा निर्माण केल्या. त्यामुळे ब्राह्मणी संस्कृती, वैदिक धर्म इत्यादींचा विरोध केल्या जावू लागला. ह्याच काळात विदर्भातील समाज जागा व्हायला सुरुवात झाली होती. त्याने बदलत्या काळाचे आव्हान स्विकारले होते. त्या काळात विदर्भाचे एक महत्वाचे.समाजसुधारक श्री. ना.रा. बामनगावकर यांनी सामाजिक सुधारणेशिवाय राजकीय सुधारणा मागणे शक्य नाही' असे मत मांडले. ते विधवा विवाहाचे समर्थक होते. त्यांनी स्वतः एका विधवेशी विवाह केला होता. जातीभेद नष्ट केल्याशिवाय समाजाची खरी प्रगती होवू शकत नाही असे त्यांना वाटत होते. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे पदार्पनही याच वातावरणात अमरावतीच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात झाले. विदर्भातील बहुजन समाजाचे नेते बॅरिस्टर रामराव देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख आणि यवतमाळचे नारायण बालाजी पाटील हे तीन ही ब्राह्मणेत्तर पक्षाशी सदस्य म्हणून संलग्न होते. बहुजन समाजाचा सामाजिक आणि शैक्षणिक विकास हे एकमेव ध्येय त्यांनी डोळ्यासमोर ठेवले होते. त्यातील डॉ. पंजाबराव देशमुख यांनी हे ध्येय प्रत्यक्षकृतीत उतरविले. त्यासाठी ब्राह्मणेत्तर पक्षाच्या विरोधाचा सामनाही त्यांनी केला.

२) सामाजिक सुधारणांची वेगळी वाट:-

१९२५ ते ३० च्या काळात विविध समाजसुधारक आपापल्या पद्धतीने समाज सुधारण्याचे प्रयत्न करत होते. अनेक वैचारिक प्रवाह तेव्हा समाजात होते. त्यात शस्त्रास्त्र, हत्यारे किंवा दहशतीचे वातावरण करून, स्वातंत्र्य प्राप्तीसाठी, समाज जागृतीसाठी ज्वालाग्राही भाषणांचा वापर करणारा एक प्रवाह तर अहिंसक मार्गाने सत्याग्रह, असहकार, सविनय कायदेभंग या चळवळीच्या माध्यमातून जनजागृत करणारा दुसरा प्रवाह तसेच समाज कारणातून राजकारण करणारा, समाजात शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जागृती करणारा, निरनिराळ्या संस्था, संघटना स्थापन करून समाज उन्नयन करणारा हा आणखी एक प्रवाह होता. डॉ. पंजाबरावांना पहिले दोन विचारप्रवाह, त्यांची कार्य पद्धती अमान्य वाटत होती. कारण त्यांच्या मते, हिंसेतून हिंसा वाढते व त्याचे परिणाम समाजाला भोगावे लागतात. तसेच असहकारातून अंतिम नुकसान आपलेच होईल म्हणून त्यांनी तिसरा प्रवाह अंगीकारलेला दिसतो. आधी समाजकारण मग राजकारण हे सूत्र आपण धरल्यास समाजाची प्रचंड शक्ती उभी होईल. जागृत समाजाला कोणती शक्ती दाबू शकत नाही याची त्यांना खात्री होती. "देशतील ५ टक्के लोक सुशिक्षीत आहेत आणि ९५ टक्के लोक अशिक्षीत आहेत, अंधारात आहेत, अर्धपोटी आहेत, अर्धनग्न आहेत, जातीच्या नावाखाली, धर्माच्या नावाखाली, विभक्त आहेत. अंधश्रद्धेच्या गर्तेत फसलेले आहेत. अशा लोकांना स्वराज्याची चळवळ समाजाकारणातून समजावून सांगितली पाहिजे. त्यांना शिक्षण देवून जागे केले पाहिजे असे त्यांना वाटायचे

३) डॉ. आंबेडकरांचा प्रभाव:-

हजारो वर्षापासून अस्पृश्यतेच्या दृष्ट गुलामगिरीत डांबून ठेवलेल्या, माणूसकीच्या जाणिवांची जाण हरवलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित, शोषीतांचा स्वाभिमान जागृत केला. सामाजिक अन्यायाविरूद्ध चीड व प्रतिकार करण्याची हिंम्मत त्यांच्यात निर्माण केली. सामाजिक क्रांतीची प्रेरणा त्यांच्या मृतप्राय झालेल्या मनात उत्पन्न करून या समाजाला स्वातंत्र्याच्या लढ्याकरीता संघटीत केले. याच

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

प्रेरणेतुन, डॉ. पंजाबराव देशमुख समाजातील खालच्या थरातील, गरीब, कष्टकरी जनतेसाठी झटत होते.

डॉ. पंजाबरावांनी सामाजिक विषमतेविरूद्ध विशेषतः अस्पृश्यतेसारख्या अमानुष प्रथेविरूद्ध आवाज उठविला. "इ.स. १९२८ मध्ये अमरावती जिल्हा काँसीलचे अध्यक्ष असतांना त्यांनी सार्वजनिक विहिरी अस्पृश्यांसाठी खुल्या केल्या. त्याच वर्षी अमरावतीचे अंबादेवी मंदिर अस्पृश्यांना दर्शनासाठी खुले व्हावे म्हणून त्यांनी सत्याग्रह केला. तसेच आपल्या संस्थेत जातीभेद नसावा म्हणून विशेष कटाक्ष त्यांनी पाळला होता. याची प्रचिती त्यांनी "स्थापन केलेल्या श्रद्धानंद अनाथालयावरून येते. १९५८ साली ३२ जातींची २९० मुले या अनाथालयात एकत्र राहत असत. त्यात ब्राह्मण, मुसलमान, दलित इत्यादींप्रमाणे अनेकांचा समावेश होता. त्या सर्वांना समान वागणूक तेथे मिळत असे. त्याच प्रमाणे अस्पृश्योद्धारासाठी व समाजातून जातीभेद नाहीसा व्हावा या उद्देशाने विदर्भातील अनेक तालुक्याच्या ठिकाणी त्यांनी समाज जागृती पर सभा आयोजीत केल्या. त्यात अचलपुरला दलपतसिंह चव्हाण, शुगावला नानासाहेब अमतकर, वडनेरला खुद्द पंजाबरावांच्या नेतृत्वात प्रचंड सभा घेवून अस्पृश्यांच्या हक्कांसाठी सडेतोड विचार मांडले." अशाप्रकारे अस्पृश्यांना समाजाने दूर लोटलेल्या वर्गाला त्यांचे हक्क मिळवून देण्यास डॉ. आंबेडकरांनी ज्या प्रकारे प्रयत्न केले त्याचाच पाठपुरावा डॉ. पंजाबरावांनी केलेला आपल्याला दिसतो.

४) सामाजिक सुधारणेतील महत्वाचे टप्पे:-

डॉ. पंजाबराव देशमुखांचा सामाजिक दृष्टिकोन उदारमतवादी होता. समाजजागृती करण्यासाठी त्यांनी अनेक प्रकारचे कार्यक्रम हाती घेतले. समाजातील विषमता नाहीशी करणे, लोकांचे अज्ञान दूर करणे, त्यांना शिक्षित करणे व त्यांना विकासाच्या नवीन दिशा दाखवणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता. त्यासाठी त्यांची धडपड दिसून येते.

i) मोर्शीत झालेले हिंदू महासभेचे अधिवेशन (एप्रिल १९२७):-

पंजाब केसरी श्री लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेले हे अधिवेशन ब्राह्मणेत्तरांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मोर्शी या तालुक्याच्या ठिकाणी झाले. कट्टर हिंदुत्ववादी ब्राह्मणी मंडळींनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाकडे ढुंकुनही पहायचे नाही, असा नानासाहेब अमृतकरांचा निश्चय होता. परंतु त्यांचे हे अलिप्ततेचे धोरण पंजाबरावांना पटले नाही म्हणून ते म्हणाले, "हिंदू या नात्याने तरी तेथे जाण्याचा आपणा सर्वांचाच हक्क आहे. मग बहिष्कार का टाकायचा? या अस्पृश्य बांधवांच्या प्रवेशाचा हक्क जो नाकारण्यात येत आहे, त्याकडे दुर्लक्ष करणे हा काही त्या परिस्थितीवरचा इलाज नव्हे. अप्रत्यक्ष जावून ते अधिवेशन काबीज का करू नये?" ११ पंजाबरावांचा हा धाडसी निर्णय अनेकांना अव्यवहार्य वाटला परंतु त्यांनी जे ठरवले व मनात आणलेले कार्य पूर्ण केल्याशिवाय चैन पडत नसे.

iii) वऱ्हाड प्रांतिक परिषद (नोव्हेंबर १९२७):-

अमरावतीच्या अंबादेवी मंदिर प्रवेशाच्या सत्यागृहाला चालना मिळावी म्हणून अमरावतीच्या स्पृश्य व अस्पृश्य समाजसेवकांनी एक सभा भरवण्याचे ठरवले. या कार्यक्रमाची कल्पना डॉ. पंजाबराव देशमुखांनीच सुचवली व त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आंमत्रित केले. पंजाबरावांच्या विनंतीला मान देवून "डॉ. आंबेडकर अमरावतीत १३ नोव्हेंबर १९२७ ला इंद्रभूवन थियेटरमध्ये झालेल्या सभेला अध्यक्ष म्हणून आले. या परिषदेमुळे विदर्भातील जनतेला डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व लाभेल तसेच ब्राह्मण वृंदाची डोकी ताळ्यावर येतील असा पंजाबरावांचा विश्वास होता. या परिषदेत अनेकांची परखड भाषणे झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणातून जातीव्यवस्था वर्णव्यवस्था व अस्पृश्यता ह्या विरूद्ध प्रखर शब्दात टिका केली. त्यामुळे अमरावतीतील सामाजिक वातावरण तापत होते. या परिषदेच्या आयऐनआचआच परिणाम म्हणजे बरोबर तीन महिन्यांनी अमरावतीचे अंबादेवी मंदिर सर्वांसाठी

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

खुले करण्यात आले. पंजाबरावांच्या प्रयत्नांना या परिषदेच्या आयोजनामुळे यश आले आणि विदर्भाच्या सामाजिक सुधारणा यादीत आणखी एक सुवर्ण पान जोडल्या गेले. कोणतीही जटील, क्लिष्ट समस्या, सामाजिक सुधारणा ह्या प्रथम सामोपचाराने, सामंज्यास्याने व नंतर सत्याग्रहाच्या मार्गाने सोडवण्यात याव्यात. कारण या मार्गाणे होणारे परिवर्तन हे दीर्घकालीन व परिणामकारक असतात असे डॉ. पंजाबराव देशमुखांचे मत होते.

५) डॉ. पंजाबरावांचे सक्रिय अस्पृश्यता निवारणः-

i) ब्राह्मण भोजने बंद कराः-

डॉ. पंजाबराव देशमुखांनी सामाजिक सुधारणेचा आदर्श स्वतःपासुनच घालून दिला. आधी केले मग सांगितले अशी त्यांची सुधारक भूमिका सदैव राहिली. "१९३० मध्ये आईच्या आग्रहाखातर त्यांनी वडिलांच्या तेरवीचा कार्यक्रम करायचे मान्य केले. त्यासाठी पितर म्हणून ब्राह्मणांना भोजन न घालता आपल्या चोखामेळा बोर्डिंगमधील अकरा महारांच्या मुलांना बोलावून सर्व विधी पूर्ण केला. ११ दुसरी घटना म्हणजे पंजाबरावांच्या मित्रांनी त्यांच्याकडे लग्नाची पार्टी देण्याचा आग्रह धरला होता. म्हणून त्यांनी आपल्या मित्रांना सुग्रास भोजन चारले. त्यात काही ब्राह्मण मित्रही होते. त्यावर मित्रांनी त्यांना धन्यवाद दिले तेव्हा ते म्हणाले, "माझ्या ऐवजी तुम्ही यांचे अभिनंदन करा कारण याच मेहतरांच्या मुलांनी सर्व व्यवस्था केली आणी आपणास स्वादिष्ट जेवण खावू घातले. डॉ. पंजाबरावांनी स्वः कृतीतून समाजपरिवर्तन घडविले. त्यांनी तत्वांशी कधीच हातमिळवणी केली नाही. हे त्यांच्या प्रत्येक कृतीतून आपणाला जाणवते.

ii) आंतरजातीय विवाहः-

डॉ. पंजाबराव देशमुख हे केवळ बोलके सुधारक नव्हते ते कृतिशिल पुरुष होते. सत्यशोधक समाज आणि ब्राह्मणेत्तर पक्षाच्या सभा-परिषदांमधुन जात-पात मोडण्याच्या घोषणा ते देत होते. समाज सुधारणा घडवून आणतांना त्यांनी कधीच स्वतःच्या फायद्याचा विचार केला नाही. विदर्भातील श्रीमंत व प्रतिष्ठीत घराण्यांकडून लग्नासाठी प्रस्ताव येत असतांना डॉ. पंजाबरावांनी समाजाच्या समोर एक आदर्श ठेवण्यासाठी सोनार जातीच्या विमल वैद्य यांच्याशी २६ नोव्हेंबर १९२७ रोजी सत्यशोधक पद्धतीने विवाह केला. त्यासाठी त्यांना आई-वडील व समाजाच्या विरोधाचा सामना करावा लागला तरी ते न डगमगता आपले कार्य चिकाटीने करत राहिले.

iii) विविध सामाजिक परिषदांद्वारे जागृती घडवलीः-

बहुजन समाज जागृतीसाठी व त्यांच्या कल्याणासाठी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेवून पंजाबरावांनी विदर्भात विविध ठिकाणी अनेक परिषदा, सभा, मिरवणुका यांच्या माध्यमातून समाज जागृती घडवण्याचे काम केले. आपल्या सुधारणावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी घेतलेल्या सभेत "वणीची कुणबी परिषद, अचलपूरची माळी परिषद, कावस्थाची ब्राह्मणेत्तर परिषद या सर्व परिषदांचे मार्गदर्शन व संचालन स्वतः पंजाबरावांनी केले २३ व हिंदू समाजात असलेल्या जाचक रूढी, प्रथा,परंपरांची दाहकता पटवून दिली.

६) भारत सेवक दलाची निर्मितीः-

बालपणापासूनच पंजाबरावांना बलोपासनेचे महत्त्व पटलेले होते. सुदृढ समाज बांधनीसाठी बलवान तरूणांची आवश्यकता त्यांना ज्ञात होती म्हणून आपल्या कार्यकाळात त्यांनी अनेक व्यायामशाळा स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे विदर्भात बऱ्याच व्यायामशाळा, तालिम मंडळे, आखाडे निर्माण होवू शकले. राष्ट्रशक्ती वाढीस लागावी तरूणांच्या शक्तीचा देशाला फायदा व्हावा ह्या उदात्त हेतूने पंजाबरावांनी विदर्भातील काही व्यायाम प्रसारक मंडळांना एकत्रित करून त्यांचे रूपांतर एका बलाढ्य संघटनेत करण्याचे ठरवले. म्हणून १९२६ ला स्थापित अमरावतीची शिवाजी व्यायाम शाळा, १९२८ दादासाहेब झोनाडे यांनी आर्वीला स्थापन केलेली बलभिम व्यायाम प्रसारक मंडळ आणि १९३३ ला श्री भाऊ भटकर यांनी स्थापन केलेले अभिमन्यु व्यायाम प्रसारक मंडळ या तीन मंडळांच्या कार्यकर्त्यांची निर्णायक सभा घेवून पंजाबरावांनी या

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071

संस्थांचे एकीकरण 'भारत सेवक दल' या नावाने घडवून आणले. त्यांनी या दलाद्वारे असंख्य तरुणांना खेडोपाडी पाठवून शिस्त सामर्थ्य, संघटना, राष्ट्रभावना निर्माण करण्याचे मोलाचे कार्य केले. २३ त्यामुळे विदर्भात शिस्तबद्ध तरूणांची एक बलवान संघटना तयार होवून पंजाबराव त्या माध्यमातून अधिक सक्रियरित्या समाजकार्य करू शकले.

७) 'महाराष्ट्र केसरी' एक समाज जागृतीचे माध्यम (१९२७):-

विदर्भात सामाजिक जागृतीचा झेंडा फडकवण्यासाठी व शेतकऱ्यांची बाजू निर्भिडपणे व निःपक्षपातीपणे मांडण्यासाठी डॉ. पंजाबरावांना एका प्रसारमाध्यमाची आवश्यकता भासत होती. म्हणून त्यांनी "अमरावतीला श्री महिपतराव कुरकुरे यांच्या विदर्भ प्रेसमध्ये एक 'महाराष्ट्र केसरी' नावाचे वर्तमानपत्र सुरु केले. डॉ. पंजाबराव देशमुखांचे हे वर्तमानपत्र बहुजनांचे कैवारी होते असे म्हणावे लागेल.

डॉ. पंजाबरावांचे हे वर्तमानपत्र क्रांतीकारक विचार सरणीचे प्रचार माध्यम होते. अत्यंत प्रामाणिकपणे कोणाचीही भिड न ठेवता आणि जातीय प्रतिक्रियावाद्यांची भिती न बाळगता त्यातून स्फोटक लिखाण प्रसिद्ध होत असे. शिवरायांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून समाजात समता, स्वातंत्र्य व बंधुप्रेम निर्माण करणे हेच महाराष्ट्र केसरीचे ध्येय होते. लोकमत बोलके करण्याच्या दृष्टीने अथवा संस्कारीत करण्याच्या दृष्टीने वर्तमानपत्र हे प्रभावी माध्यम होत. त्यामुळेच पंजाबरावांसारख्या दुरदृष्टी असलेल्या नेत्याच्या हातून महाराष्ट्र केसरीच्या माध्यमातून बऱ्याच प्रमाणात जागृती झाली.

८) गरीबांच्या न्यायासाठी झटणारे वकील म्हणून काम केले:-

कायद्याचे अगाध पांडित्य, कोणत्याही घटनेकडे वास्तविक दृष्टीने पाहण्याची वृत्ती, नैसर्गिक प्रतिपादन शक्ती, प्रखर बुद्धीमत्ता आणि शुद्ध चारित्र्य हे डॉ. पंजाबरावांच्या स्वभावाचे पैलू सांगता येतील. अगदी लहान न्यायालयात, सामान्यातल्या सामान्य खटल्यातसुद्धा आपल्या बॅरिस्टरीचे वजन ते कधी टाकीत नसत. अत्यंत अडचणीतल्या गरीब पक्षकारांना सहृदयतेने न्याय मिळवून देण्यासाठी ते सचोटीने प्रयत्न करीत वकीली हा केवळ त्यांच्या व्यवसायच नव्हता तर स्वभाव होता. पैसा कमावने ह्या एकमेव उद्देशातून त्यांनी कधीच वकीली केली नाही व बऱ्याचदा फी चे पैसे न घेता त्यांनी खटले लढवले. गुलाबराव नायगावकरांच्या सत्यशोधक तमाशाच्या खटल्याच्या वेळी त्यातील निरपराध कलावंतांवर खटले भरण्यात आले होते. "त्यामुळे सार्वजनिक जीवनाला वाहिलेल्या या कलाकारांचे जीवन धोक्यात आले. हे सारे कलावंत मागासलेल्या समाजाची सेवा करण्यासाठी तमाशाच्या पेशात उतरले होते. आर्थिकदृष्ट्या ते सारे गरीब कुटुंबातूनच आलेले होते. या खटल्यात स्वतःचा पैसा खर्च करण्याची त्यांची ऐपत नव्हती. सरकारी नोकरशाहीच्या जाचामुळे हा खटला लढवायला कोणताच वकील हिंम्मत करत नव्हता. त्यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख ह्या नवोदीत बॅरिस्टरने ते आव्हान समर्थपणे पेलून तो खटला जिंकला व त्या गरीब कलाकारांना न्याय मिळवून दिला. अब्दूल करीम नावाच्या एका गरीब ट्रक ड्रायव्हरचा खटला चालवतांना त्यांनी त्याची न्यायी वृत्ती ओळखून व गरीब परिस्थिती लक्षात घेवून त्याच्याकडून फीचे पैसे घेण्याचे नाकारले व त्याला न्याय मिळवून दिला. अशा कितीतरी खटल्यात पंजाबरावांनी समाजातील गरीब, कष्टकरी जनतेला आपल्या बुद्धी कौशल्याच्या ताकतीवर न्याय मिळवून दिलेला दिसतो.

समारोप व निष्कर्ष:-

थोडक्यात असे निश्चित होते की डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी आपल्या संपूर्ण कार्यकाळामध्ये देशाच्या सामाजिक सुधारणांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. सामाजिक सुधारणा करताना अस्पृश्यता निवारण, स्त्री शिक्षण तसेच जातीयता यांच्या विरोधात कणखर भूमिका घेणारे पंजाबराव देशमुख एक कृतिशील समाजसुधारक म्हणून महत्त्वपूर्ण कार्य करताना आपल्याला दिसतात. त्यांनी केलेल्या सुधारणा आजही समाजामध्ये अनेक पद्धतीने रुजलेल्या दिसून येतात. महात्मा ज्योतिराव फुले, राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा

अनेक थोर समाज सुधारकांच्या विचारांनी प्रभावित झालेले पंजाबराव देशमुख हे एक राजकीय सामाजिक नेतृत्व म्हणून महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीत आपले कृतिशील योगदान देण्याकरिता सदैव स्मरणात राहतील यात शंका नाही.

संदर्भ ग्रंथ सूची:-

1. मैन्द अप्पासाहेब, युगप्रवर्तक भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख,
2. कौलारकर रा.गो., आधुनिक विदर्भाचा इतिहास,
3. कडवे रघुनाथ, भारत कृषक भुषण भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख,
